गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : २९ | सोमवार दि. १२ जुलै २०२१ ते रविवार दि. १८ जुलै २०२१ | पाने : ४ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

## सामाजिक कार्यकर्त्यामुळे अडचण झाली पाच लाखांची सुपारी देऊन हत्या केली

गडचिरोली/क्राईम रिपोर्टर



राजकारणात पुढे जायचे असेल तर अनेक अडथळ्याच्या शर्यती मधून मार्ग काढावा लागतो. अशावेळी जे मार्गात आडवे येतील त्यांना साम-दाम-दंड-भेद यापैकी कुठल्याही मार्गाने समोरून हटवावे लागते. असाच काहीसा प्रकार गडचिरोलीत घडला. नगर परिषदेची निवडणूक तोंडावर आल्याने या निवडणुकीत लोकांमध्ये लोकप्रिय असलेला सामाजिक कार्यकर्ता ...पान २ वर

# मृत झालेल्या रुग्णावर त्यांनी उपचाराचे नाटक केले डॉक्टरांच्या रुपातील देवदूत पैशांसाठी यमदूत झाले






डॉ. वाठारकर



इस्लामपूर/क्राईम रिपोर्टर



सलीम शेख व त्याची मृत आई सायरा

कोरोनाच्या संकट काळात स्वतःचा जीव धोक्यात घालून रुग्णांवर दिवस रात्र उपचार करणारे डॉक्टर समाजाच्या नजरेत आज देवदूत ठरले आहेत. कोरोन योद्धे म्हणून त्यांचा गौरव केला जात आहे. पण वैद्यकीय क्षेत्रात असेही काही हरामखोर डॉक्टर सुद्धा सक्रीय आहेत कि ज्यांच्यासाठी कोरोना हा संकटकाळ नसून खोऱ्याने पैसे ओढण्याचा सुवर्णकाळ ठरला आहे. त्यामुळे कोरोन काळात त्यांच्याकडे उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांना जबरदस्तीने कोरोनाबाधित ठरवून त्यांच्या नातेवायीकांकडून उपचाराच्या नावाखाली लाखो रुपयांची लूट करीत आहेत. त्यामुळे हे डॉक्टर आहेत कि राक्षस आहेत असा प्रश्न लोकांना पडू लागलाय. कोरोनाच्या संकट काळात अनेक खाजगी रुग्णालयांनी रुग्णांच्या नातेवायीकांची फसवणूक करून करोडो रुपये कमावले. या पांढऱ्या कपड्यातील लुटारुंच्या समोर चंबलचे डाकू सुद्धा फिके पडतील इतकी भयंकर विकृती या लोकांमध्ये आहे. आजवर समाजात घडणाऱ्या घटनांवर चित्रपट निघायचे पण गब्बर इज बॅक या चित्रपटात दाखवलेल्या एका प्रसंगाप्रमाणे तशीच एक घटना इस्लामपूरमध्ये घडलीय.

वास्तविक जो माणूस उपचारासाठी रुग्णालयात येतो त्याचे नातेवायिक तणावाखाली असतात, त्यांना कोणत्याही परिस्थितीत आपला माणूस जगायला हवा याची फिकीर असते. त्यामुळे ते पैशाकडे पाहत नाहीत. वाटेल तितका पैसा खर्च करण्याची त्यांची तयारी असते आणि त्यांच्या याच मजबुरीचा काही हरामखोर खाजगी डॉक्टर गैरफायदा घेऊन त्यांना लुटत असतात. इस्लामपूर येथील आधार हेल्थकेअर हॉस्पिटलचे डॉक्टर योगेश वाठारकर यांनी तर केवळ वैद्यकीय पेशालाच नव्हे तर माणुसकीलाही काळिमा फसलाय. सध्या आजारात औषध गोळ्या घेण्यासाठी त्यांच्या रुग्णालयात आलेल्या एका रुग्ण महिलेला कोरोनाची भीती दाखवून ॲडमिट करून घेतले आणि कोरोना चाचणीचा अहवाल निगेटिव्ह येवूनही तिला महिनाभर हॉस्पिटलमध्ये ठेऊन उपचाराचा खर्च वाढवला. त्यानंतर त्या महिलेचा ८ मार्च रोजी मृत्यू झाला. पण तिच्या नातेवाईकांना सांगितले नाही, उलट दोन दिवस मृतदेह तसाच ठेवून तिच्या मुलाला औषधे आणायला सांगत होते, जणू काही मृतदेहावरच ते उपचार करायला सांगत होते आणि दहा तारखेला तुझी आई वारली असे तिच्या मुलाला सांगून त्याच्याकडून ४१ हजाराचे बिल वसूल केले. मात्र मृत्यू दाखला आणायला तो नगर परिषदेत गेला तेंव्हा तिथे त्याच्या आईच्या मृत्यूची नोंद ८ जुलै अशी होती ...पान २ वर

## वरुन दिसत असे तो खूपच साधा भोळा गावातल्या बायकांना आंधळा मारी डोळा



मयत हरचंद

धुळे (कापडणे)/क्राईम रिपोर्टर

एखादा माणूस वरवर जरी साधा दिसत असला तरी प्रत्यक्षात मात्र तो भयंकर पोचलेला असतो. पण अत्यंत साधेपणाचा आव आणीत असल्याने लोक त्याला ओळखू शकत नाही आणि हरचंद भिल हा तर एका डोळ्याने आंधळा होता, पण दुसऱ्या डोळ्याच्या लव लवणाऱ्या पापण्यातून तो सगळ्या बऱ्यावाईट गोष्टींचा वेध घेत असायचा, खास करून गावातल्या बायांवर त्याची नजर असायची. उसतोडणीसाठी मजूर पुरवायचे काम तो करायचा आणि या कामासाठी येणाऱ्या बायांवर वाईट नजर ठेवायचा. अशाच एका बाईवर त्याची वाईट नजर पडली, त्यानंतर तिने आपल्या प्रियकराला सांगताच त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने या आंधळ्याचा काटा काढला. मात्र पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.



आरोपी ज्ञानेश्वर



आरोपी संजय

हरचंद देवा भिल हा दोन्ही डोळ्यांनी अंध तरुण होता. दोन्ही निकामी डोळ्यांपैकी त्याचा एक डोळा किंचीत उघडत असे. त्या किंचीत उघडणाऱ्या व किलकिलणाऱ्या एका डोळ्याच्या पापणीतून तो जग बघत असे. किंचीत उघडणाऱ्या एका पापणीतून त्याची भिरभिरती नजर गावातील तरुणींच्या सौंदर्याचा वेध घेत असे. तो अंध असल्यामुळे कुणी अनोळखी मनुष्य अथवा स्त्री त्याच्या चारित्र्यावर संशय घेत नसे. त्यामुळे अंधपणाचा गैरफायदा घेण्याची संधी देखील तो सोडत नव्हता. धुळे जिल्ह्याच्या कापडणे गावातील अशिक्षीत समाजात हरचंद जन्माला आला होता. अंध हरचंदची बुद्धी इतर डोळस समाजबांधवांच्या तुलनेत थोडी जास्त होती. त्याचा देखील तो गैरफायदा घेत असे. सामाजिक संस्थेच्या कामानिमीत्त तो कधी कधी बाहेरगावी देखील जात असे. त्यामुळे आपण कुणीतरी बडी हस्ती असल्यासारखे त्याला वाटत असे. त्याला कुणी समजावण्यास गेला म्हणजे तो थेट एस.पी., कलेक्टर यांच्या नावे धमकी देऊन समाजातील इतर



एपीआय ठाकरे

अशिक्षीत बांधवांना गप्प करत असे. वासरात लंगडी गाय शहाणी या म्हणीप्रमाणे समाजातील अशिक्षीत लोक हरचंद यास मान देऊन गप्प राहण्यात धन्यता मानत होते. त्यामुळे तो वेगळ्याच दुनियेत आणि तालात वावरत असे.

हरचंद रहात असलेल्या घरासमोर संजय उत्तम भिल नावाचा तरुण रहात होता. संजय भिल हा उस तोड कामगारांचा पुरवठादार होता. उसतोड कामगारांना उस तोडण्यासाठी गावोगावी शेतात घेऊन जाण्याचे व घेऊन येण्याचे काम तो करत होता. ...पान २ वर

## नोकरीसाठी वाहिनीने बाहेर पाऊल टाकले दिराने तिच्या चेहऱ्यावरच ॲसिड फेकले

मुंबई/क्राईम रिपोर्टर

आजकाल समाजातील लोकांना काय झालेय. कुणास ठाऊक कोणत्यही छोट्या गोष्टीवरून झालेल्या भांडणाचा काही लोकांना इतका राग येतो कि ते आपल्या कुटुंबातील लोकांवरही हल्ला करायला मागे पुढे पाहत नाहीत. घाटकोपर येथे एका विधवा महिलेने पतीच्या निधनानंतर ज्वेलर्सच्या दुकानात काम करण्याचा निर्णय घेतला म्हणून नाराज झालेल्या तिच्या दिराने तिच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकले, यात ती जखमी झाली असून या प्रकरणी पोलिसांनी दिराला अटक केली आहे. दरम्यान वाहिनीने नोकरी करू नये हेच एकमेव कारण या घटनेमागे होते कि आणखी काय आहे याचा आता पोलीस शोध घेत आहेत.

मुंबईत एका दिरानं आपल्या वहिनीच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी घाटकोपर पोलीस ठाण्यात आरोपी दिराविरुद्ध फिर्याद दाखल करण्यात आली आहे. ही घटना घडल्यानंतर घाटकोपर पोलिसांनी अवघ्या काही तासांतच आरोपी दिराच्या मुसक्या आवळल्या आहेत. पोलिसांनी या घटनेचा तपास केला असता, धक्कादायक माहिती समोर आली आहे. पीडित महिला घराशेजारी असलेल्या एका दुकानात कामाला गेल्याच्या रागातून आरोपी दिरानं ॲसिड हल्ला केल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. प्रबुद्ध कांबळे असं अटक केलेल्या ४० वर्षीय आरोपी दिराचं नाव आहे. तर पीडित महिला आरोपी ...पान ६ वर

## रस्त्यात अडवणारे लुटारू काळ ठरले वाहनचालकास दगडाने ठेचून ठार मारले







देवणी/शकील मनियार

ग्रामीण भागात वात्मारीचे प्रकार नेहमीच होत असतात म्हणून सहसा रस्त्यात एखाद्याने हात दाखवला तरी वाहन चालक गाडी थांबवत नाहीत. पण काही समजूतदार असतात ते मात्र मदतीच्या हेतूने एखाद्याने रस्त्यात हात दाखवला तर गाडी थांबवून त्याला सोबत घेतात. पण कधी कधी हा परोपकार जीवघेणा ठरू शकतो. शेषराव बनसोडे याचा मालवाहतुकीचा व्यवसाय होता आणि तो एक चांगला माणूस होता. त्यामुळे त्याचा सुखाचा संसार सुरु होता. मात्र एकेदिवशी काही लुटारुंनी त्याची गाडी अडवली. मात्र ते लुटारू आहेत याची त्याला कल्पना नव्हती म्हणून त्याने त्या लुटारुंशी वाद घातला. त्यामुळे चिडलेल्या लुटारुंनी त्याची हत्या केली आणि त्याचे पैसे व मोबाईल घेऊन पळून गेले. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली असून मुख्य आरोपी फरार आहे.

१६ जून २०२१ रोजी सकाळी निलंगा-उदगीर जाणाऱ्या रस्त्यावरील वलांडी गावच्या शिवारात एक ३५ ते ४० वर्षीय पुरुष रस्त्याच्या कडेला आसलेल्या एका शेतबांधावर रक्ताच्या थारोळ्यात आढळून आल्याची माहिती देवणी पोलीस ठाण्यात येऊन धडकली. देवणी पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार यांनी घटनेची प्राथमिक माहिती जाणून घेत वलांडी ...पान २ वर

## बायको लागली भोंदू बाबाच्या नादी पतीच्या आयुष्याची तिने तोडली फांदी

पुणे/क्राईम रिपोर्टर

देव आणि धर्माच्या नावाने दुकाने थाटून भोळ्या भाबड्या अंध श्रद्धाळू लोकांची फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबांची दिवसेंदिवस संख्या वाढत चालली असून अशाच एका मठाधिपतीने एका श्रीमंत महिलेला आपल्या नादी लावून तिचे आर्थिक आणि लैंगिक शोषण सुरु केले होते आणि ती पूर्णपणे त्याच्या कचाट्यात सापडतच तिच्या पतीची संपत्ती हडपण्याचा त्याने कुटील डाव रचला. पण त्यात काही त्याला यश येईना म्हणून त्याने आपल्या साथीदाराच्या मदतीने तिच्या उद्योजक असलेल्या पतीची हत्या केली.

कात्रज घाटातील नव्या बोगद्याजवळील हॉटेल मराठा शहीसमोरील रस्त्याकडील बाजुस असणाऱ्या खड्डयात एका तरूणचा मृतदेह पडला असल्याची माहिती भारती विदयापिठ पोलीसांना मिळाली. ही माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मयत तरूणाच्या शेजारी एक दुचाकी गाडी उभी केलेली होती. मयत तरूणाचा गळा कशाने तरी आवळण्यात आला होता. मयत तरूणाचा खून करून त्याचा अपघातात मृत्यू झाला हे दाखविण्यासाठी या ठिकाणी त्याचा मृतदेह आणून टाकला होता. मयत तरूणाच्या अंगावर मारहाणीच्या खुणा व त्याच्या गळ्यावर गळा आवळल्याच्या खुणा दिसत होत्या. यावरून हा खूनच असल्याचे पोलीसांनी ताडले होते. बहुदा त्याचा खून करून पुरावा नष्ट करणेसाठी कुणी तरी अज्ञातांनी त्याचा मृतदेह येथे आणून ...पान ६ वर

## न्याय देवतेने तरी का करावी अशा विकृतांची रक्षा आईचं काळीज तळून खाणाऱ्या मुलाला फाशीची शिक्षा

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' अशी जगात आईची महती आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत आईला साक्षात देवीची उपमा देण्यात आलीय. पण आज मात्र या देवीची तिच्याच उदरात जन्म घेतलेल्या तिच्या लोकांकडून विटंबना होत आहे. त्यामुळे अशांना जगण्याचा अधिकार नाही हे आता न्यायालयानेही अधोरेखित केले आहे. २०१७ साली कोल्हापुरात केवळ दारूसाठी पैसे दिले नाहीत म्हणून जन्मदात्या आईची हत्या करून तिचे काळीज तळून खाणाऱ्या एका नराधम विकृत नार्पशुला न्यायालयाने मरेपर्यंत फाशीची शिक्षा ठोठावली आहे.



सुनिल रामा कुचकोरवी असे या गुन्हेगाराचे नाव असून हि घटना महाराष्ट्रातील कोल्हापूरातील आहे. कोल्हापूरातील ताराराणी चौकीतील आहे. माकडवाला वसाहतील राहणारा सुनिल कुचकोरवी याने २८ ऑगस्ट २०१७ रोजी आईकडे दारूला पैसे मागितले. त्याच्या आईकडे पैसेही नव्हते. दुसऱ्याची भांडीकुंडी धुवून ती स्वतःचा उदरनिर्वाह भागवत होती. अत्यंत कठीण परिस्थितीत ती एक एक दिवस कंठित असताना सुनिल तिचा रोज पैशासाठी छळ करीत होता. त्या दिवशी सुनिल खूप संतापलेला होता. दारू पिण्यासाठी त्याचा जीव कासावीस झाला होता. त्याच्यातील राक्षस जागा झाला होता. आई पैसे देत नाही हे पाहून त्याने स्वैपाकघरातील चाकू घेऊन आईवर ...पान ६ वर

## दारूची नशा त्यांच्या डोक्यात गेली कचरा वेचणाऱ्यांनी मित्राची हत्या केली



मुंबई/राजेंद्र वेदांते

दारूची नाश एकदाका माणसाच्या डोक्यात गेली कि मग त्याचे स्वतःवर नियंत्रण राहत नाही आणि बहुतेक दारूच्या पार्ट्यांमध्ये असेच घडते. सध्या खंडर बनलेली पार्ले येथील जाल हॉटेलची इमारत हि चरशी गर्दुल्ले आणि दारुड्यांचा अड्डा बनली आहे. याच ठिकाणी तीन मित्र दारू प्यायला बसले होते. त्यात दोघे कचरा वेचणारे होते, तर एक तडीपार गुंड होता. मात्र प्यायल्यावर त्यांच्यात भांडण होऊन मारामारी सुरु झाली. यावेळी कचरा वेचणाऱ्यांनी त्या तडीपार गुंडाला इतके मारले कि त्यातच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

मुंबई पोलीसांची एक खासियत आहे की खूनाच्या गुन्ह्यातील आरोपी सात पडद्याच्या आत लपला असला तरी अख्खी मुंबई पिंजून काढीत पोलीस आरोपीच्या मुसक्या आवळतातच. खून करणे हे जरी सोपे असला तरी तो खून पचवणे कठीण आहे हे पोलीसांनी अनेकदा पटवून दिले आहे. तपासाचा कोणताही धागादोरा हाती नसताना पोलीस पथक समुद्रातून टाचणी शोधून काढावी तसे ...पान ६ वर

## विश्वास ठेवून त्याच्यावर घर मालक फसला भाडेकरूच्या मुलाकडून जीव गमावून बसला





मयत रमेश



आरोपी अजिंक्य

धुळे/क्राईम रिपोर्टर



माणूस किती जरी श्रीमंत असला तरी त्याने आपल्याकडे काय आहे हे इतरांना सांगू नये. कारण त्यामुळे जे त्याच्या जवळचे असतात त्यांच्या मनात असूया आणि द्वेष निर्माण होतो आणि मग गोड गोड बोलून तेच त्याचा काटा काढतात. स्टेट बँकेच्या कुसुंबा शाखेतून निवृत्त झालेल्या रमेश श्रीराव यांच्या बाबतीत सुद्धा असेच घडले. त्यांच्या घरात भाडेकरू म्हणून राहणाऱ्या शिवनाथच्या तरुण मुलाचा त्यांना लळा लागला आणि त्यांनी त्याला आपलाच मुलगा समजून सर्व काही सांगून टाकले. मात्र त्यांच्या मनाचा हाच मोकळेपणा त्यांच्यासाठी काळ ठरला आणि भाडेकरूच्या मुलाने एकदा संधी साधून त्यांच्यावर आणि त्यांच्या पत्नीवर हल्ला केला. त्यात रमेश श्रीराव यांचा मृत्यू झाला, तर सुदैवाने त्यांच्या पत्नी मात्र बचावल्या. चार महिन्याचे भाडे थकल्याने रमेश टोचून बोलले याचा राग मनात धरून भाडेकरूच्या मुलाने बापासमान असलेल्या रमेश यांचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. ...पान २ वर

12 TO 18 JULY 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 10/07/2021 8:38 PM Page 1



## पान १ वरून....

### मृत झालेल्या रुग्णावर त्यांनी उपचाराचे...

आणि त्यावरूनच हॉस्पिटलची लबाडी उघडकीस आली. या प्रकरणी सलीम शेख याच्या फिर्यादीवरून डॉ.योगेश वाठारकर यांना अटक करण्यात आलीय. इस्लामपूर शहरातील माणकेश्वर चित्रमंदिरा शेजारी डॉ.योगेश वाठारकर याचे आधार हेल्थकेअर हॉस्पिटल आहे. इस्लापूर परिसरात त्याच्या आधार केअर हॉस्पिटलची ख्याती असल्याने आजुबाजुच्या परिसरातील बरेच लोक येथे उपचारासाठी येत असतात. दि.२४ फेब्रुवारी २०२१ रोजी या हॉस्पिटलमध्ये कासेगाव येथील सायरा शेख यांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना उपचारासाठी त्याचा मुलगा सलीम याने त्यांना या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. वयोवृध्द सायरा शेख यांना कसला ही आजार नव्हता. २४ फेब्रुवारी त्याना अस्वस्थ वाटत होते. म्हणून त्या आपला मुलगा सलीम याला घेऊन केवळ इजेक्शन गोळया घेऊन जाण्यासाठी म्हणून आल्या होत्या. परंतु डॉ.योगेश वाठारकर यांनी त्याची तपासणी करून त्याना ॲडमिट व्हावे करावे लागेल असे त्याच्या मुलगा सलीम यांना सांगितले. फेब्रुवारी महिन्यात कोरोनाचे पेंशट पश्चिम महाराष्ट्रात जास्त सापडू लागल्याने डॉक्टरांनी त्याची कोरोना टेस्ट ही करून घेतली. त्याचा रिपोर्ट हा निगेटिव्ह आला. तरीही डॉक्टरांनी त्यांना उपचारासाठी आपल्या आधार केअर हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करून त्याचेवर उपचार सुरू केले. सलग पाच सहा दिवस डॉक्टर सांगतील तसे त्याचेवर औषध उपचार चालू होते. परंतू तरीही त्याच्या तब्येतीत काही फरक पडत नव्हता. दिवसेंन्दिवस त्याची प्रकृती ढासळत चालली होती. त्या औषध उपचाराला साथ देत नव्हत्या. तरीही डॉक्टरांच्या सांगण्यावरून त्याचा मुलगा सलीम हा त्याच्यावरील औषध उपचाराचा खर्च उचलत होता. त्याला त्याची आई पाहिजे होती. म्हणूनच तो डॉक्टरांनाच देव मानून आईच्या अजाराचा खर्च उचलत होता. तशी त्याची घरची परिस्थितीती ही बेताचीच होती. पण म्हणातात ना रिन काढं पण आई वडिलाचा सांभाळ कर तसे त्याचे झाले होते. २४ फेब्रुवारीला आईला दवाखान्यात ॲडमिट केले होते. मार्च पाच सहा तारीख उलटून गेली तरीही त्याच्या आईच्या तब्येतीत फरक पडत नव्हता. डॉ.योगेश वाठारकर तर त्याला सांगत होते की फरक नक्कीच पडेल. तुम्ही मी सांगतो तेवढी औषधे घ्या. सलीम याचेपुढे आता नाईलाज झालेला होता. डॉक्टरांच्या पुढे तर तो जावू शकत नव्हता. या १५ दिवसाच्या कालावधीत त्याने बराच पैसा खर्च केला.तो डॉक्टरांना देवच मानत असल्याने शेवटी डॉक्टरच आपल्या आईला या आजारातून बरे करतील असे वाटत होते. म्हणून तो शर्थीचे प्रयत्न करीत होता.मात्र त्याची आई काहीऔषध उपचाराला साथ देत नव्हती. अखेर तिने दि.८ मार्च रोजी दवाखान्यातच शेवटचा श्वास घेतला. तिची प्राणज्योत मालवली होती. शेवटच्या दोन तीन दिवसामध्ये डॉक्टरांनी त्यांना आसीयूमध्ये ठेवले होते.तेथे जाण्यास कोणाला ही परवानगी नव्हती. फक्त हॉस्पिटलचे कर्मचारी, नर्स आणि डॉक्टरच आसीयुत जात होते. सलीम शेख हा आपल्या आईच्या उपचारासाठी वाटेल तेवढा पैसा खर्च करीत असल्याचे बघून डॉक्टरांची मती फिरली होती.त्यांना हे पेशंट म्हणजे धार देणारी म्हैस वाटत होती.म्हणून तर त्यांनी सायरा शेख याचा दि.८ मार्चला निधन झाले तरी याची कल्पना त्यांनी त्याचा मुलगा सलीम किंवा त्याच्या दुसऱ्या कोणत्याही नातेवाईकांना दिली नाही. उलट ते त्या दोन दिवसात गोळ्या औषधे त्यांना आणायला लावून सायरा शेख यांना ऑक्जिनवर ठेवले असल्याचे सांगून त्याची प्रकृती सध्या स्थिर आहे. औषध उपचाराने त्या नक्कीच बऱ्या होतील असे सांगून त्यांना झुलवत होते. अखेर दोन दिवसांनी म्हणजे १० मार्च २०२१ रोजी डॉक्टरांनी सलीम आणि त्याच्या नातेवाईकांना बोलवून सायरा शेख या मयत झाल्याचे सांगितले. तसेच त्यांना हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देताना ४१ हजार २८९ रूपये जादा बिल भरून घेऊनच मयत सायरा शेख याचां मृतदेह त्याच्या ताब्यात दिला. त्यानंतर सलीम शेख यांनी आई सायरा शेख याचा मृतदेह ताब्यात घेऊन कासेगाव येथे त्याचेवर धार्मिक वातावरणात अंत्यसंस्कार केला. थोडे दिवस त्याचे दु:खात गेल्यावर ते एप्रिल महिन्यात इस्लामपूर येथील नगरपरिषदेत आई सायरा शेख याच्या मृत्यूचा दाखला काढणेसाठी गेले होते. त्यावेळी त्यांनी नगरपरिषदेतून त्याच्या मृत्यूचा दाखला काढला तर त्यावर त्याच्या मृत्यू दाखल्यावर मयत सायरा शेख याच्या मृत्यूची तारीख ८ मार्च २०२१ अशी नोंद न करता १० मार्च २०२१ अशी असल्याचे दिसून आले.याबाबत त्यांनी नगरपरिषदेच्या संबधीत अधिकारी यांना विचारले असता तेथील अधिकाऱ्यांनी सलीम शेख यांना त्याच्या आईच्या मृत्यूची नोंद ही हॉस्पिटल मधील रेकॉर्डवरून केल्याचे सांगून आधार हेल्थ केअर हॉस्पिटलचे डॉ.योगेश वाठारकर यांनी सायरा शेख याच्या मृत्यूची नोंद ही नगरपरिषदे कडे दि.८ मार्च २०२१ अशी केल्याचे सांगितले. त्यावेळी सलीम शेख यांना धक्का बसला. कारण एक तर त्याची आई ही इतका सगळा पैसा खर्च करून ही त्याच्या हाताला लागली नव्हती. त्यातच शेवटच्या दोन दिवासात म्हणजे ८ मार्च ते १० मार्च अखेर डॉक्टरांनी त्याचेकडून जवळपास ४१ हजार २८९ रूपये जादा भरून घेतले होते. आई सायरा शेख या जरी ८ मार्चला वारल्या तर मग डॉक्टरांनी त्याचा मृत्यू हा १० मार्चला झाल्याचे सांगून त्याचेकडून विनाकारण इतकी रक्कम उकळले होते. सलीम यांना डॉक्टरांचा संशय आल्याने ते याचा जाब विचारण्यासाठी आधार केअर हॉस्पिटलमध्ये गेले असता. डॉक्टरांनी त्याना काही तरी गफलत झाल्याचे सांगून त्याला वाटेला लावले.त्यानंतर सलीम हे आपल्या जवळच्या नातेवाईकांना घेऊन दोन दिवसांनी परत त्या हॉस्पिटलमध्ये येऊन या घटनेचा जाब विचारीत असताना त्यांनी तेथील डॉक्टरांनी आणि स्टाफने सलीम आणि त्याच्या नातेवाईकांना उलट आणि उध्दट अशी उत्तरे दिली. याचा राग आल्यावर सलीम आणि त्याच्या नातेवाईकांनी आमचे जादाचे घेतलेले ४१ हजार २८९ रूपये परत दया नाही तर तुमच्याकडील मयत सायरा शेख याच्या मृत्यूचे रेकॉर्ड दाखवा असे म्हणत डॉक्टांना सळो की पळो करून सोडले. सलीम शेख आणि त्याच्या नातेवाईकांनी गोंधळ घातल्यावर नाईलाजस्तव तेथील कर्मचाऱ्याना मयत सायरा शेख याच्या मृत्यूचे रेकार्ड दाखवणे भाग पडले. त्या रेकॉडे मध्ये तारखेच्या ठिकाणी खाडाखोड झाल्याचे सलीम शेख याच्या निदर्शनास आल्यावर ते परत संतप्त झाले.त्याच्या नातेवाईकांनी गोंधळ केल्यावर डॉक्टरांना नमते घ्यावे लागले. कसे तरी करून डॉक्टरांनी त्याचे जादा घेतलले पैसे परत देतो असे सांगितल्यावर सलीम शेख शांत झाले.तरीही हॉस्पिटल मधून जाताना पैसे नाही मिळाले तर मी डॉक्टरांच्या आणि स्टाफच्या विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार करेन अशी गर्भीत इशारा दिला. त्यानंतर दोन महिने झाले तरी ही डॉक्टराच्याकडून सलीम शेख यांना पैसे मिळाले नाही. ते वारंवार येऊन हॉस्पिटलमध्ये विचारणा करीत होते. पण डॉक्टर योगेश वाठारकर हे पैसे दयायचे नाव काढत नव्हते.म्हणून सलीम हमीद शेख (वय ३२) यांनी इस्लामपूर पोलीस ठाण्यात डॉ.योगेश वाठारकर याचे विरोधात दि.५ जुलै रोजी रितसर तक्रार दाखल केली. त्याच्या तक्रारी नसुार पोलीस या घटनेचा तपास करीत असताना सलीम शेख याच्या तक्रारीत त्यांना तथ्य आढळून आल्याने पोलीसांनी आधार हेल्थ केअर हॉस्पिटल आणि डॉ.योगेश वाठारकर याचे विरोधात मयत सायरा शेख (वय ६०) आणि त्याचा मुलगा सलीम शेख याची फसवणूक केल्याची तक्रार दाखल करून डॉ.योगेश वाठारकर यांना ताब्यात घेऊन त्याचे विरोधात भा.दं.वी. कलम ४०६,४२०,४६४,२९७ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्यांना अटक करून मा.न्यायालयासमोर उभे केले. मा.न्यायालयाने त्यांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान डॉक्टरांनी आपला गुन्हा कबुल केला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक नारायण देशमुख हे करीत आहेत. या घटनेवरून डॉ.योगेश वाठारकर यांनी डॉक्टरकी पेशाला काळीमा फासण्याचे काम करून मयताच्या टाळू वरचे लोणीच खाल्ले असल्याचे बोलले जात आहे.

### सामाजिक कार्यकर्त्यामुळे अडचण...

आपल्यासाठी तापदायक ठरू नये म्हणून नगर परिषदेचा सभापती प्रशांत खोब्रागडे यांनी सामाजिक कार्यकर्ते दुर्योधन रायपुरे यांची पाच लाखांची सुपारी देवून हत्या केली. मात्र पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा छडा लाऊन मुख्य आरोपीसह पाच जणांना अटक केली आहे. गडचिरोलीतील सामाजिक कार्यकर्ते दुर्योधन रायपुरे यांची २४ जूनच्या रात्री हत्या झाली. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली होती. पोलिसांनी या प्रकरणात आपली सूत्रे हलवण्यास सुरुवात केली आणि मुख्य आरोपीसह पाच जणांना बेड्या ठोकल्या आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून हत्या करण्यामागचं कारण समोर आल्यावर सर्वांनाच एक धक्का बसला आहे. रायपुरे यांच्या हत्ये प्रकरणी पंधरा दिवसात पोलिसांनी मुख्य आरोपीसह ५ जणांना बेड्या ठोकल्या आहेत. विशेष म्हणजे, अटक करण्यात आलेला मुख्य आरोपी गडचिरोली नगरपरिषदेचा सभापती प्रशांत खोब्रागडे आहे. प्रशांत खोब्रागडे यानेच राजकीय वैमनस्यातून दुर्योधन रायपुरे यांची हत्या करण्यासाठी पाच लाखांची सुपारी दिल्याची धक्कादायक माहिती आता समोर आली आहे. दुर्योधन रायपुरे हे गडचिरोली शहरातील फुले वॉर्डात वास्तव्याने होते. गोरगरीब नागरिकांची कामे करणे, हा त्यांचा नित्यक्रम होता. दरम्यान २४ जून रोजी राहत्या घरात त्यांची हत्या करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून तपासाची चक्रे फिरवली असता, पहिल्या आरोपीला गोंदिया येथून अटक करण्यात आली. त्याला पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर आणखी चार जणांना गोंदिया जिल्ह्यातूनच अटक करण्यात आली. चौघांचीही चौकशी केली असता नगरपालिकेचे सभापती प्रशांत खोब्रागडे यांनी दुर्योधन रायपुरे यांच्या हत्येची सुपारी दिल्याचे आरोपींनी कबूल केले. त्यानंतर सभापती प्रशांत खोब्रागडे यालाही गडचिरोली पोलिसांनी अटक केली आहे. आगामी नगर परिषदेच्या निवडणुकीत राजकीय अडथळा बाजूला करण्याच्या दृष्टीने संभाव्य उमेदवार म्हणून दुर्योधन रायपुरे यांना संपवण्याचा कट प्रशांत खोब्रागडे यांनी रचला. यासाठी प्रशांत खोब्रागडे याने गोंदिया जिल्ह्यातील पाच जणांना पाच लाखांची सुपारी दिली होती. त्यापैकी ५० हजार रुपये अदा करण्यात आले होते, अशी माहिती गडचिरोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांनी दिली आहे.

### वरून दिसत असे तो खूपच साधा भोळा...

या कामाच्या माध्यमातून तो काही दिवस घराबाहेर मुक्कामी रहात असे. या कालावधीत हरचंदची एका पापणीच्या माध्यमातून किंचीत जग दाखवणारी नजर संजयच्या घरावर खिळून रहात असे. संजयच्या गैरहजेरीत त्याच्या घरात कोण प्रवेश-निर्गमन करतो अथवा करते याची तो किंचीत उघडणाऱ्या एका डोळ्याच्या पापणीतून फुकटची निगराणी करत असे. त्यात त्याला सुख वाटत होते. संजयचे प्रेम असलेल्या महिलेवर देखील अंध हरचंदच्या एका पापणीची मिनमिनती नजर खिळून रहात होती. तो त्या महिलेसोबत लगट करण्यात धन्यता मानत होता. उन्हाळ्याच्या दिवसात ती महिला घराच्या अंगणात झोपली म्हणजे हरचंद हरखून जात असे. अंधपणाचा फायदा घेत त्या महिलेसोबत लगट करण्याचा तो प्रयत्न करत असे. त्याच्या अशा विविध कारनाम्यांमुळे अनेक जण त्रस्त झाले होते. मात्र तो अंध असल्यामुळे पिडीत व्यक्तीच्या तक्रारीला बेदखल केले जात होते. त्याच्या अंधपणाकडे बघून लोक तक्रारदारालाच खडे बोल सुनावत असे. मात्र अंध हरचंद किती मुजोर आहे हे केवळ पिडीत तक्रारदारालाच समजत असे. पोलिसांकडे कुणी पिडीत पुरुष अथवा महिलेने त्याच्या कारनाम्यांची तक्रार केली म्हणजे त्याचे दोन्ही अंध डोळे बघून त्याला क्लिनचिट दिली जात असे. त्याला क्लिनचिट मिळाली म्हणजे नंतर त्याची मुजोरी वाढत असे. संजयचे प्रेम असलेल्या महिलेसोबत लगट करण्याचा प्रयत्न हरचंद करत असे. त्या महिलेचे अजुन कुणासोबत प्रेमसंबंध आहेत का? याची देखील हरचंद पडताळणी करत होता. त्यामुळे उसतोडीचे काम आटोपून घरी आलेल्या संजयकडे त्या महिलेने हरचंदची तक्रार केली होती. त्यातून हरचंद व संजय या दोघांचे वाद आणि हाणामारी देखील झाली होती. तरीदेखील हरचंदचे अंधपणाच्या आडून छुपे कारनामे सुरुच होते. त्यामुळे संजय वैतागला होता. त्याला कायमची अद्दल घडवण्याचे संजयने मनाशी ठरवले. याकामी त्याने त्याचा साथीदार ज्ञानेश्वर जगन्नाथ भिल याला सहभागी करुन घेण्याचे ठरवले. १९ जूनच्या रात्री संजय भिल व ज्ञानेश्वर भिल या दोघा मित्रांनी अंध हरचंद यास दारु पिण्याचे आमिष दाखवले. आपण तिघे जण दारु पिण्यासाठी बाहेर जाऊ असे त्याला संजयने म्हटले. दारु पिण्याचे आमंत्रण मिळताच हरचंदची कळी खुलली. तो सायंकाळच्या वेळी दोघांसोबत दुचाकीवर ट्रिपलसिट जाण्यास तयार झाला. संजय व ज्ञानेश्वर या दोघांनी त्याला मोटारसायकलवर ट्रिपलसिट बसवले. तिघे जण सोनगीर येथील हॉटेल मानसी येथे आले. याठिकाणी तिघांनी मनसोक्त मद्यपान केले. मद्यपान केल्यामुळे तिघे जण आपले भान जवळपास विसरले होते. मद्याच्या नशेत असलेल्या हरचंद यास वाटेत तापी नदीच्या पाण्यात फेकून देण्याचे दोघांचे नियोजन होते. मात्र तिघांनी मोठ्या प्रमाणात मद्यपान केले होते. त्यामुळे मद्याच्या अंमलाखाली जात असतांना मोटारसायकल हेलकावे खात धावत होती. त्यामुळे दोघांचा नाईलाज झाला. तापी नदी येण्यापुर्वीच हेलकावे खाणारी मोटारसायकल जागेवरच महामार्गवरील तापी नदीच्या पाईपलाईनजवळ थांबवण्यात आली. तेथे दोघांनी मद्याच्या नशेतील हरचंद यास चांगले ठोकून काढले. तु त्या महिलेसोबत लगट करतो आणि माझी बदनामी देखील करतो असे म्हणत संतापलेल्या संजयने हरचंदवर राग काढण्यास सुरुवात केली. तापी नदीतून जाणाऱ्या नगरपालिकेच्या पाईपलाईनजवळच असलेल्या मातीत मद्यधुंद हरचंदचा चेहरा संजयने दाबून धरला. त्यामुळे त्याचा श्वास कोंडला गेला. श्वास गुदमरल्यामुळे काही वेळाने हरचंदने आपला जिव सोडला. हरचंद खरोखर जिवानिशी संपला असल्याची संजय व ज्ञानेश्वर या दोघांनी खात्री करुन घेतली. तो मृत झाल्याची खात्री झाल्यानंतर दोघांनी त्याचा मृतदेह पाईपलाईनच्या आडोशाला लपवत तेथून पलायन केले. दुसऱ्या दिवशी २० जून रोजी हरचंदचा मृतदेह परिसरातील नागरिकांच्या नजरेस पडला. या घटनेची खबर नरडाणा पोलिस स्टेशनला देण्यात आली. माहिती मिळताच नरडाणा पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक मनोज ठाकरे आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. मयत हरचंदचा मृतदेह पोलिसांसह सर्वांसाठी अनोळखी होता. या प्रकरणी सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. मृतदेह उत्तरीय तपासणीकामी रुग्णालयात रवाना करण्यात आला. मृतदेहाच्या अंगावर जखमा नसल्यामुळे हा खून नसावा असे गृहीत धरण्यात आले. उत्तरीय तपासणी अहवालात श्वास गुदमरल्यामुळे मृत्यू झाल्याचे कारण नमुद करण्यात आले. मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम सुरु करण्यात आले. मयत अंध होता अथवा नव्हता हे देखील कुणाला समजू शकले नव्हते. मृतदेहाची ओळख पटवण्याकामी मयताचा फोटो सोशल मिडीयावर व्हायरल करण्यात आला. मृतदेहाची ओळख पटवण्याचे आवाहन पोलिसांकडून सोशल मिडीयाच्या माध्यमातून करण्यात आले. दरम्यान टोल नाक्यावरील एका व्यक्तीने सोशल मिडीयावर व्हायरल झालेल्या फोटोतील तरुणाला ओळखले. मयत हा हरचंद भिल असून तो कापडणे येथील रहिवासी असल्याचे टोल नाक्यावरील त्या कर्मचाऱ्याने पोलिसांना सांगितले. तो कर्मचारी देखील कापडणे येथील रहिवासी होता. अशा प्रकारे मयताची ओळख पटली. मयताची ओळख पटल्यामुळे त्याच्या भावाला पोलिस स्टेशनला बोलावण्यात आले. मयत हरचंद याच्या भावाने स.पो.नि. मनोज ठाकरे यांना सांगितले की आदल्या दिवशी १९ जून रोजी मयत हरचंद हा गावातील संजय भिल याच्यासोबत त्याच्या मोटारसायकलवर बसून गेला होता. या माहितीच्या आधारे कापडणे गावातील रहिवासी मात्र रजेवरील पोलिस कर्मचा-याला हा प्रकार कळवण्यात आला. त्या कर्मचाऱ्याने देखील तत्परता दाखवत पळून जाण्याच्या बेतात असलेल्या संजय भिल यास ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी त्याला ताब्यात घेत चौकशीकामी नरडाणा पोलिस स्टेशनला आणले. त्याला स.पो.नि. मनोज ठाकरे यांच्यासमक्ष हजर करण्यात आले. त्याने दिलेल्या माहितीनुसार त्याचा साथीदार ज्ञानेश्वर भिल याचे देखील नाव समोर आले. त्याला देखील चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. दोघांनी आपला गुन्हा आणि घटनाक्रम कबुल आणि कथन केला. आपले प्रेम असलेल्या महिलेसोबत मयत हरचंद लगट करत असे. तसेच तिची तो बदनामी करत असे. या रागातून संजय भिल याने ज्ञानेश्वर भिल याच्या मदतीने खून केल्याची कबुली पोलिसांना मिळाली. या घटनेप्रकरणी २१ जून रोजी देवा भिवा भिल यांच्या फिर्यादीनुसार संजय भिल व ज्ञानेश्वर भिल या दोघांविरुद्ध नरडाणा पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ६८/२१ भा.द.वि. ३०२, ३४ नुसार दाखल करण्यात आला. संजय भिल याचे गावातील एका महिलेसोबत असलेल्या प्रेमसंबंधाची मयत हरचंद याने चर्चा केली होती. त्यामुळे संजयची बदनामी झाली. त्यामुळे संजयने ज्ञानेश्वरच्या मदतीने हा खून केल्याबाबतचा आशय मयत हरचंदचे वडील देवा भिवा भिल यांनी फिर्यादीत नमुद केला. दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला दोघांना पोलिस कोठडी सुनावली. दोघे आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास नरडाणा पोलिस स्टेशनचे स.पो.नि. मनोज ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक शरद पाटील, पो.उ.नि. घनश्याम मोरे, हे.कॉ. प्रकाश माळी, पोलिस नाईक सचिन वाघ, बागले, पो.कॉ. योगेश पाटील, चालक रामेश्वर सुर्यवंशी, सुशील पाटील आदी करत आहेत.

### रस्त्यात अडवणारे लुटारू काळ ...

गावचे बीट एएसआय. नारायण पवार यांना माहिती दिली.स.फौजदार नारायण डपलवाड यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ वलांडी शिवाराकडे धाव घेतली. वलांडी शिवर बेटाच्या पश्चिम बाजूला लोकांनी गर्दी केली होती. गर्दीला पाहून नेमक काय घडल आहे हे बघण्यासाठी रस्त्यावरून येणारी जाणारी लोक घटनास्थळाकडे जात होते. स.फौजदार नारायण डपलवाड यांनी घटनास्थळ गाठले. घटनास्थळावरील प्राथमिक आढावा घेत त्यांनी देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चितांबर कामटेवाड यांना वर्दी दिली. घटनेची माहिती मिळताच देवणी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक चितांबर कामटेवाड पोलीस हेडकॉन्स्टेबल टेबल विनय कांबळे ,सर्फराज गोलंदाज, गणेश भुसारे यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. काही वेळातच देवणी पोलीस ठाण्याची पोलीस व्हॅन वलांडी शिवारात दाखल झाली. पोलिसांना पाहताच लोकांनी काढता पाय घेतला. वलांडी शिवारातील एका शेतात ३५ ते ४० वर्षीय इसम रक्ताच्या थारोळ्यात उताना पडला होता. त्याच्या अंगात लाल शर्ट आणि निळी जीन्स होती. त्याच्या उजव्या कपाळाला डोक्यात तोंडावर रक्ताचे डाग दिसत होते. मयत आणि मारेकरी बरीच झटापट झाल्याच्या खुणा दिसत होत्या.मयताचा चेहरा मातीने माखलेला होता. मारेकर्यांनी दगडाने ठेचून त्याचा खून केला आसल्याचा प्राथमिक अंदाज पालिसांकडून वर्तविण्यात येत होता. देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चिंताबर कामठेवाड यांनी घटनेची प्राथमिक माहिती घेतली. दरम्यान लातूर जिल्हा अपर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव आणि निलंगा उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेशकुमार कोल्हे घटनास्थळी दाखल झाले. उपस्थित लोकांकडून त्यांनी घटनेचा प्राथमिक माहीती घेतला. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना योग्य त्या सूचना देऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी पंचनाम्याला सुरुवात केली. सर्वप्रथम पोलिसांनी मयताची ओळख पटवण्यासाठी मयताची अंगझडती घेतली तेव्हा त्यांना मयताच्या खिशात एक विजिटिंग कार्ड सापडले, सापडलेल्या विजिटिंग कार्ड वरून पोलिसांनी चौकशी केली असता मयत इसम उदगीर येथील असून त्याचे नाव बालाजी शेषराव बनसोडे उर्फ पाटील असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी तात्काळ मयताच्या नातेवाइकांना संपर्क करून घटनास्थळी बोलावून घेतले. काही तासातच मयताचे नातेवाईक घटनास्थळी दाखल झाली. मयताला पाहताच नातेवाईकांनी विलाप करण्यास सुरुवात केली. पोलिसांनी घटनास्थळाचा सर्व परिसर पिंजून काढला आवश्यक ती माहिती घटनास्थळावरून उपलब्ध करून घेतली. पोलिसांनी प्रेत उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवले. मयताचा भाऊ राजेश शेषराव बनसोडे उर्फ पाटील यांच्या फिर्यादीवरून अज्ञात लोकांनी अज्ञात कारणासाठी बालाजी शेषराव बनसोडे यांचा खुन केल्याचा फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुरंन. १८४ /२१ कलम ३०२ २०१ ३४ भारतीय दंड विधानप्रमाणे दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, निलंगा उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेशकुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चीतंबर कामठेवाडी यांच्या हाती देण्यात आले. दरम्यान पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला देखील समांतर तपासाचे आदेश दिले. पोलिसांनी तपासाचे चक्रे गतिमान केले. देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चीतंबर कांबळेवाडी यांनी या प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम त्यांनी मयत बालाजी शेषराव बनसोडे उर्फ पाटील याचे घर गाठले. नांदेड जिल्ह्याच्या मुखेड तालुक्यातील बिहारीपुर येथील रहिवासी असलेला बालाजी शेषराव बनसोडे ऊर्फ पाटील हा गेल्या दहा वर्षापूर्वी आपल्या पत्नीसह उदगीर मध्ये कामानिमित्त आला होता. उदगीर येथे त्यांना चांगला कामधंदा मिळत गेला. वहानचालक आसल्यामुळे बालाजी बनसोडे यांने काही वर्षातच आपल्या इमानादारीवर स्वताची माल वाहतूक पिकअप गाडी घेतली. कामधंदा चांगला मिळत गेल्यामुळे तो उदगीर येथे स्थायिक झाला. त्याला एक मुलगा व दोन मुली अशी आपत्ती ही झाले. वाहन चालक म्हणून काम करणाऱ्या बालाजी बनसोडे याने काही दिवसापुर्वी आणखी एक मालवाहू पिकप टेम्पो देखील खरेदी केला. तो दोन्ही वाहनातून व्यापाऱ्यांच्या व शेतकऱ्यांच्या गरजेनुसार मालवाहतूक करीत होता. उदगीर शहरापासून जवळ असलेल्या वलांडी, देवनी, निलंगा, अहमदपूर, भागात तो मालवाहतुकीचा व्यवसाय करू लागला.देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सितंबर कामठेवाडी यांनी सुरुवातीला बालाजी बनसोडे उर्फ पाटील यांची कुणासोबत दुष्मानी अथवा जुने वाद होते का याची माहिती जाणून घेतली. तसेच त्यांच्या नातेवाइकाकडून बालाजी याचे अनैतिक संबंध होते का याची देखील चौकशी केली. मात्र चौकशी दरम्यान बालाजी हा सरळ स्वभावी आणि कष्टाळू व्यक्तिमत्त्वाचा असल्याची माहिती समोर आली. त्याला कुठलेही व्यसन नसल्याची देखील माहिती समोर आली. आपला कामधंदा भला आपले घर भले असाच तो विचाराचा असल्याने तो कुणाच्याही कामात दखल अंदाजी करत नसल्याची माहीती समोर आली. दरम्यान १५ जून २०२१ रोजी तो सकाळी उदगीरहून निलंगा येथे माल वाहतूक करणार होता. ठरल्याप्रमाणे तो सकाळी उदगीरहून वलांडी मार्गे निलंग्याला गेला. रात्री सात वाजण्याच्या सुमारास बालाजी बनसोडे यांच्या पत्नीने बालाजीला फोन करून कुठे आहात असे विचारले तेंव्हा मी वलांडीजवळ आलो आहे. लवकरच घरी येतो असे फोनवरून सांगीतले. त्या रात्री ते घरी आले नाहीत एवढी माहीती पोलिसांनी हास्तगत केली. मात्र घटनेनंतर मयत बालाजी बनसोडे याचे पिकअप वाहून गायब आसल्याने बहूतेक वाटमारीतून हा प्रकार घडला आसल्याचा अंदाज बांधला.मिळालेल्या माहीतीवरून पोलिसांनी तपासाची दिशा ठरवीली. मारेकऱ्यांनी बालाजी बनसोडे उर्फ पाटील यांचा खून अतिशय शिताफीने आणि कुठलाही मागमूस मागे न ठेवता घडवून आणला होता. देवणी पोलीस या खुनाचा उलगडा करण्यासाठी प्रत्येक बाजूचा सूक्ष्म अभ्यास करत होते. मात्र पोलिसांच्या हाती कुठलाच ठोस पुरावा मिळत नव्हता. ज्या दिवशी बालाजी बनसोडे यांनी निलंग्याला माल वहतूक केला त्या सर्व व्यापाऱ्यांची थेट घेवून अधिक माहीती जाणून घेतली मात्र पोलिसांना कुठला धागा हाती लागला नाही. पोलिसांनी उदगीर ते वलांडी व निलंगा रस्त्यावर आसलेल्या सगळ्याच सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी केली मात्र पोलिसांच्या हाती काहीच लागले नाही. देवणी पोलिसांनी सर्वच बाजूचा सुक्षम अभ्यास करत माहिती आणि तंत्रज्ञानाचा आधार घेतला. तसेच खास खबर यांना कामाला लावले. या खून प्रकरणातील प्रत्येक माहिती पोलिस हस्तगत करण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करीत होते. बालाजी हा सर्व स्वभाव आणि मनमिळावू कष्टाळू असल्याने व त्याची कोणा सोबतच दुष्मानी नसल्याने हा खून बहुतेक वाटमारीतून झाला असल्याचा प्राथमिक अंदाज देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड मनात घोळत होता. यासाठी देवणी पोलिसांनी वाटमारी करणारे व रडारवर असलेल्या गुन्हेगारांर्च्या प्रत्येक हालचालीवर बारीक लक्ष केंद्रित केले. वाटमारी करणाऱ्यांना ताब्यात धेवून चौकशी केली मात्र कुठेच धागा लागला नाही.तसेच बेपत्ता वहानाचाही कसून तपास सुरू केला. दरम्यान स्थानिक गुन्हे शखेच्या पोलिस पथकाला एका गुप्त माहिती आधारे मयत बालाजी बनसोडे याचे वहान औया तालूक्यातील निलंगा मोडवर आसलयाची माहिती मिळाली. यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी औसा शहरातून मयत बालाजी बनसोडे याचे चोरी गेलेले वहान जप्त करून तपासाचा पहिला टप्पा पुर्य केला. बालाजी बनसोडे खून प्रकरणाचा तपास जलद गतीने चालू आताना बालाजी बनसोडे खून प्रकरणातील काही संशयीत आरोपी देवणी तालुक्यातील हेळंब परीसरात लपुन बसल्याची खात्रीशिर माहीती मिळाली. यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी देवणी तालुक्यातील हेळंब गावात सापळा लावून पळून जाण्याच्या बेतात आसलेल्या विकास रघुनाथ सूर्यवंशी (वय २९ वर्ष राहणार हेळंब)व ज्ञानेश्र्वर भारत बोरसुरे (वय २१ वर्ष यांना मौजे हेळंब) या दोघा संशयीताना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता सुरूवातीला त्यांनी असमाधानकारक उत्तरे दिली. त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी आपल्या अन्य एका साथीदाराच्या मदतीने खून केल्याची कबूली दिली. तब्बल २१ दिवस अथक परिश्रम करून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला यश आले. नमूद आरोपींनी सांगितले की, आम्हास उदगीर येथे जायचे असल्याने आम्ही बालाजी शेषराव बनसोडे याचे वाहनास आडवे येऊन हात करून थांबविले होते. त्याच कारणावरून आमच्यात वाद झाला. त्या कारणावरून आम्ही बालाजी शेषराव बनसोडे याचे डोक्यात दगड घालून गंभीर जखमी केले होते. त्यात तो मरण पावला त्या नंतर त्यास उचलून एका शेताच्या बांधाच्या बाजूला टाकले व त्याचे खिशातील मोबाईल फोन, पाकीट व त्याचे वाहन घेऊन फरार झालो. या प्रकरणातील फरार आरोपी दत्ता श्रीमंगले याच्या मागावर पोलिसांचे एक पथक असून त्याला लवकर गजाआड करू असा विश्वास पोलिसाकडून व्यक्त करण्यात येत आहे. सदरील आरोपी हे गुन्हेगारी वृत्तीचे असून त्याच्यावर खून, जबरी चोरी, वाटमारी, मारामारी असे गंभीर गुन्हे दाखल आसल्याची माहीती पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरिता लातूर स्थानिक गुन्हे शाखाचे पोलिस निरीक्षक गजानन भातलवंडे, देवणी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक चितांबर कामठेवाड ,सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी, सफौ संजय भोसले,पोलीस अमलदार राजेंद्र टेंकाळे, रामहरी भोसले, राहुल सोनकांबळे, सदानंद योगी, योगेश गायकवाड ,सचिन धारेकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक खान, पोहेकॉ विनय कांबळे, बुजारे गणेश, सरफराज गोलंदाज, चालक अमलदार जाधव तसेच सायबर शाखेचे साहाय्यक पोलीस निरीक्षक सुरज गायकवाड,पोलीस हवालदार संतोष देवडे ,राजेश कंचे प्रदीप स्वामी, गणेश साठे ,रियाज सौदागर, शैलेश सुळे यांनी परिश्रम घेतले. गुन्ह्याचा अधिक तपास पोलिस ठाणे देवणी येथील पोलिस निरीक्षक चितांबर कामठेवाड हे करीत आहेत.

### विश्वास ठेवून त्याच्यावर घर मालक ...

रमेश हिरालाल श्रीराव हे स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या कुसुंबा शाखेत व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. दोन वर्षापुर्वी ते सेवानिवृत्त झाले होते. कुठल्याही प्रकारचे व्यसन नसलेल्या रमेश श्रीराव यांनी चांगल्याप्रकारे बचत केली होती. त्यांची पत्नी प्रमिला या धुळे तालुक्यातील मेहेरगाव जिल्हा परिषद शाळेत शिक्षीका आहेत. रमेश श्रीराव यांची पेन्शन आणि पत्नी प्रमिला यांचा पगार असे उत्पन्नाचे दुहेरी स्त्रोत असल्यामुळे श्रीराव दाम्पत्य सुखात जिवन व्यतीत करत होते. धुळे शहराच्या चितोड रोड लगत 'राजहंस' कॉलनीत रमेश श्रीराव यांनी आशिर्वाद नावाची एक टोलेजंग इमारत बांधली होती. या इमारतीत ते पत्नी प्रमिलासह रहात होते. त्यांच्या दोन्ही विवाहीत मुली सासरी सुखाने संसार करत आहेत. एकंदरीत रमेश श्रीराव यांचे सेवानिवृत्त जिवन व्यवस्थित सुरु होते. श्रीराव दाम्पत्याने त्यांच्या इमारतीचा खालचा मजला शिवनाथ मेमाने यांना भाड्याने दिला होता. शिवनाथ मेमाने हे नाशिक जिल्ह्याच्या चांदवड तालुक्यातील भोये येथील मुळ रहिवासी होते. शिवनाथ मेमाने हे नजीकच्या जुन्नर गावातील मुकबधीर शाळेत शिक्षक म्हणून नोकरीला होते. नोकरी निमीत्ताने शिवनाथ मेमाने धुळे येथे राहण्यास आले होते. शिक्षणाच्या निमीत्ताने शिवनाथ मेमाने यांची दोन्ही मुले परगावी शिक्षण घेत आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे मेमाने यांचा अजिंक्य नावाचा मुलगा त्यांच्याकडे राहण्यास आला होता. रमेश यांना कसलेच व्यसन नसल्याने त्यांना निवृत्तीनंतर बरेच पैसे मिळाले होते. ते पैसे त्यांनी बँकेतच ठेवले होते. रमेश यांची पत्नी प्रमिला धुळे तालुक्यातील मेहेरगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिका म्हणून नोकरी करत असल्याने तिला मिळणाऱ्या पगारात दोघांचा खर्च भागून काही रक्कम शिल्लक रहात असते. तर दुसरीकडे त्याच्या घरात भाडेतत्वावर रहाणाऱ्या शिवनाथ मेमाने यांची आर्थिक स्थिती मात्र जेमतेम असल्याने मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी आपले नाशिक येथील घर विकून त्यांनी धुळ्यातील श्रीराव यांचे घर भाड्याने घेतले होते. शिवनाथ मेमाने यांचा कोपरगावात शिक्षण घेणारा मुलगा अजिंक्य हा कोरोनामुळे चार महिन्यापासून वडीलांकडे धुळ्यातच रहात होता. वेळप्रसंगी तो रमेश आणि त्यांची पली प्रमिला यांना मदत करायचा. बाजारहाट करायला जातांना रमेश हे अजिंक्यला मदतनीस म्हणून स्वत:बरोबर वेवून जात. कुठेही, कोणत्याही कारणास्तव बाहेर जायचे असले की रमेश हे अजिंक्यला सोबत घेवून जात. अगदी बँकेतून पैसे काढायला जातांनाही अजिंक्य श्रीरावबरोबरच असायचा, रमेश आणि त्यांच्या पत्नीशी अजिंक्यची गट्टी जमली होती. श्रीराव दाम्पत्याशी अजिंक्यचे भावनात्मक नाते जुळून आले होते. श्रीराव पती-पत्नी अजिंक्यला मुलाप्रमाणे वागणूक देत असत. रमेश यांना पहाटे मॉर्निग वॉकला जाण्याची सवय होती. मॉर्निग वॉक करून आल्यानंतर ते बंगल्याच्या गच्चीवर योगा, प्राणायम आणि ध्यानधारणा करत असत. काही वेळा अजिंक्यही त्यांच्यासोबत असे. त्यांची पत्नी प्रमिला नोकरीनिमित्त शाळेत गेल्यानंतर ते घरी एकटेच असायचे. काही वेळा ते अजिंक्यला आपल्या खोलीत बोलावून घेत आणि त्याच्याशी मनसोक्त गप्पा मारीत. श्रीराव यांचे वय ६० आणि अजिंक्यचे वय २२ होते. दोघांच्या वयातील अंतर खूप होते, तरी श्रीराव अजिंक्यला मुलगा मानत, त्यामुळे गप्पा मनमोकळ्या होत. गप्पांच्या ओघात श्रीराव हे आपली सर्व पार्श्वभूमी, नोकरीतले अनुभव, त्यांच्या नवरा-बायकोचे अनुभव, त्यांच्यावर आलेली संकटे, दोघा मुलींच्या सासरसंबंधीची माहिती श्रीराव अजिंक्यशी बोलतांना त्याला सांगत. आपल्याला कोणत्याही प्रकारचे व्यसन नसल्याने माझ्या पगारातील रक्कम दर महिन्याला शिल्लक रहात होती, त्यामुळे खूप बचत झाली, शिवाय सेवानिवृत्तीनंतर मिळालेली रक्कमही मोठी आहे. ती रक्कमसुद्धा बँकेतच पडून आहे. दोन्ही मुलींच्या सासरची आर्थिक स्थिती सुसंपन्न असल्याने त्यांनाही माझ्याकडून अपेक्षा नाही, त्यामुळे सोबत असलेल्या पैशांचे काय करावे? कसे गुंतवावे? या गप्पासुद्धा श्रीराव अजिंक्यशी शेअर करत. परिणामतः अजिंक्यला रमेश यांच्या संबंधीची इत्यंभूत माहिती जात होती. अजिंक्यच्या घरची म्हणजेच शिवनाथ मेमाने यांची आर्थिक स्थिती खूपच नाजूक होती, त्यात कोरोनामुळे ते अधिक अडचणीत आले होते. पगार जेमतेम होता. त्यात कोरोनाने अडथळा निर्माण केला होता, त्यामुळे शिवनाथ मेमाने डबघाईला आले होते. श्रीराव यांचे घर भाड्याने घेवून सहा महिने झाले होते. त्यातील चार महिन्याचे भाडे थकले होते. भाडे थकल्याने श्रीराव चिंतित झाले होते. ते भाड्यासाठी अजिंक्यला टोकू लागले. अजिंक्यच्या वडीलांना सिगारेट ओढण्याचे व्यसन होते. सिगारेटचा वास श्रीराव यांना सहन होत नव्हता. शिवनाथ त्यांच्या घरात सिगारेट ओढायचे, पण वास वरच्या मजल्यावर रहाणाऱ्या श्रीराव यांच्यापर्यत पोहोचायचा, त्यामुळे श्रीराव अस्वस्थ होत असत. त्यासंदर्भातही श्रीराव अजिंक्यला टोचून बोलू लागले. घर भाड्याचे पैसे द्यायला नाहीत, मग सिगारेट घ्यायला पैसे कुठून येतात? असा प्रश्न विचारुन श्रीराव अजिंक्यला अपमानीत करु लागले होते. आपल्या घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने श्रीराव यांचे घर सोडून दुसरीकडे जाता येत नव्हते. त्यामुळे अजिंक्य अस्वस्थ होता. घरची आर्थिक स्थिती अजिंक्यला माहित असल्याने तो वडीलांकडेही भाड्यासंबंधी पाठपुरावा करू शकत नव्हता. परिणामतः गेल्या काही दिवसांपासून अजिंक्य बेचैन होता. काही दिवसांपूर्वी श्रीराव यांची भेट होताच अजिंक्यला आनंद व्हायचा, पण आता तो श्रीरावची भेट टाळायला लागला होता. भेट होताच आपला पानउतारा ठरलेला असल्याने भेट न घेण्यात तो समाधान मानत होता. पण असे किती दिवस चालायचे? एक ना एक दिवस राम म्हणावे लागणार होते. हा गुंता सुटणार कसा? या विचाराने अजिंक्यच्या डोक्यात काहूर माजविले होते. तो पर्याय शोधू लागला होता. श्रीराव यांचे सर्व आर्थिक स्त्रोत अजिंक्यला ज्ञात झाले होते. साठलेल्या पैशांचे करायचे काय? अशी चिंता श्रीराव यांना सतावत होती. हे स्वतः श्रीराव अजिंक्यला सांगत, असे असतांना ते थकलेल्या भाड्यासाठी आपला पानउतारा करतात याची बोचणी अजिंक्यला अस्वस्थ करत होती. या अस्वस्थेपोटी अजिंक्य वेगळाच विचार करू लागला. श्रीराव यांच्या घराशी, घरातल्या प्रत्येक वस्तूशी, पैसे-दागिने ठेवण्याच्या कपाटांशी अजिंक्यची ओळख झाली होती. श्रीराव आणि त्याच्या पत्नीचा गेम केला तर श्रीरावकडून होणारा अपमान तर टळेलच, शिवाय जे काही धन उपलब्ध होईल, त्यातून आपल्या कुटुंबाची आर्थिक दुर्बलता दूर करता येईल. हा राक्षसी विचार अजिंक्यच्या मनात घर करून राहिला आणि तो त्याने अंमलात आणण्याचा प्रयत्नही केला. मंगळवार दि. २२ जून २०२१ चा तो दिवस होता. नित्यनियमाप्रमाणे श्रीराव मॉर्निग वॉकला जावून तेंव्हा साधारणतः सकाळचे सहा वाजले होते. मॉर्निग वॉकनंतर श्रीराव सरळ गच्चीवर गेले व गच्चीवर त्यांनी योगा, प्राणायम आणि ध्यानधारणेला सुरूवात केली. श्रीराव हे योगा करण्यात व्यग्र असतांना साडेसहा वाजण्याच्या दरम्यान राक्षसरूपी अजिंक्यने गच्चीवर प्रवेश केला. हातातील लोखंडी फावड्याने मागून रमेश श्रीराव यांच्या मस्तकावर जबरदस्त प्रहार केला. अजिंक्यने केलेल्या प्राणघातक प्रहाराने श्रीराव रक्तबंबाळ अवस्थेत जमिनीवर कोसळले. एवढ्यावर अजिंक्य थांबला नाही तर त्याने गच्चीवर असलेला लोखंडी पाईप पुन्हा श्रीराव यांच्या मस्तकात प्रहार केला. त्या प्रहाराने श्रीराव कायमचे शांत झाले. श्रीराव यांची पत्नी खाली स्वयंपाकघरात पोळ्या लाटण्यात व्यग्र असतांना अजिंक्यरूपी हैवान स्वयंपाकघरात घुसला. त्याने स्वयंपाकघरातील काटेरी चमचे घेवून ते प्रमिलाच्या गळ्यात घुसवून तिला गतप्राण करण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने त्याचा वार चुकला, प्रमिला सावध झाली. जीव एकवटून तिने अजिंक्यला बाजूला ढकलले. ती घराबाहेर येवून मदतीसाठी हाका मारू लागली. गच्चीवर योगसाधना करणारा नवरा मदतीला धावून येईल अशी प्रमिलाची अपेक्षा होती, पण नवऱ्याऐवजी शेजारी-पाजारी, प्रमिलाच्या आकांताने तिच्या मदतीला धावून आले. त्यावेळी अजिंक्य स्वयंपाक खोलीतून बाहेर पडला होता. प्रमिलाच्या सांगण्यावरून लोकांनी त्याला ताब्यात घेऊन धरून ठेवले. गच्चीवर योगा करणारे श्रीराव खाली का आले नाहीत अशी शंका आल्याने स्वतः प्रमिला आणि शेजारी-पाजारी गच्चीवर गेले. पहातात तर काय? श्रीराव रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडले होते. शेजारीच्या लोकांनी तात्काळ शहर पोलीस स्टेशनशी संपर्क साधून वस्तुस्थितीसंबंधी खबर दिली. भाडेकरूच्या मुलाने घरमालकाचा खून केल्याचे कळताच शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष तिघोटे, उपनिरीक्षक दादासो पाटील, हेमंत राऊत, नाना आखाडे, कॉन्स्टेबल भिका पाटील, मुक्तार मन्सुरी, मनिष सोनगरे, कमलेश सुर्यवंशी, अविनाश कराड, नितीन अहिरे, संदीप पाटील, पंकज खैरमोडे, राहुल पाटील, संदीप पाटील, सतिश कोठावळे, प्रविण पाटील, जगदीश पाटील आदींनी आशिर्वाद बंगल्याभोवतीची गर्दी पांगवून घटनास्थळाचा व मृतदेहाचा पंचनामा केला, त्यानंतर मृतदेह पोस्टमार्टमसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात पाठवला. प्रमिला श्रीराव हिच्या फिर्यादीनुसार धुळे शहर पोलिसांनी अजिंक्यविरुद्ध भा.दं.वि. ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्याच्या हातात बेड्या ठोकल्या.

# अहमदपूरमध्ये वाळू माफियांची दादागिरी



**अहमदपूर/फिरोज शेख**

अहमदपूरात वाळू माफि यांच्या वाढत्या दादागीरीमुळे जनसामान्याच दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अहमदपूर तालुक्यातील मौजे थोडगा येथील अमोल पाटील यांनी फिर्याद दिली आहे की, तहसीलदार हे वाळुपंचनाम्या साठी आले असता त्यांच्या समोर धोंडीबा खांडेकर, रसिका खांडेकर, शिवाजी खांडेकर यांनी शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्यावरुन त्यांच्यावर कलम ५०४,५०६,३४ भादवी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की अमोल अशोकराव पाटील रा.थोडगा यांनी अवैध वाळु संदर्भात तहसीलदार यांना वेळो वेळी माहिती दिली होती. त्यासंदर्भात दोन ते दिन दिवसानंतर मी पुन्हा फोन केला असता तहसीलदार हे मोघा येथे आले असुन तुम्ही गायरानात या आणी साठवन केलेल्या वाळुचे ठिकाण दाखवा असे मला फोनवरुन सांगीतल्यावरुन मी घरून निघुन घटनास्थळी पहोचलो असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तहसीलदार व अन्य अधिकारी घटना स्थळी आले असता तेथे धोंडिबा शिवाजी खांडेकर, रसिका शिवाजी खांडेकर,शिवाजी नरसिंग खांडेकर यांनी शिवागाळ करुन तुच आमची माहिती देत आहेस तुझ्या वर खोटे गुन्हे दाखल करु व तु एकटा भेट तु जिवंत कसा राहतो ते बघतो अशी धमकी दिली आसल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यावरून दि.७ जुलै रोजी अहमदपूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान अहमदपूर तालुक्यात अवैध वाळु माफियांचा सुळसुळाट झाला आसुन महसुल विभागालाही हा सुळसुळाट कसा काय आवरता येत नाही हा गंभीर प्रश्न नागरिकातून चर्चीला जात आहे. घडलेल्या घटनेबद्दल फिर्यादी अमोल पाटील यांच्याकडून आमच्या प्रतिनिधीने माहीती घेतली असता अमोल पाटील म्हणाले की, अवैध वाळुचा मोठ्या प्रमाणात साठा गोळा करुन विक्री करण्यात येत असुन मी या अवैध वाळुची साठायाबाबत फोनवरुन तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांना तक्रार केली होती. त्यानुसार ते घटना स्थळी पंचनाम्या साठी आले असता त्यांच्या समक्ष मला खांडेकर परिवाराने शिवीगाळ करुन जिवंत मारण्याची धमकी दिली असुन माझ्यावर खोटे गुन्हे दाखल करु असे सांगितले असुन माझ्या जिवाला धोका आहे तसेच अवैध वाळू तस्करी करणाऱ्याची माहिती दिणे चुकेचे आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. तसेच वाळु माफीयांवर कठोर कार्यवाही व्हावी अशी मागणी केली. दरम्यान अहमदपूर तालुक्यात अवैध वाळु उपसा खुप मोठ्या प्रमाणात केला जात असुन एखाद्या दक्ष नागरीकांने सदरील वाळूसाठ्याची माहीती महसूल विभागाला दिल्यास वाळु माफियाची टोळी एकत्र येऊन दबाव टाकतात धमक्या देत आहेत. या वाळु माफियांवर कारवाही करण्यासाठी शासन, प्रशासन आळा घालण्यास सध्यस्थितीत तरी कमकवुन झाल्याचे चित्र दिसुन येत आहे. ४५ ते ५० हजाराला ५ ब्रासचे टिप्पर विक्री केले जात असुन वाळु मुळे मागील काळात एका व्यक्तीने आपला जिव गमावला आहे वाळु संदर्भात कडक निर्णय घेण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# चंदगड तालुक्यात दुसरे पोलीस स्टेशन उभारण्यासंदर्भात शासन सकारात्मक!



**मुंबई/प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यात दुसरे पोलीस स्टेशन उभारण्यासंदर्भात शासन सकारात्मक असून याबाबत उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्याकडे बैठक घेणार असल्याची माहिती गृह राज्यमंत्री (ग्रामीण) शंभुराज देसाई यांनी दिली. गृह राज्यमंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. बैठकीला आमदार राजेश पाटील, पोलीस महासंचालक संजय पांण्डेय, पोलीस महासंचालक (गृहनिर्माण) विवेक फणसळकर, गृह विभागाचे प्रधान सचिव संजय सक्सेना, अतिरिक्त पोलीस महासंचालक एस जगन्नाथन, वित्त विभागाचे सह सचिव विवेक दहीफळे, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. गृह राज्यमंत्री श्री. देसाई म्हणाले, चंदगड हा भाग डोंगराळ असून पोलीस ठाण्यात पोहोचण्यासाठीचा वेळ वाचविण्यासाठी तसेच या भागातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी दुसरे पोलीस स्टेशन उभारण्याची मागणी अनेक वर्षापासून होत आहे. या मागणीची दखल घेत कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड येथे दुसरे पोलीस स्टेशन आवश्यक मनुष्यबळासह सुरु करण्याबाबत शासन सकारात्मक असून त्यासाठी विशेष बाबमधून मंजूरी घेण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार, गृहमंत्री आणि गृहराज्यमंत्री (शहरे) यांची संयुक्त बैठक घेण्यात येईल, असेही श्री. देसाई यांनी सांगितले.

# पोलीस निरीक्षक संपत पवार व एपीआय रोहन खंडागळे अँटीकरप्शनच्या जाळ्यात

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



मुरूम उपसा प्रकरणात आरोपीला मदत करतो म्हणून तब्बल साडेसात लाखांची लाच मागणाऱ्या सलगर वस्ती पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संपत पवार व सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहन खंडागळे यांना शुक्रवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. सलगर वस्ती पोलिस ठाणे अंतर्गत अवैद्य मुरूम उपसा प्रकरणात गुन्हा दाखल होता, सदर आरोपीला या गुन्ह्यात मदत करतो म्हणून वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपत पवार व त्यांचे सहाय्यक पोलीस निरीक्षक खंडागळे यांनी साडेसात लाखाच्या लाचेची मागणी केली होती, एवढ्या मोठ्या लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यात आली. शुक्रवारी रात्री साडेसातच्या सुमारास जुना पुना नाका याठिकाणी लाच घेताना अँटी करप्शन विभागाने छापा टाकला. दोन पोलिस अधिकाऱ्यांना ताब्यात घेतले असून त्यांच्याविरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, रात्री उशिरापर्यंत कारवाई सुरू असल्याची माहीती मिळत आहे.

# वाडा येथे सेंद्रिय शेती आधारित कार्यशाळा संपन्न

**वाडा/प्रतिनिधी**





महिला आर्थिक विकास महामंडळ पालघर व जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रीन ग्लोब बायो टेक्नोलॉजी, पुणे तर्फे सेंद्रिय शेती आधारित कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. शुक्रवारी (दि.९ जुलै) वाडा पंचायत समिती प्रशिक्षण सभागृह येथे कार्ययशाळा संपन्न झाला. सदर कार्यशाळेत सेंद्रिय शेतीचे महत्व हर्षल बोरसे, संचालक, ग्रीन ग्लोब बायो टेक्नोलॉजी पुणे यांनी शेतकऱ्यांना पटवून दिले. तसेच कंपनीच्या प्रोडक्ट बाबत माहिती देऊन कमी खर्चात जास्त उत्पन्न मिळून जमिनीची सुपीकता टिकून राहते, याबाबत मार्गदर्शन केले. संजय घरत, कृषी पर्यवेक्षक, तालुका कृषी कार्यालय वाडा, यांनी सेंद्रिय शेतीचे प्रकार सांगून, सेंद्रिय खत बनविण्याबाबत मार्गदर्शन केले. हरीश बांगर, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी विषमुक्त शेतीची चळवळ सर्व शेतकऱ्यांनी केली पाहिजे आणि ती काळाची गरज आहे . हे पटवून दिले . तसेच माविमने महिला फार्मर प्रोड्युसर कंपनी सुरु करण्याचे आवाहन केले. माविम अंतर्गत स्वप्नसाकार व माहेर सि.एम.आर.सी ने दिलेल्या स्मार्ट प्रोजेक्ट चे लवकरच मंजूर होण्याचे आश्वासन दिले. वैभव पाटील, सचिव, वाडा कोलम व बहुउद्देशीय शेती उत्पादन सहकारी संस्था यांनी वाडा कोलम सेंद्रिय शेती बाबत आपले अनुभव कथन केले. या कार्यशाळेत एल.के.राऊत कृषी अधिकारी, कार्यालय वाडा, हरीश बांगर तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, तालुका कृषी कार्यालय वाडा, संजय घरत, कृषी पर्यवेक्षक, तालुका कृषी कार्यालय वाडा, तसेच हर्षल बोरसे, संचालक, ग्रीन ग्लोब बायो टेक्नोलॉजी पुणे, रुपेश पाटील, संचालक, ग्रीन ग्लोब बायो टेक्नोलॉजी पुणे दिपक भागवत, राज्य व्यवस्थापक, ग्रीन ग्लोब बायो टेक्नोलॉजी पुणे व अरविंद गोरे सर, व.जि.स.अधिकारी माविम. आदी अधिकारी उपस्थित होते.

# कर्नाटक राज्यातून बोगस पदविका धारक औषधी दुकान दाराकडून रुग्णांची लुटमार

**देवणी/शकिल मनियार**

तालुक्यात कर्नाटक राज्यातुन बोगस औषधी शास्त्रांचा पदविका घेऊन औषधी दुकानदार डॉक्टरांच्या मदतीने रुग्णांना लुटण्याचा धंदा जोरदार चालु आहे. यावर कुणाचेही नियंत्रण नसल्याने मोठ्या प्रमाणात पिळवणूक केली जात आहे. मनुष्यबळ नसल्याने भेटी देणे शक्य होत नसल्याचे लातुर अन्न व औषध आयुक्त सुरेश बग्गाड यांचे म्हणणे आहे. शेजारच्या कर्नाटक राज्यातील भालकी, बिदर येथुन औषध शास्त्राची पदविका घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यहार केला जातो. पदविका मिळाल्या नंतर फार्मसी कॉनसिल मुंबई यांच्याकडे राज्य बदली साठी अर्ज केला जातो. यासाठी आवश्यक ते कारण दिले जाते. औषधी दुकान टाकण्यासाठी तीन महिन्याची किंवा या कालावधीत पाचशे तास इंटरशीप अनुभवासाठी आवश्यक असते. असा राज्य मेडिकल कॉनसिल चा नियम असतानाही हे नियम बाजूला सारून नवखे पदविकाधारक ओळखीच्या दुकान दारांकडून अनुभव घेतला असल्याचा पुरावा घेतला जातो. औषध विक्रीचा व्यवसाय सुरू केला जातो. अनुभवी असलेल्या पदविका धारक व्यक्तींची नेमणूक करून व्यवसयाची खाच खळगे अभ्यासले जातात. औषध शास्त्र पदविका दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमात औषध दुकान व्यवसाय व्यवस्थपन व रुग्णालय किल्निकल फार्मसी या दोन विषयावर हा व्यवसाय अवलंबून आहे. सदरचे औषधी दुकानदार कधीच त्या महाविद्यालयात गेलेच नाहीत. त्यामुळे डॉक्टरच्या मदतीने जास्तीत जास्त कमिशन देणाऱ्या औषधी कंपनीचे गोळ्या औषधी रुग्णांना दिले जाते.अधिकची कमाई जास्त झाल्याने कांही औषध दुकानदार दुकाने टाकून विविध राजकीय लोकांची वाढदिवस साजरे करतात व कांहिच अनुभव नसणाऱ्या व्यक्तीस औषध दुकानात बसवुन राजकारणात रमले आहेत. शहरात तर गल्ली बोळात मसाज व हाड जोडणी करणाऱ्या वैद्यांचे केंद्र उभे राहिले तर काहीनी स्वयंघोषित डॉ ही उपाधी लाउन घेतली. घरात औषधी दुकान घरात रुग्णांना सेवा देण्याचा व्यवसाय अनेक वर्षापासून सुरु आहे. या लोकांना कोणत्या पदव्या ना परवाने. एम डी, डी ऑर्थ पदव्या घेतल्या डॉक्टर लोकांना लाजवतील एवढी लाखों रुपयांची माया अवैधरित्या जमविली आहे. औषधी दुकान आणि किराणा दुकानात कोणताच फरक जाणवत नाही. औषधी म्हणून जे वापरले जाते ते या दुकानात असणे आवश्यक असते. सर्रास पणे चॉकलेट, पॉपकॉर्न, बिस्कीट, आइस्क्रीम किंवा इतर खाद्य पदार्थ या दुकानात विक्री केली जाते. अश्या खाद्यपदार्थ विक्री करण्यासाठी फुड परवान्याची आवश्यकता आहे. असा परवाना कोणत्याही दुकानात नाही. औषध निरीक्षकाची प्रत्येक महिन्यात दुकानास भेट असते. सद्या हे पद रिक्त आहे. त्यामुळे कार्यालय व इतर कामाच्या व्यापात दुकानास तुरळक भेट होत असल्याचे आयुक्त बग्गाड यांचे म्हणणे आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चेअरमनपदी दिलीप पाटील

**देवणी/प्रतिनिधी**



येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चेअरमन पदी दिलीप पाटिल नागराळकर यांची तर व्हा चेअरमनपदी बालाजी बोबडे यांची निवड करण्यात आली आहे.ही प्रशासकीय निवड संचालक मंडळाची मुदत संपल्याने केली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकीय संचालक मंडळामध्ये महाविकासआघाडीच्या कार्यकर्त्याची वर्णी लागली आहे. दिलीप मालशेट्टीअप्पा पाटिल नागराळकर चेअरमन, बालाजी भाऊराव बोबडे, अचवला व्हा. चेअरमन, तर पुढील कार्यकर्त्याची संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे. मालबा रामराव घोणसे तळेगांव, बालाजी दिगंबर वळसांगविकर देवणी, गजानन गोविंदराव भोपणीकर भोपनी, ताहेर पाशा खुर्शिद पटेल गुरनाळ, बालाजी बाबुराव गुणाले नागतीर्थवाडी, पांडुरंगकाशिनाथ बिरादार सावरगाव, सूर्यकांत नामदेव भोसले अनंतवाडी, गोरख बालाजी सावंत हेलंब, मकबूल रमजान खान पठाण देवणी (खु)विश्वनाथ धनेगावे मटेगढी, लक्ष्मण बाबुराव हुडे कवठाला, प्रशासकीय संचालक मंडळाची निवड ही वैधकीय मंत्री अमित देशमूख यांच्या शिफारशी नुसार शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटिल सहकार व पणन मंत्री यांनी केली आहे. नवनिर्वाचित संचालक मंडळाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# समाजातील तरुण युवकाने सामाजिक जाणीव ठेवून काम केले पाहिजे तर समाज टिकेल -राजाभाई सुर्यवंशी

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील मौजे वलाडी येथे मांतग समाजाच्या बैठकीत मांतग अस्मिता संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजाभाई सुर्यवंशी यांनी सर्व समाजातील लोकांचे प्रश्न घेऊन लढण्यासाठी सतत प्रयत्न करणार आहे. परंतु मांतग समाजातील जे नवतरुण युवक यांनी समाजातील बारिक गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. आज जे घटना मांतग समाजावरच का घडत आहेत याकडे लक्ष दिले पाहिजे. आज मी माझ्या संघटनेच्या माध्यमातून चार राज्यात काम चालू आहे. महाराष्ट्रात आमची चळवळ खंबीरपणे निस्वार्थपणाणे काम चालू आहे असे प्रखर मत वलांडी येथे बैठकीत बोलताना सांगितले. या बैठकीत मांतग अस्मिता संघर्ष संघटनेचे देवणी तालुका अध्यक्ष गोकुळ दंतराव तसेच वलांडीचे माजी सरपंच रामभाऊ भंडारे, अनंत शिदे, पत्रकार रणदिवे लक्ष्मण, नरसिंग शिदे, माधव शिदे, रवी गायकवाड, बालाजी पाटोळे, होळकर शिरिष, रवी सुर्यवंशी, उध्दव गायकवाड, अमोल गायकवाड, धोडिंबा गायकवाड आर्दीसह यावेळी बैठकीत सामाजातील युवक पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## थोडक्यात वृत्तांत

### वक्फ मंडळाकडून निवडणुकीबाबत आवाहन

मुंबई : महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर मुतवल्ली प्रवर्गातील सदस्याची निवडणुकीद्वारे निवड करण्याकरिता वक्फ संस्थांच्या पात्र मुतवल्लीची/व्यवस्थापकीय समितीच्या नामनिर्देशित सदस्याची मतदारयादी अद्ययावत करण्याबाबत मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिस शेख यांनी आवाहन केले आहे. एक लाख रूपयांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या वक्फ संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मुतवल्ली/नामनिर्देशित सदस्याचे नाव मतदारयादीत समाविष्ट करण्याकरीता सन २०२०-२१ या वर्षापर्यंतचे संबंधित वक्फ संस्थेचे लेखापरीक्षण करून वार्षिक लेखे व त्या अनुषंगिक वर्गणी जमा करावयाची आहे. यासाठीची मुदत वाढविण्यात आली आहे. ही कार्यवाही संबंधीत वक्फ संस्थांनी ३१ जुलै २०२१ पर्यत पूर्ण करावी, असे आवाहन श्री. शेख यांनी केले आहे. राज्यातील सर्व वक्फ संस्थांचे मुतवल्ली/ व्यवस्थापकीय समितीचे सदस्य यांना हे आवाहन करण्यात आले आहे.

### १९ जुलै रोजी महिला लोकशाही दिन

पालघर : महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास शासन विभाग शासन निर्णय क्र. मलोदि-२०१३/प्रक्र.११/मक/दिनांक : ०४/०/२०१३ अन्वये जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच या महिन्याचा महिला लोकशाही दिन हा दि.१९/०७/२०२१ जिल्हाधिकारी माणिक गुरसळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे आयोजित करण्यात येणार आहे. महिला लोकशाही दिनाचा अर्ज जिल्हाधिकारी यांना उद्देशून असावा तालुका महिला लोकशाही दिन टोकन क्र. व तहसिलदारांच्या उत्तराची प्रत अर्जा सोबत जोडण्यात यावी महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवसाच्या अगोदर अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मातोश्री बंगला, आर्यन ग्राउंड च्या शेजारी विष्णू नगर रोड, लोकमान्य पाडा, पालघर ई-मेल dwcdopalghargmail.com फोन नं. ०२५२५-२५७६२२ यांच्याकडे आवश्यक त्या कागद पत्राच्या पुराव्यासह सादर करावा.

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी राहुल क्षिरसागर

लातूर : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती १ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहाने प्रत्येक वर्षी सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने जयंती साजरी केली जाते. याचे औचित्य साधून आज अण्णाभाऊ साठे पूर्णाकृती पुतळा येथे समाजाचे नेते जी.ए.गायकवाड यांच्या उपस्थितीमध्ये बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सर्वानुमते राहुल क्षिरसागर यांची १०१ व्या सार्वजनिक जयंती च्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या बैठकीमध्ये कोरोना महामारी चे सर्व नियम पाळून ही जयंती साजरी करण्याचे ठरले आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०१ व्या जयंतीचे पुढील प्रमाणे कार्यकारणी:- कार्याध्यक्ष विकास कांबळे,सुनील बसपुरे, महादेव रसाळ, आनंदभाई वैरागे, अशोक देडे, सचिव- आदर्श उपाध्ये, पिराजी साठे,उपाध्यक्ष- रवी पेठाडे, बापुसाहेब मगर, नूतन हनुमंते,आशुतोष कांबळे, स्वागताध्यक्ष- जी.ए.गायकवाड, कैलास कांबळे, गोरोबा लोखंडे, अनिल शिंदे, सचिन मस्के, सहसचिव-विष्णू कांबळे,राज क्षिरसागर, रवी कदम,कोषाध्यक्ष- शामभाऊ चव्हाण,सदस्य- राहुल गायकवाड, अजय कांबळे, ईश्र्वर गव्हाणे,राम कसबे,शिवनाथ काळे आदींची सर्वानुमते या बैठकीत निवड करण्यात आली असून निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र स्वागत केले जात आहे.

### स्मिता ढोके घेणार मॅसाच्युसेट्स विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण

लातूर : येथील संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालयात (कॉक्सिट) बीएस्सी. सीएसमधून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेली विद्यार्थिनी स्मिता प्रल्हादराव ढोके हिला पुढील एम. एस. संगणकशास्त्र या पदव्युत्तर शिक्षणासाठी अमेरिकेच्या नॉर्थ बोस्टन येथील मॅसाच्यूसेट्स विद्यापीठात प्रवेश मिळाला आहे. परदेशातील नामांकित विद्यापीठात शिक्षणासाठी गेलेली ती कॉक्सिटची पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. येथील संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालयात (कॉक्सिट) रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थाध्यक्ष अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संगणकशास्त्रातील विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण देण्यात येते. महाविद्यालयातील हजारो विद्यार्थ्यांना आजपर्यंत विविध नामांकित आयटी कंपन्यांमध्ये नोकर्या मिळाल्या आहेत. विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून विविध कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखती महाविद्यालयात होतात. महाविद्यालयाच्या स्मिता प्रल्हादराव ढोके या विद्यार्थिनीने कॉक्सिटमधून नुकतीच बी. एस्सी. सीएसची पदवी पूर्ण केली. यात तिला ७३ टक्के गुण मिळाले. पुढील शिक्षणासाठी तिने अमेरिकेतील नॉर्थ बोस्टन राज्यातील मॅसाच्युसेट्स विद्यापीठात जाण्याचे ठरवले. त्यासाठी आवश्यक असणारी पूर्व परीक्षा ती चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली आहे. यामुळे तिला एम. एस. संगणकशास्त्र या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी संधी मिळाली आहे. स्मिता ढोके हिच्या या यशाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, उपप्राचार्य आर. डी. सोमवंशी, ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा. कैलास जाधव, अधीक्षक संतोष कांबळे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### दिव्यांग व्यक्तींना नवीन शिधापत्रिकेचे वाटप

लातूर : लातूर तालुक्यातील मुरुड परिसरातील दिव्यांग लाभार्थ्यांना शासन निर्णय दि. २१ डिसेंबर २०२० नुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ नुसार अन्नधान्याचा लाभ मिळण्यासाठी ज्या दिव्यांग व्यक्तींना स्वतंत्र शिधापत्रिका नाहीत अशा ५२ दिव्यांग व्यक्तींना नविन शिधापत्रिका देण्यात आल्या असून त्यांना अंत्योदय योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे. दि. ८ जूलै २०२१ रोजी मौ.मुरुड येथील अष्टविनायक उच्च माध्यमिक विद्यालय येथे जिल्हा पुरवठा अधिकारी सदाशिव पडदुने व नायब तहसिलदार कुलदीप देशमुख यांच्या हस्ते नितीन देशमुख जिल्हाध्यक्ष, मेघराज अंधारे तालुका उपाध्यक्ष, प्रहार अपंग क्रांती संस्था,लातूर तालुका यांचे उपस्थित ५२ दिव्यांग लाभार्थ्यांना शिधापत्रिका वाटप करण्यात आले असे तहसिलदार लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

12 TO 18 JULY 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 10/07/2021 8:39 PM Page 1



# थडग्यांशी संपर्क!

ये त्या १२ जुलै पासून शिवसेनेचे शिव संपर्क अभियान सुरू होणार आहे. २२ जुलैपर्यंत चालणाऱ्या या अभियानात शिवसेनेचे नेते आणि कार्यकर्ते संपूर्ण महाराष्ट्रातील गावा गावात जाऊन कोरोना आणि त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी माझे गाव कोरोना मुक्त ही मोहिम राबवणार आहेत. पण ही मोहीम खरोखरच यशस्वी होईल का? कोरोनाची भीती दाखवून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांना वेळोवेळी संपूर्ण महाराष्ट्राला टाळे लावण्याचा सल्ला देणारे टास्क फोर्स मधील डॉकटर यांनी अक्षरशः महाराष्ट्रातील जनतेला वेठीस धरले आहे. या लोकांना सतत डोळ्यासमोर कोरोनाच्या लाटांवर लाटा दिसत आहेत. त्यामुळे उद्योगधंदे बंद ठेवलेत. लोकल ट्रेन सर्वसामान्यांसाठी बंद केल्यात. परिणामी आज लाखो लोक बेरोजगार होऊन घरात बसलेत. त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आलीय. त्यामुळे शिवसेना आणि खास करून उद्धव ठाकरे यांच्यावर लोकांचा भयंकर राग आहे. लोकांच्या मनात असंतोष खदखदत आहे आणि असे असताना जर शिवसेना शिवसंपर्क मोहिमेच्या माध्यमातून लोकांसमोर गेली तर त्यांना लोकांच्या प्रक्षोभाला तोंड द्यावे लागेल. लोकांच्या दरवाजात कुठल्या तोंडाने जाणार आहात आणि काय सांगणार आहात त्यांना? कोरोनाची भीती दाखवून जी लोकांची वाट लावलीय त्याचा लोक जाब विचारल्याशिवाय राहणार नाहीत. कोरोनाची तुम्हालाच भीती वाटतेय का? बाकीची माणसे नाहीत का? प्रत्येकाला आपला जीव प्यारा आहे, त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक माणूस आपआपल्या परीने जीवाची काळजी घेतोय असे असताना कोरोनाच्या भीतीने राज्यातील उद्योग धंदे बंद ठेऊन लोकांना उपाशी मारून तुम्हाला काय मिळणार आहे? आणि उद्धव ठाकरे यांना जर ऐवढी लोकांची काळजी आहे तर उद्धव ठाकरे यांच्यासह शिवसेनेचे जे करोडपती नेते आहेत त्यांनी स्वतःच्या खिशातून पैसे काढून कोरोना निधी गोळा करून त्यातून गोरगरीब लोकांना महिना भराचे रेशन पाणी प्रत्येक कुटुंबाला खर्चाला किमान पाच पाच हजार तरी द्यावेत. पण तेवढं सुद्धा हे लोक करायला तयार नाहीत. मग लोकांच्या समोर कशासाठी येताय? किती लोक उपासमारीने मेले किती लोकांच्या घरादाराची संसाराची वाताहत झाली हे बघायला येताय का? कसला संपर्क आणि कसले अभियान राबविताहेत? सरकारला कोरोनाचा मानसिक रोग झालाय. त्यामुळे महाराष्ट्रातला प्रत्येक माणूस त्यांना कोरोना बाधित वाटतोय. म्हणूनच सरकार दिवसागणिक वेगवेगळे कठोर निर्बंध लादतेय. पण आता मात्र लोकांची सहनशीलता संपलीय. कारण कामधंदा गेल्याने लोकांचे हाल होतायत. त्यामुळे लोकांच्या मनात सरकार आणि उद्धव ठाकरे यांच्या विषयी भयंकर चीड आहे. लोकांच्या मनातील प्रक्षोभाचा भडका उडेल असे काही करू नका. सणावाराचे दिवस आलेत, लोकांच्या घरात पैसा नाही. पोरांचे शिक्षण बुडाले, लग्न कार्य खोळंबली आहेत, बरे देवाचा धावा करावा तर देवालाही बंदिस्त करून ठेवले आहे. अशावेळी लोकांनी करायचे तरी काय? याचे उत्तर संपर्कासाठी येणाऱ्यांनी अगोदर द्यावे अन्यथा लोकांच्या संतपातून काय घडू शकते याची शिवसंपर्कवाले कल्पनाही करू शकणार नाहीत आणि तरीही लोकांपर्यंत यायचे असेल तर मदत घेऊन या रिकाम्या हाताने येऊ नका असे लोक म्हणत आहेत. आज महाराष्ट्रातले चित्र भयंकर आहे. उद्योजक, व्यापारी, फेरीवाले, छोट्या छोट्या कारखान्यात काम करणारे कामगार, माथाडी कामगार सगळे घरात बसलेत आणि घरात बसून सरकारला शिव्याशाप घालीत आहेत. पण राजकारणी गेंड्याच्या कातडीचे असल्याने लोकांच्या वेदना त्यांना दिसत असून ते आंधळे बनलेत. कारण उद्योगधंदे बंद राहिले, दुकाने बंद राहिली तर त्यांना काही फरक पडत नाही त्यांच्याकडे सर्व आहे. कारण उद्धव ठाकरे किंवा त्यांच्या मंत्रिमंडळातल्या कुठल्याही मंत्र्यांना लोकल ट्रेनचा प्रवास करावा लागत नाही किंवा पिशवी घेऊन बाजारात भाजी आणायला जावे लागत नाही. सगळ्या सेवा सुविधा त्यांच्या पाया जवळ आहेत. त्यामुळे महाराष्ट्राला वर्षभर कुलूप लागले तरी त्यांना काय फरक पडणार आहे? मरतोय तो गोरगरीब सामान्य माणूस ज्याचं नोकरी धंदा गेलाय, ज्याची पोर बाळ उपाशी मारतायत त्यांना फरक पडतोय. लोक आज रडत आहेत जे जुने जाणते लोक आहेत ते म्हणतायत की ब्रिटिशांच्या काळात सुधा लोकांचे हाल झाले नव्हते इतके हाल या लोकांनी केलेत आणि वरून आता लोकांना भेटायला येताय! लोक तुमचं काहीही ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नाही. अगोदर सर्व जनजीवन सुरळीत करा, लोकांना काम धंदा मिळवून द्या. लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटुदेत संपर्क तर तुमच्याशी निवडणुकीत होणारच आहे. तेंव्हा बघू आताच संपर्काची घाई कशाला अशी संतप्त प्रतिक्रिया लोक व्यक्त करीत आहेत.

# डॅमेज कंट्रोलचां प्रयत्न!



केंद्रातील सत्ताधारी एनडीएची भलेही ही दुसरी टर्म असली तरी भाजप प्रणित या आघाडीमध्ये सारे काही आलबेल नाही हे गेल्या वर्षभरापासून दिसत होते आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अकाली दलाने एनडीए आघाडीतून काडीमोड घेतल्यानंतर इतर छोट्या पक्षांमध्ये ही कुरबुरी सुरू होत्या, खास करून पंतप्रधान मोदी यांच्या कार्यपद्धतीवर घटक पक्ष नाराज होते, तर दुसरीकडे पवार आणि ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वखालील विरोधी पक्षाची मोट बांधण्याचा कार्यक्रम वेगाने सुरू झाला होता. अशावेळी नाराजांनी एनडीए मधून फुटून विरोधी पक्षाकडून जाऊ नये म्हणून एनडीएचे डॅमेज कंट्रोल आवश्यक होते आणि त्यामुळेच केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार करून नाराज आत्म्यांना मंत्रिमंडळात घेऊन त्यांची शांती करण्यात आली. तर ज्या मंत्र्यांच्या कामाबद्दल पंतप्रधान नाराज होते त्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. यामध्ये आरोग्य मंत्री हर्षवर्धन कामगार मंत्री संतोष गंगावार आणि शिक्षण मंत्री रमेश पोखरियाल यांचा समावेश आहे. या पैकी हर्षवर्धन हे तर भाजपातील वजनदार मंत्री होते, पण दिल्लीत आम आदमी पक्षाला रोखण्यात आणि तिथे भाजपची ताकत वाढवण्यात हर्षवर्धन अपयाशी ठरले. त्यामुळे कोरोना काळात आरोग्यमंत्री म्हणून चांगले काम करूनही त्यांना हटवण्यात आले. संतोष गंगावार आणि रमेश पोखरियाल यांच्या खात्याच्या कामाबाबत पंतप्रधान मोदी सुरुवाती पासून नाराज होते. संजय धोत्रे यांचेही कामाचे प्रगती पुस्तक कच्चे होते सदानंद गौडा यांनाही प्रभाव पाडता आला नाही, तर देबाश्री चौधरी आणि बाबुल सूप्रियो यांना पश्चिम बंगालमध्ये झालेल्या पराभवाची शिक्षा मिळाली वाईट वाटते ते फक्त अत्यंत साधे राहणीमान आणि चांगले विचार असलेल्या सारंगी यांचे! पण प्रामाणिक आणि साधी राहणी असलेली माणसे चालत राजकारणात चालत नाही. त्यामुळे सारंगी यांचेही तेच झाले. मोदींनी जी नवी भरती केली आहे त्यातील बरेचसे लोक हे एनडीए आघाडी, भाजपा आणि खास करून मोदींवर नाराज होते. यापैकी एक होते नारायण राणे! त्यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन भाजपमध्ये प्रवेश केला. पण खासदारकीच्या पलीकडे त्यांच्या वाट्याला काहीच आले नव्हते. त्यामुळे राणे नाराज होते आणि म्हणूनच त्यांना केंद्रीय मंत्री मंडळात घेऊन त्यांची नाराजी दुर करण्यात आली. तसेच अपना दल हा भाजपचा मित्र पक्ष आहे त्यांनाही काही मिळाले नव्हते, म्हणुन अनुप्रिया पटेल यांची वर्णी लावण्यात आली आसामचे माझी मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवल हे सुद्धा नाराज होते. त्यामुळे त्यांनाही मंत्रिपद देण्यात आले. बिहारमध्ये भाजपा आणि जेडीयू पक्षाची युती आहे, या युतीने मागील विधानसभा निवडणुकीत चांगले यश मिळवले आणि सत्ता राखली मात्र संख्याबळात भाजपने बाजी मारीत जेडीयूला मागे ढकलले. आता मुख्यमंत्री जरी जेडीयूचा असला तरी भाजपमुळेच आपले आमदार कमी झाले असा जेडीयूचा मित्र पक्ष असलेल्या भाजपवर आरोप आहे. त्यामुळे भाजप आणि नितीश कुमार यांच्यात फारसे सख्य नाही, म्हणूनच जेडीयूची नाराजी दूर करण्यासाठी त्या पक्षाचे अध्यक्ष आर.के.सिंह यांना ऊर्जा मंत्री करण्यात आले. शिवाय आघाडीतील छोट्या पक्षांनाही मंत्रिपद देऊन डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न करण्यात आलंय. मागील काही दिवसांपासून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि भाजपच्या केंद्रीय नेतृत्वात दुरावा आलाय. त्यामुळे योगिनी खुश करण्यासाठी युपीच्या सात जणांना मंत्री करण्यात आले. शिवाय जातीच्या राजकारण्यांचाही समतोल साधण्यात आला असून दलीत, ओबीसींना बऱ्यापैकी प्रतिनिधित्व देण्यात आले असा हा सगळा डॅमेज कंट्रोलचा खटाटोप आहे.

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# संभाव्य तिसऱ्या लाटेतही आपापल्या जिल्ह्यातील उद्योग सुरू राहतील यादृष्टीने नियोजन करावे!

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांना सूचना

मुंबई/प्रतिनिधी

राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील मोठ्या उद्योगपतींची बैठक घेऊन त्यांना संभाव्य तिसऱ्या लाटेत उद्योग सुरु ठेवण्याच्यादृष्टीने करावयाच्या तयारी संदर्भात मार्गदर्शन करावे, ज्या उद्योजकांना त्यांच्या उद्योगाच्या आवारात कामगारांची राहण्याची व्यवस्था करणे शक्य आहे तिथे त्यांनी त्याचे वेळीच नियोजन करावे व ज्या उद्योजकांना ते शक्य नाही त्यांनी कंपनीच्या आसपासच्या परिसरात अशी जागा शोधून कामगारांची तिथे राहण्याची (फिल्ड रेसिंडन्स) व्यवस्था करावी, त्यादृष्टीने त्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक असलेले सहकार्य करावे अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या. मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त आणि पोलीस अधिकाऱ्यांशी दूरदृष्यप्रणालीद्वारे चर्चा करून कोरोना स्थितीचा आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस आरोग्यमंत्री राजेश टोपे, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, कोरोनासाठी स्थापन करण्यात आलेल्या टास्कफोर्सचे पदाधिकारी, बाल टास्कफोर्सचे पदाधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. कोरोनाच्या दोन लाटेमधील हा काळ संयम आणि शिस्तीसाठी महत्वाचा आहे. या काळात कोरोनाची रुग्ण संख्या कमी होऊन आपण काहीप्रमाणात आर्थिक व्यवहार सुरु करत असलो तरी अतिशय सावधगिरीने पुढे जाण्याची गरज आहे असे सांगून मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले की, उद्योग आणि आर्थिक चळवळ सुरु राहण्यासाठी कामगारांचे येणे जाणे हे त्यांच्या कामाचे ठिकाण आणि घर इथपर्यंतच मर्यादित राहणे गरजेचे आहे.

### नियमांचे काटेकोरपणे पालन करा

अजुन कोरोनाची दुसरी लाट पुर्णत्वाने ओसरलेली नाही. परंतु याही स्थितीत कॅल्क्युलेटेड रिस्क घेऊन आपण सावधगिरी बाळगून काही आर्थिक उपक्रम सुरु करत आहोत. हे करताना सावधगिरीची पाऊले म्हणून जे निर्बंध लावण्यात आलेले आहेत, ते कागदावर राहणार नाहीत, ते काटेकोरपणे अंमलात येतील, कुठेही गर्दी होणार नाही, सभा, समारंभ होणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

### गर्दी टाळा

आता पावसाळा आहे, या काळात साथीचे इतर आजार उदभवतात त्यात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव आहे. याच काळात आपले सण, समारंभही सुरु होतात. ही




सगळी परिस्थिती अतिशय काळजीपूर्वक हाताळण्याची गरज असल्याचेही मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी जिल्हानिहाय ऑक्सजिनच्या तयारीचाही आढावा घेतला त्यांनी ऑक्सजिन निर्मिती, ऑक्सजिन साठा आणि रुग्णसंख्या वाढल्यास करावयाची पूर्वतयारी या सर्वच प्रक्रियेला वेग देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना केल्या.

### लसीचा दुसरा डोस घेण्यासाठी जनजागृती करा

आशा- अंगणवाडीसेविका आणि आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत गावागावात जनजागृती करून कोराना प्रतिबंधक लसीचा पहिला डोस घेतलेले सर्वजण दुसरा डोस वेळेत घेतील यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे अशी सूचना देऊन मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले की, लसीचे दोन्ही डोस घेऊन कोराना बाधित होणाऱ्यांची संख्या, त्याची स्थिती आणि कारणे याचे टास्कफोर्सने विश्लेषण करावे, ही माहिती संकलित करतांना ती अनुभवजन्य राहील (लसीचा पहिला डोस घेतला होता की दोन्ही) याची काळजी घ्यावी.

### पारनेर तालुक्यात जिनोम सिक्वेन्सी

पॉझेटिव्हीटी दर जास्त असलेल्या कोल्हापूर, सातारा, सांगली, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयात केलेल्या उपाययोजनांनंतरच्या स्थितीचा मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला. यात सर्वच जिल्ह्यांमध्ये पॉझेटिव्हीटी दर तुलनेने कमी होत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले तसेच हा दर आणखी कमी करण्यासाठी आरटीपीसीआर चाचणीची संख्या वाढवणे, गृह विलगीकरण कमी करून संस्थात्मक उपचाराला गती, लसीकरण वाढवण्याचा प्रयत्न केल्याची माहिती त्यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी यावेळी अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात जनुकिय उत्प्रवर्तन (जिनोम सिक्वेन्सी) करून घेण्याचे निर्देशही आरोग्य विभागाला दिले. होमगार्ड नियुक्त्या, फिरती चाचणी केंद्रे आणि इतर आरोग्य सुविधांविषयक मागणीचा ज्या जिल्ह्यांनी उल्लेख केला त्यांच्या मागणीची दखल घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केल्या.

### जिद्द कायम ठेवा

कोरानामुक्त गावांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सरपंचांची बैठक घेऊन गाव कोरोनामुक्त होईल याची दक्षता घ्यावी, वस्ती केंद्रीत करून गाव कोरोना मुक्त करावे अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या बैठकीत विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी कोरोना प्रतिबंधक उपाययोजना सांगितल्या तसेच तिसऱ्या लाटेला परतवून लावण्यासाठी केलेली तयारीही सांगितली तेंव्हा कोरोनाला हरवण्याची तुमची जिद्द कौतुकास्पद आहे ती कायम ठेवा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

### खासगी रुग्णालयांनी लसींचे डोस वाढवून मागावेत- टोपे

चाचण्या वाढवणे, गृह विलगीकरण कमी करणे हे पॉझेटिव्हीटी रेट जास्त असलेल्या जिल्ह्यांसाठी महत्वाचे असल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले. त्यांनी राज्यातील खासगी रुग्णालयांनी लसीचे डोस वाढवून मागितल्यास राज्यात लसीकरणाला आणखी वेग देता येईल, त्याकडे लक्ष वेधले. ऑक्सजिनची तयारी पूर्णत्वाला नेतांना जिल्ह्यांनी त्याच्या तांत्रिक आणि दर्जात्मक गुणवत्तेची काळजी घ्यावी, परमिट टु वर्क चा परवाना मिळवावा, सर्व काम शास्त्रशुद्ध पद्धतीने व्हावे अशा सूचना दिल्या. आरोग्यमंत्री श्री.टोपे म्हणाले की, कोरोना उपचाराच्या दरासंदर्भात आरोग्य विभागाने खासगी रुग्णालयांसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्याचे पालन होत असल्याची काळजी जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी, यासाठी ऑडिटर्सची नियुक्ती करावी, कंटेन्मेंट झोन संदर्भातील नियमांचे काटेकोरपणे पालन व्हावे, लसीचा अपव्यय होणार नाही याची काळजी घ्यावी, ज्यांनी पहिला डोस घेतला आहे ते नागरिक दुसरा डोस घेतील हे पहावे, महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेचा जिल्हाधिकाऱ्यांनी दर पंधरा दिवसांनी नियमित स्वरूपात आढावा घ्यावा अशा सूचनाही त्यांनी केल्या. या बैठका नियमित झाल्यास दाव्यांचे निकाली निघण्याचे प्रमाण वाढून नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. श्री.टोपे यांनी सर्व जिल्ह्यांनी फायर, स्ट्रक्चरल आणि इलेक्ट्रिकल करण्याच्या सुचनेचा पुनरूच्चार केला.

जिल्ह्यांनी कोरोना बाधितांची माहिती दररोज अद्ययावत (रिअल टाईम डेटा) स्वरूपात अपलोड करावी अशा सूचनाही श्री. टोपे यांनी यावेळी दिल्या. पॉझेटिव्हीटीचा दर कमी करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने मुख्य सचिव श्री. कुंटे यांनी काही सूचना केल्या तर टास्कफोर्सचे तज्ज्ञ डॉक्टर्स यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

# जनता मरतेय; टाळूवरचं लोणी खाणारे वाढले!

होय कोरोना काळात जनता मरतेय आजाराने तर कुठं भुकमरीनं कुठं आर्थिक संकटात सापडल्यानं परिस्थितीने आत्महत्या होताय.उपचारासाठी पैसे नाहीत म्हणून कुटुंब आत्महत्या करतंय तर कुठं वैद्यकीय सुविधा मिळतं नाहीत म्हणून लोकं मरताय. अश्या परिस्थितीत दिशाहीन सरकार अन जनता झाली अन त्यात उधोगपती, काळाबाजार करणाऱ्याचं मात्र चांगभलं होतंय असंच दिसतंय.

मागे काही दिवसा पूर्वी देशाची उधोगपती यांची संपत्ती आकडेवारी जाहीर झाली त्यात अदानी यांची संपत्ती लॉकडाऊन काळात एकावर्षात दुप्पट झाली तर अंबानी समूह यांची सदोतीस टक्के वाढली तर देशात नवीन तीस पस्तीस अब्जधीश वाढलीय याचा अर्थ काय? यांनी या काळात लुटलं असं मी म्हणणार नाही पण तसं दिसतं. कोरोना काळात सामान्य जनता आर्थिक संकटात सापडली पैश्याची चणचण लोकांना तर ऐकिकडं पैश्याचा साठा जमा होऊ लागला. देशाचे पंतप्रधान म्हणतात की देशातील ८० करोड लोकांना धान्य वाटप केलं म्हणजेच सरकार दरबारी ८० करोड लोकांना खाण्याची उपासमार होणार हेच यातून दिसतं. १३० करोड लोकसंख्येत गरीब जास्तच.उरलीत पन्नास कोटी त्यात नोकरदार, मध्यमवर्ग, अन छोटी व्यावसायिक, हे अंदाजित असतील तीस चाळीस कोटी. मग उरले ते अतिश्रीमंत फक्त ते असतील मग सुमारे दहा बारा कोटी. हिच जनतेला पिळतेय लुटतेय सर्व नाहीत पण यातील खूपच मंडळी टाळूवरच लोणी खाताय असं वाटतं. त्यात पण आपण असं समजु अर्धी चांगली चांगल्या योग्य मार्गानं श्रीमंत अन अर्धी वाईट मग चांगली बाजूला काढलीत तर उरलीत फक्त चार पाच कोटी. म्हणजेच देशाच्या लोकसंख्येच्या तुलनेत तीन-चार टक्के त्यात मग मोठी उधोगपती अन भ्रष्ट राजकीय व्यक्ती अन भ्रष्ट नोकरदार असतील आलीत. याचा अर्थ देशातील जनतेला लुटणारे तीन-चार टक्के लोकं जनतेला पिळताय लूटमार करताय असाच.

देशात खाद्यतेल आजपर्यत सर्वात जास्त किमतीत विकलं जातंय तसंच ईतर वस्तू अन घरगुती गॅस, डिझेल, पेट्रोल, पॅकिंग मधील वस्तू साठेबाजी करून भाववाढ करतांना दिसताय कुठं सरकारी धोरण मुळे भाववाढ म्हणजेच सरकार पण लूटमारीस खतपाणी घालतंय असं वाटतं. अलीकडेच कृषी कायद्यात उधोगपती यांना अमर्याद साठा साठेबाजी करण्यास परवाना दिला तसा कायदा व्यापारी हिताचा सरकारनं केला म्हणजेच जनता लुटीचा परवाना व्यापाऱ्यांना सरकारनं दिलाय त्यालाच विरोध शेतकरी करताय.तसंच जनतेनं सुद्धा करायला हवा.कारण जनताच मरणार आहे त्यातून जनतेनं वेळीच सावध होऊन वागलं जगलं पाहिजे मग कोणी का असेना चुकत असेल तेथे विरोध केला पाहिजे. पुढे चांगलं जगायचं असेल तर टाळूवरचे लोणी खाणारे यांना ठेचून काढलं पाहिजे सरकार ने सद्बुद्धी वापरून निर्णय घेतले पाहिजेत तेव्हाच लोणी खाणाऱ्यांना चाप बसेल अन जनता सुखी होण्याच्या दिशेने जाईल. आजची सरकारे तर व्यापारी यांना प्रोसाहन देणारी जनतेला, शेतकऱ्यांना, कष्टकरी याला लुटणारीचं दिसतात. जनतेची सेवकच जनतेला लुटून व्यापाऱ्यांचे भलं पाहतं असतील तर जनतेनं सावध झालं पाहिजे. जनतेनं काहीतरी मार्ग काढला पाहिजे नाहीतर इंग्रज नीती होतीच फोडा झोडा राज करा अगदी तशीच नीतिमत्ता या काळ्या इंग्रज यांची अन सरकारची. कोरोना काळात काही डॉ. व्यापारी व इतरांनी जनतेला लुटलं अशी अनेक उदाहरण आलीत बातम्यातून. तसंच अनेक सहकारी संस्था चालक, सरकार मधील अधिकारी, अन सेवक यांना जनतेला लुटायची लागण जोरात झालीय सध्या. भ्रष्टाचार पाहावं तेथे दिसतो.काळाबाजार कोणत्या पण वस्तूंचा सुरूय अगदी गोळया औषधं पासून ते दुध, खाद्य पदार्थ, अनेक जीवनावशक वस्तू. कोण काय खोटं विकेल सांगता येतं नाही असंच दिसायला लागलं.. असं वाटतं वरील तीन चार टक्के लोकांची लागण अती श्रीमंती च्या नादात माणुस न राहता पशु, राक्षस बनून माणसांना लुटावं असाच प्रकार वाटतो. त्यात सध्या चढावोढ चाललीय. असं वाटतं अमरधाम मध्ये लाकडं विकणारा माणसं मरण्याची वाट पाहतोय. अगदी तसंच माणसांच्या मरणाच्या वेळी त्यांना लुटारू लुटत होते. तसंच सर्वीकडे दिसतं असो शेवटी त्यांना जमवलेली पुंजी वरती न्यायची असेल. आपण सामान्य जनता तर खाली हात जाणार आहोत. गीता, बायबल, कुराण, म्हणतं जसं करावं तसं भरावे लागतं

**– प्रदीप पाटील (गणपूर, ता.चोपडा जळगाव)**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

## अर्थपूर्ण कवितांनी रंगले राज्यस्तरीय ऑनलाईन कवी संमेलन

# मया पातळ करू नकोस गावाकडे येत जा, कधीमधी माय बापाला तुझ्या घरी नेत जा!

**देवणी/शकिल मनियार**

कोरानाचे संकट, वाढती महागाई, संकटातील शेतकरी, बदलेला माणूस, स्त्री सक्षमीकरणाची गरज, शासकीय धोरणातील उणिवा, कृषीकेंद्रित जीवनानुभव अशा विविध अर्थपूर्ण काव्यरचनेचा आस्वाद मराठी काव्यरसिकांना ऑनलाइन स्वरूपात घेता आला. कै. रसिका महाविद्यालय देवणी येथील मराठी विभागाच्या वतीने राज्यस्तरीय ऑनलाईन कवीसंमेलन घेण्यात आले. यावेळी महाराष्ट्राच्या विविध भागातून १७ कवींनी आपल्या रचना सादर करून मराठी काव्य रसिकांची दाद मिळवली. कविसंमेलनाचे उद्घाटन गोविंदराव भोपणीकर यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून गजाननज भोपणीकर यांची उपस्थिती होती. कवी संमेलनाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. प्रशांत भंडे यांनी केले. प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

सुप्रसिद्ध कवी, गीतकार ज्ञानेश वाकुडकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या कविसंमेलनात अनेक कवींनी बहारदार रचना सादर केल्या. कवी मुकुंद राजपंखे यांनी मया पातळ करू नकोस गावाकडे येत जा, कधीमधी माय बापाला तुझ्या घरी नेत जा, तुझ्या शहरी गरजामधून दहा पाच साठवत जा, दरमहा अर्धी कोर भाकर गावी पाठवत जा ही रचना सादर करून गाव विसरून शहरात रमलेल्या लोकांचे चांगलेच कान धरले. छातीवर घेऊन डोके, हृदयाचे मोजत ठोके, छातीवर ठोकत म्हणते, ऐ पत्थर बिलकुल ओके ही गेयात्म रचना सादर करून कवी ज्ञानेश वाकुडकर यांनी पती-पत्नीचे भावबंध शब्दबद्ध केले. कवी विनायक पवार यांनी आपल्या मुलीवर संस्कार करणारा एक समंजस, जबाबदार बाप आपल्या कवितेतून साकार करून रसिकांच्या अंतःकरणाला हात घातला. माझ्यासाठी वात पोरी तू पण त्या घरचा दिवा बन, उन्हाळ्यातही झुळझुळणारी थंडगार हवा बन कवी शशीकांत हिंगोणेकर यांनी आपल्या प्रदीर्घ शासकीय सेवेतील संघर्षपूर्ण अनुभव काव्यातून शब्दबद्ध केले. काळजातली माणसे आयुष्यभर जपत राहिलो आणि शेवटी काय झाले, तर अवेळी त्यांचे चेहरेच बदलून गेले. असे अनुभव व्यक्त करून या जीवनसंघर्षात पत्नीच्या साथीने अनेक संकटावर मात केली म्हणून त्यांनी आपल्या अर्धांगिनीला तू सोडू नकोस, घट्ट धरलेला, माझा हात कधीही, आयुष्य पुन्हा नव्याने सुरू झालेय या रचनेतून साद घातली.



कवी चंद्रवर्धन लांडगे यांनी चालीवर गीत रचना सादर करून रसिकांची मने हेलावून टाकली. आली महागाईची मंदी, बंद झाली चारा चंदी, बेंदराला उपाशी नंदी, कसा पुजू दारामंदी, सणादिशी ह्यो वनवास, माझ्या गुरांना मिळना हो घासअसा अर्थ टाहो फोडला. व शेतकऱ्यांच्या दुःखाला वाट मोकळी करून दिली. जीवनात संघर्ष, कष्ट करणारे आई-बाबा कवी दत्ता जाधव यांनी 'हिरवी पुण्याई' कवितेतून रेखाटले. चोहिकडे हिरवे दाटले, पांग घामाचे फिटले, हिरवाईने बघा माझे, आज वावर नटले कष्टाच्या घामाने आनंदी झालेले कविमन या कवितेतून प्रकट झाले. दुःखात जीवन जगणाऱ्या शेतकऱ्याच्या मनातील आता सरेल काळोख, दशदिशा उजळेल, लख्ख प्रकाशाचा थवा, रानोमाळ उतरेल असा आशावाद कवी संतोष आळंजकर यांनी व्यक्त केला. कवी डॉ.महेश खरात यांनी चूल, मूल, नवरा यांच्यात गुरफटून पडलेली स्त्री स्वतःचं अस्तित्त्व हरवून बसल्याची खंत 'ओळ तुझ्या-माझ्या स्वातंत्र्याची' या कवितेतून व्यक्त केली.

स्त्रीमनाचा उत्कट आविष्कार या कवी संमेलनातून रसिकांना अनुभवता आला. झाडाची पाने, फुले तोडून पर्यावरणाचा ऱ्हास करू नका. कर्मकांडात अडकून पडू नका. वट पौर्णिमेच्या सावित्रीऐवजी ज्योतिबाच्या सावित्रीचे व्रत स्वीकारणे ही काळाची गरज आहे. असे सांगताना कवयित्री शैलेजा कारंडे म्हणतात, तिला सांगावच लागेल, बाई पार्वती, झाडाची पाने नको तोडू, चाळत रहा अखंडपणे पुस्तकाची पानं मग बघ, बघ तुझ्या प्राप्तीसाठी करतील व्रत उपवास, गावागावातील कितीतरी चिरंजीव महादेव कवयित्री डॉ. वंदना जाधव यांनी पूजतोस तू स्त्रीला मंदिरी देवता मानुनी , करतो अत्याचार, झिडकरतोस तू तिला दासी म्हणूनी या रचनेतून पुरुषाच्या दुटप्पी वर्तनावर प्रहार केले. आदिवासी समाजातील स्त्रियांचे दुःखीकष्टी जीवन कवितेतून सादर करणारे कवी रामराजे आत्राम यांच्या माय माझी पोटासाठी रानावनात भटके, पायाला बसती चटके, अंगावर साऱ्या काटेच काटे या ओळींनी रसिकांना अंतर्मुख केले.

कर्मकांडात गुरफटल्यामुळे जीवनाची वाताहत कशी होत गेली हे डॉ. फुला बागूल यांच्या हे आई... रोज एक तास देवघरात, व्रतवैकल्याऐवजी माझ्या अभ्यासाला दिला असतास, तर ही होळी पेटली नसती* या रचनेतून प्रकट झाले. आठवते जेव्हा सर्वकाही मी माझा नसतो, हारल्या हरवल्या क्षणांची मोजदाद करीत नसतो, जिंकण्या हारण्याचा चालतोच आहे लपंडाव, आपणच हरावे असे डावपेच खेळत असतो या रचनेतून कवी प्रशांत भंडे यांनी जीवनातील संघर्ष शब्दबद्ध करून. इतरांच्या भल्यासाठी स्वतः माघार घेणे हे कधीही चांगले असते हे अनुभव 'पानझड' या गझलेतून व्यक्त केले. कवी सतीश जामोदकर यांनी समाजाला शाहु-फुले-आंबेडकर यांच्या विचारांची गरज असल्याचे 'ओबीसींच्या कविता' या कवितेतून प्रतिपादन केले. मुकुंद राजपंखे यांच्या सुमधुर आवाजातील घर नव्याने पुन्हा बांधले पाहिजे, जळमटांना जुन्या जाळले पाहिजेया गझलेने रसिकांच्या मनात जगण्याची उमेद उभी केली.

उपस्थित कवींचा परिचय प्रा.अश्विनी देशमुख यांनी करून दिला. कवीसंमेलन यशस्वी होण्यासाठी तांत्रिक सहाय्य रोहित अडीलिंग, डॉ. सचिन चामले, प्रा.महेंद्र आल्टे, प्रा. समाधान पसरकल्ले, गोविंद सोमवंशी यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. गोपाळ सोमाणी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते. ६०० पेक्षा जास्त रसिकांनी या राज्यस्तरीय ऑनलाईन कवी संमेलनाचा आस्वाद घेतला आहे. ऑनलाइन माध्यमातून राज्याच्या विविध भागातून नामांकित कवींना व मराठी काव्य रसिकांना एकत्र जोडण्याचे महत्त्वाचे कार्य आयोजकांनी केल्याबद्दल कवी व रसिक वर्गातून आनंद आणि समाधान व्यक्त झाले आहे.

## ओबीसी आरक्षणाच्या हक्कासाठी शिवा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**देवणी/प्रतिनिधी**

शिवा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांना ओबीसी आरक्षणाच्या हक्कासाठी निवेदन देण्यात आले राजकीय व इतर मिळणारा लाभ ओबीसीसाठीचे आरक्षण कायम ठेवण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, यांना समाजाच्या भावना कळवाव्यात अशी विनंती यावेळी जिल्हाधिकारी यांना करण्यात आली. या प्रसंगी शिवा संघटनेचे राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांत आप्पा शेटे, श्रीपती दरेकर संपर्क प्रमुख कर्नाटक, युवराज बिराजदार जिल्हा उपाध्यक्ष, महेश पाटील वलांडी विध्यार्थी आघाडी लातूर जिल्हा अध्यक्ष, जितेंद्र शिवगे देवणी तालुका संपर्क प्रमुख, प्रकाश केळकर, प्रभू कोरे,जगन्नाथ कोळंबे ,वैजनाथ सावळे, संगमेश्वर स्वामी यासह अनेक शिवा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करून G2C सेवा कार्यान्वीत करणेकामी जिल्ह्याचे संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणेचे आवाहन

**पालघर/प्रतिनिधी**

महा ई-सेवा केंद्र, सेतू सुविधा केंद्र, नागरी सुविधा केंद्र तसेच संग्राम केंद्र यांना आपले सरकार सेवा केंद्रे हे नाव देऊन सर्व कॉमन सर्व्हिस सेंटरचे एक सारखे बँडिंग करण्यात आले आहे. आपले सरकार सेवा केंद्रांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळावर सोपविण्यात आली असलेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय पालघर यांचे मार्फत कळविले आहे. जिल्ह्यातील रिक्त असलेल्या ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करून G2C सेवा कार्यान्वीत करणेबाबतची जाहीर नोटीस जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://palghar.gov.in/या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रिक्त असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्जदारांनी दिनांक ०७ जुलै, २०२१ ते २१ जुलै, २०२१ या कालावधीत जिल्हाचे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या गुगल फॉमव्दारे अर्ज सादर करावा. अर्जदार यांचेकडे अर्ज सादर करते वेळी सी.एस. सीआयडी असणे आवश्यक आहे. आवश्यक असलेल्या ठिकाणी संग्राम केंद्र आयडीधारक असल्यास त्यांस प्रथम प्राधान्य देणेत येईल. या बाबत अधिकची माहिती जिल्हयाचे संकेतस्थळावर, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व पंचायत समिती यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली असलेबाबतची माहिती डॉ. माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी पालघर यांनी दिली आहे.

## राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या हास्ते वृक्षारोपण

**देवणी/प्रतिनिधी**

राज्यमंत्री संजय बनसोडे देवणी तालुक्याच्या दौऱ्यावर आले असता देवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. डॉ.अनिल इंगोले यांच्या फार्म हाऊस वरती माननीय मंत्री महोदय यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश सचीव बसवराज पाटील नागराळकर, अंबरखाने, सरपंच अंकुश गायकवाड, कार्याध्यक्ष अनिल कांबळे, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष दत्ता चाळकापुरे युवक शहर अध्यक्ष जितेंद्र शिवगे, तालुका उपाध्यक्ष प्रशांत पाटील विजय नगरकर, उपसरपंच बोरोळे, कोणाळी ग्रामपंचायत सदस्य अजय भोळे, अंबानगर चे सरपंच अनिल रोटे, माजी शहराध्यक्ष अमर बोरे, सिद्धू पाटील, उत्तम कारभारी, सचिन घाळे फिरोज शेख, पिंटू पाटील, शंकर पाटील इत्यादी उपस्थित होते.



## नागतिर्थवाडी येथे उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांची भेट; वृक्ष लागवडीसह विविध कामाची पाहणी



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील नागतीर्थवाडी येथे जिल्हाधिकारी यांचे नोडल अधिकारी म्हणून उपजिल्हा अधिकारी गणेश महाडिक, नरेगा गटविकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी यांनी भेट देऊन गावातील चिंचेची वृक्ष लागवड, वडाच्या झाडाची लागवड, मियावाकी पद्धतीने केलेली वृक्षलागवड, गावातील ग्रामपंचायतचा गांडूळ खतनिर्मिती प्रकल्प, रोपवाटिका, जिल्हा परिषद शाळेतील बाला उपक्रम, सार्वजनिक शौचालय अशा विविध कामाची पाहणी करून विविध उपक्रम राबविल्याबद्दल ग्रामपंचायतचे अभिनंदन केले. यावेळी तहसीलदार सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, सहाय्यक गटविकास अधिकारी अच्युत पाटील, नायब तहसिलदार तरंगे, राज गुणाले, उपसरपंच विष्णूदास गुणाले, ग्रामसेवक श्रीकांत पताळे, कर्मचारी शिवाजी उंचे, नामदेव कासले, संजीव रामासने, मधुकर कासले आदीसह गावातील नागरिक उपस्थित होते. दरम्यान नागतीर्थवाडी गावने पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवड,गांडूळ खत रोपवाटिका, शिक्षणासाठी बाला उपक्रम, आरोग्यासाठी सार्वजनिक शौचालय व करोना विलगीकरण केंद्र, बिनविरोध ग्रामपंचायत तसेच गावात सौर ऊर्जेवर आधारित पंप बसवून स्मार्ट व्हीलेजच्या दृष्टीने काम केले असून गाव त्या मार्गावर वाटचाल करीत असल्याचे उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक यानी बोलताना मत व्यक्त केले.

## लातूर भाजी मार्केट स्थलात्तर मागणीचा होणार निर्णय

**लातूर/प्रतिनिधी**

व्यापाऱ्यांची मागणी आणि कृषी उत्पन्नबाजार समितीची व्यवहार्यता तपासून या संदर्भाने नियुक्त केलेल्या समितीने सर्व घटकांना मान्य होईल असा सर्वमान्य निर्णय घ्यावा, अशी सुचना राज्याचे वैद्यकीय शिक्षण व संस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे. लातूर शहरातील भाजी मार्केट बाहयवळण रस्त्यावर स्थलांतरीत करण्या बाबत संबंधित व्यापाऱ्यांनी केलेली मागणी, यामध्ये असलेली मतमत्तातरे त्याच बरोबर बाहयवळण रस्त्यावरील जागेत सध्या सुरू असलेला कडबा आणि जनावरांचा बाजार या संदर्भाने असलेली कृषी उत्पन्न बाजार समितीची भुमिका, शिवाय हे भाजी मार्केट स्थलातरीत करायचे ठरले तर नवीन ठिकाणी उभाराव्या लागणाऱ्या सुविधा या बाबींचा अभ्यास करून निर्णय घेण्यासाठी पालकमंत्री ना. अमित देशमुख यांच्या सुचनेवरून बाजार समिती संचालक मंडळातील ज्येष्ठ सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली आहे. सदरील समिती सोबत आज पालकमंत्री ना. देशमुख यांनी दुरदृष्य प्रणालीव्दारे मंत्रालयातुन आढावा बैठक घेतली. बैठकीच्या प्रारंभी ना. देशमुख यांनी सर्व समिती सदस्यांचे म्हणणे ऐकूण घेतले त्यांनतर भाजी मार्केट मधील व्यापारी यांची मागणी, त्यांच्यातील मतमतात्तरे, जुन्या भाजी मार्केट मधील जागा, तेथे विस्तार करण्यासाठी असलेला वाव, नवीन ठिकाणी उभाराव्या लागणाऱ्या सुविधा, त्यासाठी लागणारा वेळ, कडबा व जनावर बाजारासाठी शोधावा लागणारा पर्याय या संदर्भातील बाजार समितीची भुमिका या गोष्टीचा अभ्यास करावा, सर्व घटकांना विश्र्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करावी व सर्वमान्य निर्णय घ्यावा, अशा सुचना पालकमंत्री देशमुख यांनी केल्या आहेत. या आढावा बैठकीस बाजार समितीचे सभापती ललीतभाई शहा, उपसभापती मनोज पाटील, संचालक सुधिर गोजमगुंडे, विक्रम शिंदे, रावसाहेब पाटील, गोविंद नरहरे, भास्कर शिंदे, श्री बिदादा तसेच संबंधित अधिकारी सहभागी झाले होते.


## वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'एच' नवघर-माणिकपूर, ता. वसई, जि. पालघर**

**जाहीर नोटीस**

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकतधारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत/तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | दिवाणमान ६/१ | VN28/14591 | जसपाल सिंग मेहरा | मुर्तजा सिमेंटवाला व मसूद सिमेंटवाला |
| २ | माणिकपूर १/१ | VN15/33617 | फिलोमिना अंतोन डिमेलो | विल्फ्रेड ॲन्थॉनी डिमेलो |
| ३ | माणिकपूर १/१ | VN15/61657 | प्रगती इन्फ्रास्ट्रक्चर | नितु गणेश व गणेश बालक्रिष्णन |
| ४ | माणिकपूर १/१ | VN15/33618 | फिलोमिना अंतोनी डिमेलो | इग्नेशियस ॲन्थोनी डिमेलो व डॉनल्ड ॲन्थोनी डिमेलो |
| ५ | नवघर १/३ | VN05/24907 | वलेरियन कोरीया | हसमुख पी हिंगु व कैलाश एच. हिंगु |
| ६. | बऱ्हामपूर | VN14/38286 | डिसोजा गिल्डर अंतोन | डिसोजा विकी गिल्डर |
| ७. | नवघर ५/१ | VN12/30069 | शब्बीर हुसेन जावरावाला व इतर १ | फिजा शब्बीर जोहरावाला |
| ८. | नवघर ४/१ | VN09/2747 | गुरदिपसिंग एस. सिहाना | निशा गुरदीप सिंह सिहाना |
| ९. | चुळणा | VN02/55941 | प्रवीण भार्गव व उषा विजय भार्गव | सुधांशु गणेश शंकर नागर व इतर १ |
| १०. | नवघर ४/१ | VN09/3179 | राध्येशाम राजकिशोर पांडेय | अशोक राधेश्याम पांडेय व राजेश राधेश्याम पांडेय |
| ११. | बऱ्हामपूर | VN14/61825 | क्लिटन डिपेन्हा व मारिया डिपेन्हा | रिर्चड हरबंट धासेर व शेरेल रिर्चड धासेर |
| १२. | दिवाणमान ८ | VN31/18730 | नासीर रफिक खान व नाझीया नासीर खान | नदीम आदम मजगांवकर व इतर १ |
| १३. | बऱ्हामपूर | VN14/40142 | कुसुम आर. तिवारी व सुरेंद्र आर. तिवारी | सुरेंद्र आर. तिवारी |
| १४. | दिवाणमान ३ | VN24/7235 | विजयकुमार हरीहर विश्वकर्मा | प्रमोद कुमार यादव |
| १५. | दिवाणमान ४ | VN25/8286 | फ्रान्सिस मस्कारनेस | शशिकांत महादेव खामकर व इतर १ |
| १६. | दिवाणमान ३ | VN24/7338 | लिली वर्गीस चेरियन | वैशाली मानस दोशी व मानस हंसकुमार दोशी |
| १७. | दिवाणमान ४ | VN25/8287 | धीरूभाई धरमशी सरवैया व इतर १ | उन्मेश मधुकर खामकर व मधुकर महादेव खामकर |
| १८. | चुळणा | VN02/41020 | सेबेस्टीन जोजेफ डिसोजा | सांतान सेबेस्टीन डिसोजा |
| १९. | नवघर १/१ | VN03/23948 | के. एम. जोस | सी.आय. जोस |
| २०. | दिवाणमान १ | VN22/44155 | चार्लस डायगो डिसोजा | साधना विनोद गुप्ता |

जावक क्र.: वविशम/१५०२/२०२१-२२
दिनांक : ०९/०७/२०२१

सही/-
**(गिलसन घोन्सालवीस)**
सहा.आयुक्त (प्रभारी)
प्रभाग समिती 'एच'
वसई-विरार शहर महानगरपालिका

# 'ओमकार बिल्डर मुर्दाबाद'च्या घोषणांनी प्रकाशवाडी दुमदुमली सदनिका लॉटरी घोटाळ्या विरुद्ध शेकडो रहिवाशांचे उग्र आंदोलन




**मुंबई/प्रतिनिधी**

झोपडपट्टी पुनर्वसन योजने सारख्या सहकारी गृहनिर्माण योजनेवर सरकारचे लक्ष नसेल तर बिल्डर एस.आर. ए. च्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून रहिवाशांचे कसे हाल करू शकतो याचे भयंकर उदाहरण प्रकाशवाडी गृहनिर्माण प्रकल्पात बघायला मिळाले आहे. या ठिकाणी वर्षे-२००० पासूनच्या निवासाचे सर्व कायदेशीर पुरावे असलेल्या रहिवाश्यांना डावलून मागाहून पात्र झालेल्या लोकांना लाभार्थी बनवून एका बोगस ऑनलाईन लॉटरीद्वारे सदनिका वाटप करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडलाय ओमकार बिल्डर आणि एस.आर.ए.च्या काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी पात्र लाभार्थ्यांना कोणतीही सूचना न देता किंवा हरकती न मागवता दि.५ जुलै २०२१ रोजी गुपचूप ऑनलाईन लॉटरीद्वारे सदनिका वाटप केले ज्यामध्ये जे पात्र लाभार्थी होते ते बाजूलाच राहिले आणि पूर्वी ज्यांना घरे मिळाली त्यांनाच पुन्हा लाभार्थी बनवण्यात आले.तसेच वर्षे-२०२०व २०२१ मध्ये ६ व्यक्तीच्या नावे दोनदा लॉटरी काढण्यात आली. प्रकाशवाडी कामाबाग सहकारी गृहनिर्माण संस्था (ए विंग) चे मुख्यप्रवर्तक नविन लादे यांच्या नेतृत्व खाली रहिवाशांचे एक शिष्टमंडळ एस.आर.ए. चे सी.ई.ओ. सतीश लोखंडे यांना जाऊन भेटले पण त्यांना हि घोडचूक समजली तेव्हा प्रकरण दाबण्यासाठी पी.ए.पी.मधील सदनिका देण्यास सांगितले जेणेकरून हे पात्र झोपडीधारकांना याच लॉटरीमध्ये देण्यात यावे असा लादे यांनी तगादा लावला त्यामुळे शिष्टमंडळाचे समाधान झाले नाही म्हणून काल प्रकाशवाडी येथील शेकडो रहिवाशांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. या आंदोलनात बिल्डरने अन्याय केलेले वृध्द रहिवाशी आणि महिलाही मोठ्या संख्येने सामील झाल्या होत्या यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना नविन लादे यांनी ओमकार बिल्डरने तसेच एस.आर.ए.च्या अधिकाऱ्यांनी इथल्या रहिवाशांवर कशा प्रकारे अन्याय केला आणि आता एस.आर.ए.सारख्या योजनांमध्ये भ्रष्टाचार होत असल्याने सरकारने लक्ष घालणे किती आवश्यक आहे ते सांगितले तर बिल्डर कडून कशा प्रकारे अन्याय होतोय हे महिलांनी सांगितले बिल्डर वीजबिल देत नसल्याने वीज कंपन्या विद्युत पुरवठा खंडित करतात त्याचा परिणामही मीटर बंद पडून पाणीपुरवठा ठप्प होतो. पाच वर्ष पिण्याच्या पाण्याची टाकी धुतलेली नसल्याने तसेच दूषित पाणी पिण्याची वेळ रहिवाशांवर आलीय त्यामुळे त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. बिल्डरने वर्षे-२०१७ पासून लोकांना भाडे दिलेले नाही या सगळ्या बाबी स्थानिक नगरसेवक आणि आमदार यांच्या कानावर घातलेल्या आहेत एस.आर.ए. प्राधिकरणाला याबाबतच्या तक्रारींची निवेदने सुधा दिलेली आहेत. पण बिल्डर आणि एस. आर.ए.चे अधिकारी यांची मिलीभगत असल्याने इथल्या रहिवाश्यांच्या समस्यांकडे कुणी लक्ष देत नाही म्हणूनच शुक्रवारी, दि.०९ जुलै २०२१ रोजी रहिवाशी रस्त्यावर उतरले होते. झोपडपट्टीतल्या लोकांचे जीवनमान सुधारावे त्यांना स्वतःच्या मालकी हक्काचे सर्व सुविधायुक्त घर मिळावे यासाठीच सरकारकडून झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबवण्यात येतात पण सरकारचे या योजनांकडे लक्ष नसल्याने या योजना म्हणजे बिल्डर आणि एस.आर.ए.चे अधिकारी यांच्यासाठी चराऊ कुरणे बनले असून या कुरणावर स्थानिक लोकप्रतिनिधींनीही चरायला मिळत असल्याने तेही दुरून तमाशा बघत असतात आणि बिल्डरकडून आपला वाटा घेऊन रहिवाशांना वाऱ्यावर सोडलं असतात शुक्रवारी झालेल्या आंदोलनात ५ जुलै ची बोगस लॉटरी रद्द करून नव्या लॉटरीत सर्व पात्र झोपडीधारकांना सामावून घेण्याची मागणी नविन लादे यांनी केली त्याच बरोबर काँग्रेसचे माझी खासदार हुसेन दलवाई यांनी सादर प्रकरणी तातडीने कारवाई करावी असे आदेश एस.आर.ए.च्या सी.ई.ओ.ना दिलेत यावेळी प्रकाशवाडी ग्रुप चे हेमंत राठोड, भरत पंचाल, मकरंद आवारे, मनोज मिश्रा, राजकुमार सिंह, मंगेश शेडगे, दिवाकर चव्हाण, मनोज पंचाल, रमेश पराते, मोहन चौधरी व महिला गटचे नंदा आवारे, अस्मिता पंचाल, मानसी शेडगे, अनु पराते, राजकुमारी सिंग, उर्मिला राठोड, गीता पटेल, आशा पटेल, सोनल गीते, शशी पटेल आणि रायझिंग स्टारचे प्रेरणा लादे, चिराग लादे, विनायक मिश्रा, रितिक पटेल, सौरभ कोळंबेकर, अनिकेत पराते, तेजस कहार, रोशन मिश्रा यांच्यासह शेकडो रहिवाशी उपस्थित होत्या.




# लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांचा राष्ट्रवादीत प्रवेश



**देवणी/प्रतिनिधी**

लातुर जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांच्या सह अनेकांनी राष्ट्रवादी भवन मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात राज्याचे जलसंपदा मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती प्रवेश केला. या प्रसंगी धुमाळ यांच्या सोबत प्रवीण सुरवसे माजी जि.प. सदस्य, वैभव म्हेत्रे, अनिलकुमार देवांग्रे, बालाजी लवे वंचित आघाडी, सचिन दोडके, गुणवंत जाधव, संजय सावकार, बालाजी पाटील, सुधीर धुमाळ, विशाल धुमाळ, बळीराम माने आदींनी प्रवेश केला.

याप्रसंगी पाणी पुरवठा राज्यमंत्री तथा लातूरचे संपर्क मंत्री संजय बनसोडे, आमदार तथा लातुर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश जनरल सेकेट्री शिवाजीराव गर्जे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते डी. एन. शेळके, राष्ट्रवादी युवक प्रदेश अध्यक्ष महेबूब शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश कार्याध्यक्ष सुरज चव्हाण,देवणी तालुकाध्यक्ष प्रा.डा.अनिल इंगोले,बबन भोसले, नरेंद्र पाटील व्यासपीठवर उपस्थित होते. यावेळी निलंगा तालुका अध्यक्ष दिलीप पाटील, निलंगा शहर अध्यक्ष इस्माईल लदाफ, शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष विशाल पाटील, हसन चाऊस, राष्ट्रवादी युवक निलंगा तालुका अध्यक्ष उल्हास सूर्यवंशी, ॲड.निहाल पटेल जिल्हा सचिव युवक, आदी उपस्थित होते.

# होटगीत चिमरुडीसह मातेने केली आत्महत्या

**सोलापूर/प्रतिनिधी**

नवरा बायकोमध्ये झालेल्या भांडणातून होटगी (ता.दक्षिण सोलापूर) येथे एका विवाहित महिलेने आपल्या मुलीसह विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास दोघींचाही मृतदेह विहिरीत पाण्यावर तरंगताना आढळून आला. वळसंग पोलिस ठाण्यात याची नोंद झाली आहे. यामुळे होटगी गावावर शोककळा पसरली आहे. राचम्मा संतोष पटणे (वय २६) व मुलगी चैत्रा पटणे (वय ६, दोघी रा. पटणे गल्ली, होटगी ता. दक्षिण सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या दोघींची नावे आहेत. राचम्मा



व तिचा पती संतोष पटणे यांच्यामध्ये भांडण झाले होते. यामुळे ती सकाळी रागाच्या भरात आपल्या मुलीला घेऊन घरातून निघून गेली होती. नातेवाइकांनी दिवसभर तिचा शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही. बुधवारी फताटेवाडीजवळील अशोक चव्हाण यांच्या शेतातील (गट नंबर २४७) मधील विहिरीत दोघींचा मृतदेह पाण्यावर तरंगत असताना आढळून आला. याची माहिती मिळताच असून पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अतुल भोसले, पीएसआय पाटील व इतर सहकारी घटनास्थळी आले. स्थानिक लोकांच्या मदतीने मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आले. सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात पाठविले असता उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या दुर्दैवी घटनेची नोंद वळसंग पोलिस ठाण्यात झाली आहे.

पान १ वरून....

## बायको लागली भोंदू बाबाच्या नादी...

टाकला असावा याचा अंदाज बांधून पोलीसांनी घटनास्थळचा पंचनामा करून या घटनेच्या तपासाला सुरूवात केली असता. मयत तरूणाचा खून हा त्याच्या पत्नीनेच विवाहबाहय संबंधातून आणि संपतीच्या वादातून केल्याचे पुढे आले. आकुर्डी येथील आनंदा गुजर हा एक नावाजलेला व्यावसायिक होता. तो मुळचा सातारा जिल्हयातील खटाव तालुक्यातील होता.व्यवसायाच्या निमित्याने तो पुण्यातील आकुर्डी येथे स्थायीक झाला. त्याची आयडया कंपनीची एजन्सी होती.तसा तो व्यवसायात अल्पावधीतच यशस्वी झाल्याने त्याची कौटुंबिक पारिस्थीती ही सधन होती. त्याचे सगळे काही आलबेल सुरू असताना त्याची पत्नी सरोज मात्र भलत्याच माणसाच्या नादाला लागलेली होती. तिचे माहेर हे खारघर तालुक्यातील पनवेल जवळील चिखली हे होते. ती सारखी नवऱ्याला काही ना काही कारण सांगून माहेरी जात होती. ती माहेरी सारखी का जाते याचा शोध आनंदा याने घेतला असता त्याच्या पायाखालची जमीनच सरकली होती. ती आकुर्डी येथील वाल्हेकरवाडी येथील शिवगोरखक्षनाथ मंदिरातील मठाधिपती रमेश कुंभार याच्या नादाला लागल्याचे त्याला समजले. गेल्या तीन चार वर्षापासून त्या दोघांचे विवाहबाहय संबंध होते. रमेश हा भोंदू मठाधिपाती होता. तो आपल्या गोड वाणीने अडल्या नडल्या महिलांना आपल्या जाळ्यात अडकवत होता. तो त्या मठाचा मठाधिपाती असल्याने त्याच्याकडे अनेक भक्त मंडळी आपल्या अडी अडचणी घेऊन येत होते.आनंद गुजर याची पत्नी सरोज ही गेल्या काही वर्षापासून त्याच्याकडे आपली अडचण घेऊन जात होती. सरोज आणि आनंद गुजर याच्या लग्नाला आठ दहा वर्ष झाली होती. तरीही त्या दोघांच्या संसारवेलीवर अजून फुल उमलले नव्हती. त्यातूनच ती त्याच्या नादाला लागलेली होती. सरोजची सळसळती आणि मादक जवानी बघून मठाधिपती रमेश हा चेकाळला होता. तो तिला तंत्र मंत्र आणि अघोरी विदयेच्या नावाखाली सारखा भुलवत होता.कधी एकदा हिला आपल्या अंगाखाली घेऊन कुस्करतो असे त्याला झाले होते. ती सधन कुटूंबातील असल्याने तिच्याकडे पैसा अडका ही मुबलक प्रमाणात असल्याचे त्याच्या लक्षात आले. तो तिला नादाला लावणेसाठी आठवडयातून दोन वेळा आपल्या मठात बोलवत होता.मठातील एका आडोशाच्या खोलीत तो तिला नेवून सारखा चोरटा स्पर्श करीत होता. त्याच्या त्या स्पर्शाने ती शहरात असली की तो तिच्यावर मोहिनी विदयेने जादू करीत तिच्या नाजूक अवयवांना दाबत होता. ती त्याच्या अंकीत गेली असल्याने तो काही ही केला की ती गप्प बसत होती. कालांतराने ती त्याच्या जाळयात अडकल्यावर त्याने तिला आपल्या अंगाखाली घेण्याचे ठरविले. तसे तो संधीच्या शोधातच होता. तो बोलवला की ती येते हे तो जाणून असल्याने तिची कमसीन जवानी कुस्करायला तो तयारच होता. एकदा ती त्याच्या अंकीत आल्यावर त्याने तिच्यावर समोहन केले. ती तो सांगेल तसे करू लागल्यावर त्याने तिला तिच्या अंगावरचे कपडे काढायला लावले.तिने आपले कपडे काढल्यावर तिचा नग्न देह बघुन त्याने तिला बेडवर आडवे करत तो तिच्यावर स्वार झाला. तिची जवानी ओरबाडत त्याने तिला आपल्या अंगाखाली घेतले. तिच्यावर स्वार होत त्याने आपली इच्छा पुर्ण केली. नंतर तिने या बाबत त्याला विचारल्यावर तो तिला म्हणाला लवकरच तुझी मनोकामना पुर्ण होईल बस्स मी सांगेन तसे तू करायला हवे, आणि मी बोलावेन तेव्हा मठात यायला हवे असे सांगितले इथूनच त्या दोघांच्या विवाहबाहय संबंधाला सुरूवात झाली. गेल्या दोन तीन वर्षापासून त्याचे संबंध होते. तो तिला वेळोवेळी मठात बोलावून तिची जवानी ओरबाडत होता. सरोज आणि आनंदा गुजर याची परिस्थीती सधन असल्याने मठाधिपती रमेश कुंभार याने तिला तुझे काम झाले आहे तुझी मनोकामना पुर्ण होईल म्हणून सांगितल्यावर तिने त्याला आपल्याकडून एक ब्रिझा कार ही भेट दिली. आता तो तिला आपल्या मठातच कायमचे राह म्हणून सांगत होता. तिला ही तिची चटक लागल्याने ती मठात राहयला तयार झाली. त्याने तिला मोह माया यापासून दूर नेत तिच्याबरोबर शारीरिक संबंध प्रस्थिापित केले होते. आता ती गेल्या सहा सात महिन्यापासून त्याच्या सांगण्यावरून त्याच्या मठात राहू लागली होती. आपल्या पत्नीचे मठाधिपती रमेश कुंभार याच्याबरोबर अनैतिक संबंध असल्याचे आणि ती त्याच्याबरोबर मठात राहत असल्याचे समजल्यावर आनंदा गुजर याची होती नव्हती तेवढी इज्जत ही गेली होती. तो सारखे त्या मठात जावून पत्नी सरोज हिला घराकडे चल. मठाधिपती रमेश कुंभार याच्याबरोरचे संबंध तोडून टाक म्हणून सांगत होता. पण ती त्याचे काही ऐकत नव्हती. उलट ती नवऱ्यालाच तुमचा माझा काही संबंध नाही. मी आता मठातच राहणार आहे असे सांगून त्याला झिडकारत होती. त्या दोघाच्या संबंधाने आनंदा हा वैतागलेला होता. आता मठाधिपती रमेश कुंभार याची ही मती फिरली होती. त्याचा डोळा आता सरोज आणि आनंदा याच्या संपत्तीवर होता. सरोजच्या माध्यामातून तो आनंदा याची सगळी प्रॉप्रटी हडप करू इच्छित होता. त्याने सरोजला तर अंकीत केलेले होते. त्यातूनच तो सरोजला फूस लावून नवरा आनंदा याला एक तर मारून टाक किंवा त्याचेकडून घटस्फोट घे आणि त्याची सर्व संपत्ती तुझ्या नावावर करून घे म्हणून सांगत होता. तो सांगेल तसे ती करत असल्याने संपत्तीसाठी तो तिला नको ते करायला लावीत होता. आपली पत्नी मठाधिपती रमेश कुंभार याच्या नादाला लागून ती त्याच्याबरोबर मठातच राहत असल्याचे त्याने आपल्या घरच्या लोकांना सांगितले होते. त्यातूनच ती आपली सर्व संपत्ती तिच्या नावे करण्यास सांगत आहे आणि आपल्या जीवाला धोका ही असल्याचे त्याने खटाव येथील आपला भाऊ सुनिल याला सांगितले होते. त्याने त्याला संयम धर. आपण यातून मार्ग काढू असे सांगितल्याने तो गप्प बसला होता. पण इकडे सरोज ही रमेश याच्या सांगण्यावरून संपत्ती तिच्या नावे करण्यास त्याला तगदा लावीत होती. ती या कारणातून त्याला सारखे फोन करून विचारणा करीत होती.. या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावणेसाठी आनंदा हा शुक्रवार दि.२ जुलै रोजी त्या मठात गेला. त्याने या गोष्टीचा जाब सरोजला विचारीत मठातून तिला आपल्या बरोबर घरी चल म्हणून सांगत होता. ती जायला तयार नव्हती. ती रमेश कुंभार याच्या सांगण्यानुसार वागत असल्याचे बघून त्याने रमेश याला दम देवून याचे परिणाम गंभीर होतील असा इशारा दिला. यातून त्या दोघांची भांडणे सुरू झाली. रमेश कुंभार आणि त्याचे साथीदार यश निकम व अमोल बडदम यांनी मिळून आनंदा याला लाकडी बॅटने आणि बांबुने मारहाण करायला सुरूवात केली. त्यांनी त्याला जबर मारहाण केल्याने तो गंभीररित्या रक्ताच्या थरोळ्यात पडला. त्यातच रमेश याने त्याचा गळा जोरात आवळून धरला होता. त्यातच त्याचा मृत्यू झाला. त्याचा मृत्यू झाल्याचे त्या तिघांच्या लक्षात येताच त्यांनी त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे ठरविले. रमेश कुंभार याच्या सांगण्यावरून यश आणि अमोल यांनी आनंदा याचा मृतदेह त्याच्या गाडीवर ठेवून ती दुचाकीवर ठेवला. त्यापूर्वी त्यांनी त्या मोटारसायकलीची नंबर प्लेट बदलून बनावट नंबर प्लेट लावली.ते दोघे त्याचा मृतदेह घेऊन त्या रात्री कात्रज घाटात आले.नव्या बोगद्याजवळ हॉटेल मराठाशाही समोरील रस्त्याकडेला असणाऱ्या खड्डयात त्याचा मृतदेह त्यांनी टाकून तेथून पसार झाले.पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्या मोटार सायकलीच्या नंबर प्लेटवरून मयत तरूणाची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला परंतू ती नंबर प्लेट बनावट असल्याचे पोलीसांच्या लक्षात आल्यावर पोलीसांनी गाडीच्या चेस नंबरवरून गाडी मालकाचा शोध घेतला असता.ती मोटार सायकल आकुर्डी येथील आनंदा गुजर याची असल्याचे आणि तो मृतदेह त्याचा असल्याचे पोलीसांना खात्री पटल्यावर पोलीसांनी घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठवून दिला. मयत आंनदा गुजर याची पत्नी सरोज ही गेल्या सहा महिन्यापासून वाल्हेकरवाडी येथील शिवगोरखनाथ मठाचा मठाधिपती रमेश कुंभार याच्या बरोबर राहत असल्याचे तपासात पुढे आले. पोलीसांनी त्या मठात जावून रमेश कुंभार आणि सरोज याचे कडे चौकशी केली असता ते पोलीसांनी थातुर मातूर उत्तरे देवू लागले पोलीसांचा त्याचेवरील संशय बळावल्यावर पोलीस त्या दोघांना घेवून भारती विदयापीठ पोलीस स्टेशनला आणून चौकशी केली असता त्यानीच आनंदा गुजर याला मारहाण केली होती. त्यातच त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. रमेश कुंभार आणि सरोज यांनी आपले विवाहबाहय संबंध मान्य करून आनंदा गुजर याची त्या संबंधातून आणि त्याच्या प्रॉप्रटीच्या कारणातून त्याला मारले असल्याचे पोलीसांना सांगितले. त्यांनी आपल्या गुन्हयाच्या कबुली दिल्यावर या गुन्हयातील यश आणि अमोल यांना ही पोलीसांनी ताब्यात घेतले होते. या घटनेची फिर्याद मयत आनंदा गुजर याचा भाऊ सुनिल गुजर याने पोलीसात दिल्याने पोलीसांनी आंनदा गुलाब गुजर(वय ४४) याचा खून करून पुरावा नष्ट केले प्रकरणी रमेश विलास कुंभार (वय ४९)मयताची पत्नी सरोज आनंदा गुजर (वय ३५) यश योगेश निकम (वय १९) अमोल रामदास बडदम(वय २५) याचे विरोधात भा.दं.वी, कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याना मा.कोर्टा समोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा तपास वरिष्ट पोलीस निरी.जगन्नाथ कळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरी. प्रकाश पासलकर, पोलीस उप.निरी.नितीन शिंदे, अंमलदार रवींद्र भोसले, रवींद्र चिप्पा, सचिन पवार, हर्षल शिंदे, गणेश शेंडे, विक्रम सावंत, अशिष गायकवाड, सचिन गाडे, जगदीश खेडकर, प्रसाद टापरे आणि संतोष खताळ यांनी केला. विवाहबाहय संबंध हे कधीच जास्त काळ टिकत नाहीत तरीही त्या संबंधात अनेक बाहेरख्याली स्त्री पुरूष अडकत असतात. विवाहित महिलेला त्या संबंधातून नवरा नको असतो पण नवऱ्याची संपत्ती पाहिजे असते. त्यासाठी त्या वाटेल ते करायला तयार असतात. हेच या घटनेवरून दिसून येते सरोज ही त्या संबंधातून रमेश याला चिकटली खरी पण तिला नवरा नकोच होता. म्हणून तिने त्या संबंधातून नवरा आनंदा याला प्रियकर रमेश कुंभार याच्याकडून मारून टाकले.हेच या घटनेवरून दिसून येते.

## दारूची नशा त्यांच्या डोक्यात गेली...

आरोपीला शोधून काढतात. विलेपार्ले पोलिसांनी असाच एक कारनामा दाखवत एका खूनाच्या गुन्ह्यातील आरोपींना फक्त ५ दिवसात गजाआड केले. विलेपार्ले पोलिस ठाण्याच्या हद्दीत हा खूनाचा गुन्हा घडला होता. विशेष म्हणजे या गुन्ह्यातील आरोपी सराईत गुन्हेगार नव्हते, की त्याचे पोलीस दप्तरी कुठलेही गुन्हेगारी स्वरूपाचे रेकॉर्ड नव्हते. हा गुन्हा उघडकीस आणणे म्हणजे पोलीसांना एक आवाहन होते. ते आवाहन पेलवत आपल्या तपासातील बुद्धीकौशल्य कस दाखवत खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना ५ दिवसात गजाआड करण्यात पोलिसांनी यश मिळवले आहे. हा खूनाचा गंभीर गुन्हा विलेपार्ले पोलीस ठाणे हद्दीत (गुन्हा रजिस्टर क्रमांक ४८८/२०२१ कलम ३०२ ३९७ ३४ भादवी) हा गुन्हा दिनांक २२ /६ /२०२१ रोजी ३ रा मजला, जाल हॉटेल विलेपार्ले (पूर्व) मुंबई या पडक्या इमारती मध्ये घडला होता. दोन अज्ञात आरोपींनी मयत जिगर सुरेश चावडा वय २३ वर्षे याच्या डोक्यात लाकडी ठोकळयाने व दगडासारखे हाताने गंभीर दुखापत करून त्याचा खून करुन त्याला बेसमेंट मध्ये फरपडत नेहुण टाकून त्याचा मोबाईल फोन घेऊन पळून गेले होते.

आरोपी हे कचरा वेचणारे असल्याचे निष्पन्न झाले. परंतु त्यांचा कोणताही ठावठिकाणा उपलब्ध नव्हता किंवा त्यांच्या वर्णनाबद्दल काहीच माहिती मिळून आली नव्हती. अशा परिस्थितीत तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक राजेंद्र काणे, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक शीव भोसले, पोलीस उपनिरीक्षक पटेल गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस हवलदार महाडेश्वर, चिपकर, महाले, कांबळे, पडवळ, लोंढे, राठोड, दिवानजी, संतोष कांबळे, तांबे, गायकवाड, खंदारे, शिंदे यांनी अत्यंत मेहनतीने, कसोशीने, चिकाटीने केलेल्या प्रयत्नांची ४० कचरावेचनारे इसमांकडे केलेल्या चौकशी मध्ये पहिला आरोपी जमील अहमद अन्सारी वय ४५ वर्ष हा दिनांक २४/०६ /२०२१ रोजी मिळून आला. त्यानंतर दुसऱ्या आरोपीचा शोध घेण्यासाठी नागपाडा ते दहिसर पर्यंतचे शेकडो कचरा वेचणारे, भिकारी, भंगार विकत घेणारे अशा इसमांकडे विलेपार्ले पोलीस ठाण्याचे अधिकारी अंमलदार तसेच पार्लेकर पोलीस मित्र मधील महिला व पुरुष यांच्या सहकार्याने या गुन्ह्यातील दुसरा आरोपी रितेश विलास मारू वय ३६ वर्ष यास आज दिनांक २६/६/२०२१ रोजी कांदिवली (पश्चिम) येथून ताब्यात घेऊन या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याच्या तपासात विशेष बाब म्हणजे या गुन्ह्यातील जखमी मयत जीगर सुरेश चावडा वय २३ वर्षे याच्यावर सात गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३०७ सारखा गंभीर गुन्हा सुद्धा नोंद आहे व तो साकीनाका येथून तडीपार होता. आरोपींच्या विषयी कोणतीच माहिती नसताना अज्ञात आरोपीने खुनाच्या गुन्ह्यामध्ये ३ दिवसात चिकाटीने मेहनत घेऊन पहिला आरोपी सँडहरोड या ठिकाणी व दुसरा आरोपी ५ दिवसात कांदिवली (प) येथुन शोधून काढला. संपूर्ण मुंबईमध्ये केलेल्या कसोशीने तपास यामुळेच विलेपार्ले पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदार यांना यश मिळाले आहे. नमूद गुन्हा उघडकीस आणण्यासाठी अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग संदीप कर्णीक, पोलीस उप आयुक्त परिमंडळ मंजुनाथ सिंगे, सहाय्यक पोलीस आयुक्त वाकोला विभाग अविनाश धर्माधिकारी व विलेपार्ले पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती अलका मांडवे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले आहे.

## नोकरीसाठी वाहिनीने बाहेर पाऊल...

तरुणाची वहिनी असून त्या विधवा आहेत. काही दिवसांपूर्वी पीडितेच्या पतीचं निधन झालं आहे. पतीचं निधन झाल्यानंतर घरच्यांवर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी पीडित महिलेनं नोकरी करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी तिनं आरोपी प्रबुद्ध कांबळे यांच्या घराशेजारी असणाऱ्या सुदांशू प्रमाणिक यांच्या ज्वेलर्सच्या दुकानात नोकरीसाठी विचारणा केली. सुदांशू प्रमाणिक यांनीही त्वरित पीडितेला नोकरी दिली. पण वहिनीचा दुकानात काम करण्याचा निर्णय आरोपी दिराला आवडला नाहीय. त्यामुळे त्यानं विरोध केला. पण पतीचं निधन झाल्यानं पैसा कमवणं आवश्यक असल्यानं पीडितेनं ज्वेलर्सच्या दुकानात नोकरी करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळं चिडलेल्या दिरानं गुरुवारी रात्री आपल्या वहिनीच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकलं. या दुर्दैवी घटनेत वहिनींचा चेहऱ्यासह शरीर अनेक ठिकाणी भाजलं आहे. स्थानिक रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी दिराला बेड्या ठोकल्या आहेत. याप्रकरणाचा पुढील तपास घाटकोपर पोलीस करत आहेत.

## न्याय देवतेने तरी का करावी अशा...

सपासप वार करण्यास सुरुवात केली. त्या वृद्ध माऊलीला स्वतःचा जीव वाचवण्यास ही वाव मिळाला नाही. ती जोपर्यंत शांत होत नाही तोपर्यंत सुनिल आईवर हल्ला करीतच राहीला. ती कधी त्याला सोडून कायमची मोक्षप्राप्तीसाठी गेली हे देखील त्या निर्दयाला कळले नाही. अखेर ती शांत झाल्यानंतर सुनिल भानावर आला. परंतू आई स्वर्गवासी जाऊनही त्याचे समाधान झाले नव्हते. त्या क्रूरकर्म्याने चाकू, सुरी आणि संत्तूरने आईच्या मृतदेहाचे तुकडे करीत त्या मृतदेहाची विटंबना केली. आईच्या मृतदेहाचे काही तुकडे किचन ओट्यावर ठेवले, तर काही तुकडे तिखट मीठ लावून तळून खाल्ले. यामध्ये काईचे काळीजही होते. या नराधमाने आईच्या मृतदेहाची घरभर विटंबना केली होती. हे सर्व केल्यानंतर त्याला कोणताही पश्चाताप झालेला नव्हता. तो तशाच अवस्थेत घराबाहेर पडला असता स्थानिक नागरीकांनी पाहिले की सुनिलच्या तोंडाला व कपड्यांना रक्त लागलेले आहे. याने नक्कीच घरी काहीतरी भीषण कांड केले असणार. नागरिकांनी सुनिलला ताब्यात घेऊन त्याचे घर गाठले तेंव्हा घरात व किचन ओट्यावर आईच्या शरीराचे तुकडे विखुरलेले होते. ते दृष्य पाहणाऱ्यांना प्रचंड धक्का बसला. नागरिकांनी तात्काळ याची माहिती शाहूपूरी पोलीस ठाण्यास कळवली. पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपी सुनिल यास आईच्या खूनाच्या गुन्ह्यात अटक केली. तत्कालीन पोलीस निरीक्षक संजय मोरे यांनी या गुन्ह्याचा कसून तपास करीत आरोपीविरुद्ध भक्कम पुरावा, तसेच स्थानिक नागरीकांना साक्षीदार करून एकून ३४ पैकी १२ साक्षीदारांचे आरोपी सुनिल विरूद्ध जबाब नोदवले. आरोपी सुनिल यास न्यायालयात उभे करून याच आरोपीने स्वतःच्या आईची किती निर्दपणे हत्या करून तिचे काळीज चक्क तळून खाल्ले हे न्यायालयास पटवून दिले. घटना अत्यंत गंभीर तर आहेच परंतू मानव जातीला काळीमा फासणारी आहे असं मत नोंदवत न्यायालयाने आरोपी सुनिल रामा कुचकोरवी यास न्यायालयाने मरेपर्यत फाशी व २५ हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली. आरोपीने दारूच्या नशेत आणि दारूची ईच्छा तृप्त करण्यासाठी आई पैसे देत नसल्याने आईची हत्या केली असली तरी त्याने केलेला हा गुन्ह्या अतिभयंकर आणि गंभीर असल्याचे मत कायदेतज्ज्ञानी मांडले आहे. संतापाच्या भरात हत्या करू शकतो परंतू आईच्या हत्येनंतर त्याने केलेले कृत्य अमानवी तर आहेच शिवाय मानव जातीला कलंकीत करणारे आहे.

12 TO 18 JULY 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 10/07/2021 8:41 PM Page 1



# मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांचा जिल्हा परिषदेत आत्मदहनाचा प्रयत्न!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर येथील जिल्हा परिषद कन्नड मुलींच्या शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांच्यावर केलेल्या तक्रारीच्या चौकशीत कोणताही दोष आढळून आला नसतानाही जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने त्यांच्यावर अन्याय करत बदली केली. दरम्यान अन्यायग्रस्त मुख्याध्यापक कट्टीमनी यांनी सोमवारी जिल्हा परिषद गाठुन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनासमोर ज्वालाग्राही द्रव्य ओतून घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान सदर बाजार पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी प्रसंगावधानता बाळगत त्यांना आत्मदहन करण्यापासून परावृत्त केल्याने मोठा अनर्थ टळला.

मुख्याध्यापक कट्टीमनी यांनी पुणे विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. याची दखल घेत त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना आत्मदहनाबाबत जबाबदार धरले होते. तरीही मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी संजीवकुमार राठोड यांनी दखल न घेतल्याने मुख्याध्यापकांनी टोकाचे पाऊल उचलले. नागणसूर येथील जिल्हा परिषद कन्नड मुलींच्या शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना विनाकारण त्यांची बदनामी करण्यासाठी त्यांच्यावर खोटा आरोप करत जिल्हा परिषदेचे सीईओ आणि शिक्षण विभागाकडे तक्रार करण्यात आली. या तक्रारीनंतर त्यांची वेगवेगळ्या समित्या नेमून चौकशी करण्यात आली. त्यात महिला तक्रार निवारण समिती व चौकशी समितीने त्यांचे काम, त्यांची कार्यपद्धती याची चौकशी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना तसा अहवालही दिला. या अहवालामध्ये त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा ठपका ठेवण्यात आलेला नाही. या अहवालानुसार त्यांना पुन्हा नागणसूरच्या कन्नड मुलींच्या शाळेत मुख्याध्यापक या पदावर नियुक्ती करण्याचे आदेश देण्यात आले. या आदेशानंतर महांतेश कट्टीमनी रुजू झाले. दोन महिने विनातक्रार त्यांनी कार्यभारही सांभाळला. त्यानंतर माशी कुठे शिंकली काय माहित? त्यांच्यावर अन्याय करत शिक्षण विभागाने पती-पत्नीचा नियम डावलून त्यांना तडवळच्या जिल्हा परिषद कन्नड शाळेत बदली केली. या नियमबाह्य बदलीच्या विरोधात मुख्याध्यापक कट्टीमनी यांनी पती पत्नी एकत्र शाळा आणि गाव बदलून देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षण विभागाकडे वारंवार विनंती अर्ज करूनसुद्धा त्यांच्या विनंती अर्जाचा विचार न झाल्याने त्यांनी चार महिने अर्जित रजेवर राहिले. त्यानंतर प्रापंचिक अडचणी, मुलांचे शिक्षण आणि आर्थिक तोटा यामुळेच ते पुन्हा तडवळ शाळेत रुजू झाले. दरम्यान चार महिने रजेवर असलेल्या कालावधीतील पगार देण्यासाठीही प्रशासनाने नकार दिला. यामुळे त्यांच्या कौटुंबिक अडचणीमध्ये वाढ झाल्याने शिवाय वारंवार प्रशासनाकडे विनंती अर्ज करूनही कोणीही दखल न घेतल्यामुळे कट्टीमनी यांनी आत्मदहन करण्याचा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना सहकुटुंब भेटून निवेदन दिले त्यानंतरही त्यांच्या बाबत कोणताही विचार झाला नाही. यामुळे त्यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

### शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे पीए रडारवर

शिक्षणाधिकारी संजीवकुमार राठोड यांनी मी प्रताप नगर तांड्याचा आहे. तुला बघून घेतो अशी दमबाजी मुख्याध्यापक कट्टीमनी यांना वारंवार दिल्याचा आरोप कट्टीमनी केला. शिवाय मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे पीए अविनाश गोडसे हेही दमबाजी करतात व माझ्याकडून त्यांनी पैसे घेतल्याचा आरोपही कट्टीमनी यांनी केला आहे. एवढे नियमबाह्य बदली करणाऱ्या अक्कलकोटचे गटशिक्षणाधिकारी अशोक भांजे यांच्यामुळे माझ्यावर ही वेळ आली आहे. गटशिक्षणाधिकारी व शिक्षण अधिकारी यांची विभागीय चौकशी करून त्यांना निलंबित करण्याची मागणीही यावेळी महांतेश्वर कट्टीमनी यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर केली. यापुढे आठ दिवसात निर्णय न झाल्यास मंत्रालयासमोर कुटुंबीयांसह पेटवून घेण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. या सगळ्या मागण्यांची पूर्तता आठ दिवसात करण्याची हमी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली

### आठ दिवसात तोडगा काढण्याची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची हमी

आत्मदहन करण्याचा प्रयत्नादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी कट्टीमनी यांना भेटून आठ दिवसात आपल्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय देण्याची हमी दिली. दरम्यान कट्टीमनी आणि विनाकारण बदली करण्यात आली आहे. यामुळे नागणसूर जिल्हा परिषद कन्नड मुलींच्या शाळेतच नियुक्ती देण्याबाबत ठाम राहिले. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तीही मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. आत्मदहन आ पासून रोखण्यासाठी सलग दोन दिवस पोलीस आणि त्यांच्या कुटुंबियांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला शिवाय जिल्हा परिषदेच्या आवारात डोळ्यात अंजन घालून कट्टीमनी यांना शोधत होते. तरीही त्यांनी पोलिसांना चकवा देत आत्मदहनाचा प्रयत्न केला.

# विविध उपक्रमांद्वारे राज्यात १५ हजार ३३६ बेरोजगारांना मिळाला रोजगार -नवाब मलिक

**मुंबई/प्रतिनिधी**

कोरोनाच्या संकटामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण झाली असताना कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांद्वारे राज्यात जून २०२१ मध्ये १५ हजार ३३६ बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यात आला असल्याची माहिती या विभागाचे मंत्री नवाब मलिक यांनी दिली. महास्वयंम वेबपोर्टल, ऑनलाईन रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे राज्यात नोकरीइच्छूक उमेदवार आणि विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांची सांगड घालून रोजगार उपलब्ध करुन देण्यात येतो. अशा विविध उपक्रमांमधून मागील वर्षी २०२० मध्ये राज्यात १ लाख ९९ हजार ४८६ उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात यश आले, तर चालू वर्षात जानेवारी ते जूनअखेर ७८ हजार ३९१ बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यात आला आहे, असे मंत्री नवाब मलिक यांनी सांगितले.



कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक म्हणाले की, बेरोजगार उमेदवार आणि उद्योजक यांच्यामध्ये सांगड घालण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाने https://rojgar.mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल सुरु केले आहे. या वेबपोर्टलवर बेरोजगार उमेदवार आपले शिक्षण, कौशल्ये, अनुभव आदी माहीतीसह नोंदणी करतात. त्याचबरोबर कुशल उमेदवारांच्या शोधात असलेल्या कंपन्या, उद्योजक, कॉर्पोरेट्स हे सुद्धा या वेबपोर्टलवर नोंदणी करुन त्यांना हवे असलेले कुशल उमेदवार शोधू शकतात. नोकरीइच्छूक उमेदवारांनी या वेबपोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. विभागामार्फत जिल्ह्यांमध्ये वेळोवेळी ऑनलाईन रोजगार मेळाव्यांचेही आयोजन करण्यात येते.

### नोंदणीकृत उद्योगांमध्ये नोकरीची संधी

विभागाकडे, महास्वयंम वेबपोर्टलवर आतापर्यंत ९० हजार २६० इतक्या सार्वजनिक व खाजगी उद्योजकांनी नोंदणी केली आहे. यापैकी अनेक उद्योजक आवश्यकतेनुसार त्यांच्याकडील रिक्त पदांची भरती महास्वयंम वेबपोर्टल तसेच कौशल्य विकास विभागाचे ऑनलाईन मेळावे आदी उपक्रमांमधून वेळोवेळी करतात. त्यामुळे नोकरीइच्छूक उमेदवारांना कौशल्य विकास विभागाच्या उपक्रमांमधून नोकरी मिळविण्यासाठी चांगले व्यासपीठ उपलब्ध झाले आहे, असे मंत्री नवाब मलिक यांनी सांगितले.

### मुंबईत जूनमध्ये ६ हजार ३३० बेरोजगारांना रोजगार

मंत्री नवाब मलिक म्हणाले की, माहे जून २०२१ मध्ये विभागाकडे ३३ हजार ३२९ इतक्या नोकरीइच्छूक उमेदवारांनी नवीन नोंदणी किंवा पुनर्नोंदणी केली आहे. यात मुंबई विभागात ९ हजार १०९, नाशिक विभागात ६ हजार ५९४, पुणे विभागात ९ हजार ६०४, औरंगाबाद विभागात ५ हजार १४१, अमरावती विभागात १ हजार २९४ तर नागपूर विभागात १ हजार ५८७ बेरोजगार उमेदवारांनी नोंदणी केली. माहे जूनमध्ये कौशल्य विकास विभागाच्या विविध उपक्रमांद्वारे १५ हजार ३३६ उमेदवार नोकरीस लागले. यामध्ये मुंबई विभागात सर्वाधिक ६ हजार ३३०, नाशिक विभागात ३ हजार १११, पुणे विभागात ४ हजार ०७८, औरंगाबाद विभागात १ हजार ६५२, अमरावती विभागात ७९ तर नागपूर विभागात ८६ इतके बेरोजगार उमेदवार नोकरीस लागले.

# लातूर येथील विमानतळ प्रवासी वाहतुकीसाठी होणार सज्ज

**लातूर/प्रतिनिधी**



लातूर विमानतळावर सुरू असलेली संरक्षण भिंत, हवाई धावपटटी, नाईट लॅडींगची व्यवस्था या संबधीची कामे त्वरीत पूर्ण करून मेडीकल इर्मजन्सीसाठी तीन महीन्यात तर प्रवासी वाहतुकीसाठी हे विमानतळ सहा महिन्यात सज्ज करावे असे निर्देश राज्याचे वैद्यकीय शिक्षण व संस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी दिले आहेत. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ तसेच रिलायन्स एअरपोर्ट अथोरिटीचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासमवेत आज मंत्रालयातून दूरदृश्य प्रणालीद्वारे लातूर विमानतळ विकास कामाचा पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी आढावा घेतला. यावेळी संरक्षण भिंत बांधकामात आलेल्या अडचणी, जमीन अधिग्रहन त्याच बरोबर धावपट्टीची एकुण लांबी, नाईट लँडिंगसाठी कराव्या लागणाऱ्या व्यवस्था या संबंधाने बैठकीत सविस्तर चर्चा झाली. विमानतळासाठी उपलब्ध असलेल्या जागेचा विचार करून त्याप्रमाणे धावपटटीत थोडा फार फरक करून संरक्षणभिंतीचे राहीलेले काम पूर्ण करावे, शेतकऱ्यांना विश्र्वासात घेऊन आवश्यकते प्रमाणे जमीनीचे संपादन करावे अशा सुचना पालकमंत्री देशमुख यांनी यावेळी दिल्या. इतर कामे सुरू असतांना नाईट लॅडीगची व्यवस्था उभारावी, सध्याची कोरोना प्रादुर्भावाची परिस्थिती लक्षात घेता येत्या तीन महीन्यात शिल्लक राहीलेले कामे जलद गतीने पूर्ण करून या विमानतळा वरून मेडिकल इमर्जन्सी सेवा सुरू करावी तर प्रवासी वाहतुकीसाठी हे विमानतळ सहा महिन्यात सुसज्ज करावे असे निर्देशही या बैठकी दरम्यान त्यांनी दिले आहेत. लातूर विमानतळ विकास कामाचा आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या या बैठकीत रिलायन्स एअरपोर्ट अथोरिटीचे तारीक भट, एमआयडी भूसंपादन व्यवस्थापक गोपीनाथ ठोंबरे, के एम चाटे , लातूर विभागीय अधिकारी महेश कुमार मेघमाळे, कार्यकारी अभियंता संजय कौसडीकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

# कोयनानगर येथील नियोजित एसडीआरएफ आणि पोलीस प्रशिक्षण उपकेंद्राबाबत मुख्यमंत्र्यांकडे होणार सादरीकरण!

## महिन्याभरात सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे गृह राज्यमंत्री शंभुराज देसाई यांचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी**

कोयनानगर येथे राज्य आपत्ती बचाव दल आणि पोलीस प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्याबाबत पुढील एका महिन्याच्या आत सविस्तर प्रस्ताव तयार करून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे सादरीकरण करण्यात येणार असल्याची माहिती गृह राज्यमंत्री (ग्रामीण) शंभुराज देसाई यांनी आज दिली. कोयनानगर येथे नियोजित असलेल्या राज्य आपत्ती बचाव दल आणि पोलीस प्रशिक्षण उपकेंद्राच्या सद्यस्थितीचा आढावा आज गृहराज्यमंत्री (ग्रामीण) शंभुराज देसाई यांनी घेतला. हा प्रकल्प देसाई यांचे संकल्पनेतून साकारला जाणार असून या प्रकल्पाला तातडीने मूर्त स्वरूप देण्यासाठी शासन स्तरावर भक्कमपणे पाठपुरावा त्यांनी केला आहे. या बहुउद्देशिय प्रकल्पाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोयना धरन भेटी दरम्यानतत्वत: मान्यता दिली असून या प्रकल्पाचा आराखडा तयार करून तसा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. त्यामुळे हा प्रकल्प लवकरात लवकर उभारण्यासाठी प्रशासनाने जलद गतीने कार्यवाही करावी, असे निर्देश श्री.देसाई यांनी यावेळी दिले.



पावसाळ्यात सांगली, सातारा आणि कोल्हापूर भागात पुर परिस्थिती निर्माण होते. त्यावेळी मदत कार्यासाठी एनडीआरएफ, पोलीस, एसआरपीएफ आदी दलांची आवश्यकता असते. हे मदत कार्य लोकांपर्यत जलदगतीने पोहोचविण्यासाठी कोयनानगर येथे नियोजित असलेले राज्य आपत्ती बचाव दल आणि पोलीस प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्याची गरज आहे. या भागात सर्व सोई सुविधा आहेत जागाही शासनाचीच असल्यामुळे जागेचाही अडसर दूर झाला आहे. या एसडीआरएफ आणि पोलीस प्रशिक्षण उपकेंद्रासाठी ३२ हेक्टर अर्थात ८० एकर जागा उपलब्ध असून ती महसुल विभागाकडे वापरात नसलेली जागा आहे. ही जागा गृह विभागाला हस्तांतरीत होणे गरजेचे आहे. त्यासाठी गट/सर्व्हे क्रमांक २५, २६, २७ या क्षेत्रातील जमीन महसूल विभागाची आहे. ती जागा महसूल विभागाकडून गृह विभाग अथवा पोलीस महासंचालक कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महसूल विभागाकडे सादर करावा व त्यासाठी जलदगतीने पाठपुरावा करावा, असे निर्देश देसाई यांनी सातारा पोलीस अधीक्षकांना दिलेत. मंत्रालयात झालेल्या या आढावा बैठकीला अतिरिक्त मुख्य सचिव आनंद लिमये, पोलीस महासंचालक संजय पांण्डेय, गृह विभागाचे प्रधान सचिव संजय सक्सेना, अतिरिक्त पोलीस महासंचालक एस जगन्नाथन, वित्त विभागाचे सह सचिव विवेक दहीफळे, साताराचे पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# प्रवासी बनून रक्कम पळविणाऱ्या दोन महिलांना केले जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



राष्ट्रीय महामार्गावर प्रवाशी म्हणून वाहनामध्ये बसून वाहन धारकांची नजर चुकवून रोख रक्कम चोरी करणाऱ्या सराईत महिला गुन्हेगार जेरबंद त्यांचेकडून गुन्हयातील १ लाख ८० हजार रूपये किंमतीचा रोख मुद्देमाल हस्तगत करण्यात आली आहे ही कारवाई सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केले आहे. दिनांक ०३/०७/२०२१ रोजी दुपारच्या दीड वाजण्याच्या सुमारास यातील फिर्यादी मुस्ताक मोहमद युसुफ धारूल रा. गणेश पेठ सोलापूर व त्याचा चालक असे दोघे पीकअप वाहनातून सोलापूर येथून करमाळा येथे शेळया खरेदी करण्याकरीता जात असता मोहोळ येथील हॉटेल संकेत जवळील शेटफळ च्या पुढे रसत्याच्या बाजूस तीन महिला या दोन लहान मुलांना घेवून थांबल्या होत्या. त्यांनी पीकअप चालकास हातवारे करून वाहन थांबविण्याचा इशारा केल्या नंतर पिकअप चालकाने वाहन त्यांचे जवळ घेवून थांबविले असता तेंव्हा त्या महिला आम्हांस मोडनिंब पर्यत जावयाचे आहे असे सांगितल्याने फिर्यादी यांनी त्यांना बसण्यास सांगितले. तीन महिला पैकी दोन महिला हया दरवाजा उघडून पीकअप गाडीच्या समोरील सिटवर दोन लहान मुलास घेवून बसल्या व एक महिला ही खाली तशीच थांबली असल्याने फिर्यादी यांने तीस पीकअपच्या मागे बसा असे सांगितले असता तिने नकार दिला व समोरील सिटवर बसलेल्या महिला हया मुलांना घेवून खाली उतरल्या व आम्हांला यायचे नाही असे सांगितल्याने फिर्यादी हा पिकअप वाहन घेवून पुढे निघून गेला. फिर्यादी हा पुढे थोडया अंतरावर मौजे अरण जवळ आल्यानंतर चालकाने पैसे व्यवस्थित आहेत का? बघा असे सांगितल्याने फिर्यादी याने पिकअप मधील ड्रावर चेक केले असता त्यामधील पैसे ठेवलेली कॅरीबॅगच नसल्याचे समजताच फिर्यादी याने पिकअपमध्ये इतरत्र पाहिले असता त्यास पैशाची कॅरीबॅग कोठेच दिसून आली नाही. त्यामुळे फिर्यादीची पुर्णपणे खात्री झाली की, संकेत हॉटेलच्या जवळ वाहन थांबविलेल्या तीन महिलांपैकी पुढे बसलेल्या दोन महिलांनीच आमचे कॅरीबॅग मध्ये शेळया आणण्याकरीता ठेवलेले ३,२०,००/ रू. ची रोख रक्कम चोरली आहे म्हणून यातील फियादी यांने फिर्याद दिले वरून मोहोळ पोलीस ठाणे येथे गुरनं ६१६ /२०२१ भादविसंक ३७९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

सदरचा गुन्हा घडल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणणेकामी आदेशित करून यापूर्वी अशा पध्दतीचे झालेल्या गुन्हेगारांचे फोटो हे फिर्यादीस दाखवून ओळख पटविणेबाबत सुचना दिल्या. तेंव्हा स्थानिक गुन्हे शाखेकडील सफौ ख्वाजा मुजावर यांनी फिर्यादी व चालकास यापूर्वी अटक झालेल्या रेकॉर्डवरील महिलांचे फोटो दाखविले असता फिर्यादीने एका महिलेचे फोटो ओळखून हिच महिला माझे पिकअप वाहनामध्ये दोन महिलांसह बसल्याचे खात्रीने सांगितले. संशयित महिला आरोपींचे ठावठिकाणाबाबत माहिती घेतली असता सदरच्या महिला हया मौजे कोर्टी ता. करमाळा या भागातील असल्याचे समजले. त्यावरून पथक करमाळा भागात असताना माहिती मिळाली की, सदरच्या महिला हया मौजे कोर्टी ता. करमाळा गांवच्या स्टॅन्डच्या चैकातील मिठाईच्या दुकानासमोर थांबले असल्याची खात्रीशिर बातमी मिळाली. तेथे जावून त्यांना तात्काळ ताब्यात घेवून त्यांचेकडे वरील गुन्हयाचे अनुषगाने विचारपूस करता त्यांनी सुरवातीस उडवाउडवीचे उत्तरे दिली. त्यांना अधिक विश्वासात घेवून त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी मागील चार दिवसापूर्वी शेटफळ जवळील रस्त्यावर एक पिकअप वाहनास थांबवून वाहनात बसून त्यांची नजर चुकवून ड्रावर मधील पैशाची कॅरीबॅग चोरली असल्याचे सांगितले. त्या दोन महिलांच्या कब्जातून गुन्हयातील चोरीस गेलेली १, ८०, ०००/ रू. रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. संशयित महिला आरोपी पैकी एक महिला ही सराईत रेकॉर्डवरील गुन्हेगार असून तिचे विरूध्द सोलापूर पोलीस आयुक्तालयामध्ये अशा पध्दतीचे एकूण चोरीचे १२ गुन्हे दाखल आहेत. सदर महिलांना गुन्हयाचेकामी अटक करून मोहोळ पोलीस ठाणे येथे हजर केले असता त्यांना मा. कोर्टाने दिनांक ९ जुलै रोजी पर्यत पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे. सदरची कामगिरी सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सफौ ख्वाजा मुजावर, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, चालक समीर शेख, महिला अंमलदार सरस्वती सुगंधी यांनी बजावली आहे.

# नागझरी येथे ५०० वृक्षाची लागवड

**अहमदपूर/प्रतिनिधी**

जि.प.प्रशाळा नागझरी येथे ग्रामपंचायत च्या वतीने उपसरपंच उध्दव ईप्पर यांच्या वाढदिवसा निमित्त वृक्षारोपनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रामकिशन सूर्यवंशी हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक उपजिल्हाधिकारी प्रमोद कुडाळे, प्रमुख पाहुणे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, जि. प. सदस्य माधव जाधव हे होते. यावेळी बोतलताना उपजिल्हाधिकारी प्रमोद कुडाळे म्हणाले की, महाराष्ट्रत औद्योगिकरणामुळे खूप मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली आहे ती भरून काढण्यासाठी वृक्षारोपण करणे व संगोपन करणे गरजेचे आहे. तर तहसिलदार प्रसाद कुलकर्णी म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल बिघडत चालत आहे तो राखुण ठेवण्यासाठी वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे. व त्यापेक्षा ही वृक्षांचे संगोपन करणे जास्त गरजेचे आहे. लातूर जिल्ह्यात वृक्ष खूप कमी प्रमाणत आहेत. त्याची भरपाई करण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडाची लागवड होणे गरजेचे आसल्याचे मत व्यक्त केले. यावेळी उपसरपंच उधव इप्पर म्हणाले की रोड पासून गावापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने, जि. प. मैदान, स्मशान भूमी येथे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. गावात कायम स्वरुपी पाण्याची सोय, गावातील वृध्द, विधवा, निराधार यांना पेंशन चा लाभ. गावामध्ये १००% घरकुलांचे लाभ.अश्या गावातील अनेक समस्या कडे लक्ष घालून ते पुर्ण करण्यात येईल याकडे पुर्ण लक्ष देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी कृषीसहायक कलमे साहेब, कृषी सहायक नाईक, निराधार समिती सदस्य व्यंकट वंगे, श्याम पाटील, दयानंद पाटील, चंद्रकांत शिंगारे, ग्रामसेवक जगताप साहेब, शाळेचे मुखयाध्यापक कुंडगिर सर, सहशिक्षक राठोड सर हे सर्वजण आवर्जून उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.व्यंकटराव इप्पर केले तर आभार मुख्याध्यापक कुंडगिर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावातील तरुण मंडळी व समस्त गावकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले.

12 TO 18 JULY 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 10/07/2021 8:41 PM Page 1

C M Y K



# राज्यातील आघाडी सरकार शेतकरी हिताविरोधी-वासुदेव काळे



**लातूर/प्रतिनिधी**

शेतकर्यांना केंद्र बिंदू मानून केंद्रातील नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने शेतकरी सन्मान योजनेसह शेतकर्यांच्या हिताचे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेवून दिलासा देण्याचे आणि आर्थिक प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले. मात्र राज्यातील आघाडी सरकारने शेतकर्यांना कसलीच मदत केली नाही उलट पीक विम्याचे निकष बदलून विमा कंपन्यांना मालामाल केले. खर्या अर्थाने राज्यातील ठाकरे सरकार शेतकरी हिताविरोधी आहे असे प्रतिपादन भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष वासुदेव काळे यांनी लातूर येथे बोलताना केले.भाजपा किसान मोर्चाच्या वतीने राज्यव्यापी शेतकरी संवाद अभियान सुरु करण्यात आले असून या निमित्ताने गुरुवारी लातूर येथील प्रणवश्री मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात वासुदेव काळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड हे होते तर याप्रसंगी आ. अभिमन्यू पवार, किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस मकरंद कोरडे, सुधाकर भोयर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे, जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, त्र्यंबक गुट्टे, रामचंद्र तिरुके, अशोक केंद्रे, सौ. शामल कारामुंगे, शिवाजी केंद्रे, प्रा. विजय क्षिरसागर, जिप सभापती रोहिदास वाघमारे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष साहेबराव मुळे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा श्रीमती रेखाताई तरडे, युवामोर्चाचे जिल्हाध्यक्ष अॅड. ज्ञानेश्वर चेवले, अमोल पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांच्या सुचनेनूसार या कार्यक्रमात भाजपा किसान मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीसपदी दिलीपराव देशमुख, प्रदेश चिटणीस अनिल केंद्रे, भाजपा लातूर जिल्हा सरचिटणीसपदी किरण उटगे, जिल्हा प्रभारी संतोषअप्पा मुक्ता, मच्छिमार सेल जिल्हा संयोजक ब्रम्हदेव सोनेवाड, किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस बळवंत पाटील आणि महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सोनाली गुळभिले यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष वासुदेव काळे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते सत्कार करुन नियुक्तीपत्र देण्यात आले. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ओबीसी आरक्षण प्रश्नावरुन आक्रमक भूमिका मांडल्या बद्दल सत्ताधारी पक्षाने निलंबित केलेल्या आ. अभिमन्यू पवार यांचा लातूर जिल्हा भाजपाच्या वतीने सत्कार करुन गौरव करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा आजपर्यंतचा सात वर्षाचा कार्यकाळ शेतकर्यांसाठी समर्पित आहे. त्यांनी नवे कृषी धोरण जाहीर करुन शेतकर्यांना मोठा आधार दिला. शेतकऱ्यांसाठी आणि शेतीसाठी कोट्यावधी रुपयांची अर्थसंकल्पात नुसती तरतुदच केली नाही तर अनेक योजना प्रत्यक्ष कार्यान्वीत केल्या, जमिनीची पत तपासणी पासून पीक विम्यापर्यंत विविध योजना राबविल्या असल्याचे सांगून वासुदेव काळे म्हणाले की, राज्यातील महाविकास आघाडी सरकारने अडचणीत संकटात सापडलेल्या शेतकर्यांना कसल्याच प्रकारची मदत केली नाही हे सरकार शेतकरी हिताविरोधी आहे. सर्वच पातळीवर अपयशी ठरलेल्या या सरकारवर शेतकरी, शेतमजुरासह सर्व सामान्य जनता नाराज आहे. ओबीसीचे राजकीय आरक्षण गेले हे सरकार सत्तेवर राहिले तर ओबीसीचे शैक्षणीक आणि नोकरीचे आरक्षण सुद्धा गेल्याशिवाय राहणार नाही अशी भिती व्यक्त करुन हे महाविकास आघाडी सरकार मराठा, ओबीसी समाजाला आरक्षण देवू शकत नाही असे बोलून दाखविले. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपा सरकारने न्याय देण्याची भूमिका घेतली. मागील काळात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्यातील सरकारने शेतकर्यांना न्याय देण्याचे काम केले असे सांगून यावेळी बोलताना भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, सहकाराच्या माध्यमातून काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी सर्व सामान्यांची पिळवणूक करत स्वत:च्या कुटूंबाचे आणि बगल बच्च्यांचे हित साधले. सहकारातील अनेक कारखाने बंद पाडून कवडीमोल किमतीने बगल बच्च्यांना दिले. केंद्र शासनाच्या नविन सहकार मंत्रालयाची जबाबदारी आता अमितजी शहा यांच्याकडे आल्याने येत्या काळात सहकार क्षेत्रात केलेल्या पापाचा हिशोब चुकता झाल्याशिवाय राहणार नाही असे बोलून दाखविले. मराठा आरक्षणाचे पाप झाकण्यासाठी ओबीसीचे आरक्षण घालविले याबाबत विधिमंडळाच्या सभागृहात आवाज उठवणार्या भाजपाच्या आमदारांना जाणीवपूर्वक निलंबित करण्याचा प्रकार ठाकरे सरकार कडून झाला जोपर्यंत आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत भाजपा लढा सुरुच राहणार असल्याचे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, लातूर जिल्हा भाजपा पक्ष संघटनेच्या बाबतीत राज्यात क्रमांक एकचा असून येत्या काळात होणार्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत सर्वांना सोबत घेवून सर्वच निवडणूकीत भाजपाला यशस्वी करुन लातूर जिल्हा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध करण्याचे अवाहन केले.रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात लातूर जिल्ह्यात भाजपा मजबूत होत आहे. सर्वांना सोबत घेवून प्रवाहात आणण्याचे काम ते करीत आहेत असे सांगून यावेळी बोलताना आ. अभिमन्यू पवार म्हणाले की, आरक्षण प्रश्नाबाबत आवाज उठविला म्हणून विधानसभेत आमच्यावर निलंबनाची कार्यवाही झाली. गोंधळतर सर्वच पक्षाचे आमदार करत होते मात्र सरकारला अडचणीत आणणार्या भाजपाच्या आमदारावर शोधून निलंबनाची कार्यवाही करण्यात आली. आमचा जितका आवाज दाबतील तितका मोठा होईल सरकारची ही मुस्कटदाबी सहन केली जाणार नाही असे बोलून दाखविले. यावेळी किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस मकरंद कोरडे, सुधाकर भोयर, नुतन सरचिटणीस दिलीपराव देशमुख जिल्हा परिषदेचे राहुल केंद्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करुन केंद्र शासनाच्या शेतकरी हिताची माहिती दिली. या शेतकरी संवाद अभियानास जिल्हाभरातील किसान मोर्चासह भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवा आम.क्षितीज ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित विरारमध्ये विविध लोकोपयोगी कामांचा शुभारंभ





**विरार/प्रतिनिधी**

बहुजन विकास आघाडी पक्षाचे नालासोपारा विधानसभा मतदार संघाचे युवा आमदार क्षितीज ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित विरारमध्ये विविध विधायक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विरार पु. च्या नाना-नानी पार्क येथील गितांजली शाळेत आमदार क्षितीज ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेकडो नागरिकांना कोरोना प्रतिबंधक लस देण्यात आली, तर सेंट पिटर शाळेत मोफत आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीर, तर मनवेल पाडा विभागात वृक्षारोपण आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तर बाल वसतीगृहात मुला-मुलींसाठी विविध रोजगार प्रशिक्षण क्लासेसची सुरुवात करण्यात आली. यात इलेक्ट्रिकल मोबाईल रिपेरिंग तसेच महिला मुलींसाठी शिलाई मशीन प्रशिक्षण अशा विविध स्वयंरोजगार योजनांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बहुजन विकास आघाडीचे संघटक सचिव अजीव पाटील, माजी नगरसेवक तथा माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत, माजी नगरसेविका हेमांगी पाटील, मिनल पाटील, चिरायू चौधरी, रजनी पाटील, संगीता भेरे तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सायबर गुन्हे पथकाची धडाकेबाज कामगिरी

# नकली ॲपद्वारे लोकांची फसवणूक करणाऱ्या टोळीला वसईतून अटक



**वसई/प्रतिनिधी**

वसई रोड-माणिकपूर येथील कॉल सेंटरच्या माध्यमातून फॉरेक्स मार्केटमध्ये मोबाईलवर संपर्क साधून गुंतवणूक केल्यास मोठ्या नफ्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळीतील ६ जणांना सायबर गुन्हे शाखा पथकाने अटक केली आहे. आदिल युसूफ मेनन (२८) कॉल सेंटर चालक, हुसेन नोमान बुंदीवाला (२२), हुजेफा अकबर बहरेनवाला (२३), मुर्तजा हुजेमा भांन्डपूरावाला (१९), अब्देली शब्बीर इजी (२१), हुसेन शब्बीर संजानवाला (२३) यांना अटक करण्यात आली आहे. हे सर्व जण माणिकपूर अंबाडी रोड येथील विश्वकर्मा पॅराडाईज फेस-१ को.ऑप.सोसा. ए-विंग, फ्लॅट नं.१०९ मधून बनावट कॉल सेंटर चालवित असत. तेथून ते भारतातील अनेक भागात वेगवेगळ्या मोबाईल धारकांना संपर्क साधून त्यांना गुगल प्ले स्टोअर मधून फॉरेस्ट मार्केट व ४ ते ५ ॲपद्वारे शेअर मार्केट, फॉरेस्ट मार्केट मधून गुंतवणूक केल्यास मोठा फायदा मिळवून देण्याची आमिषे दाखवित. तसेच या वरील ॲगपमध्ये ते मोठा नफा झाल्याचे दाखवित आणि निरनिराळ्या बँकांत रक्कम भरणा करण्यास सांगत. लाखो गुंतवणूकदारांचे रक्कम परत न देता त्यांची फसवणूक करीत असे. सायबर गुन्हे पथकाने याबातमीचा तपास करुन या सगळ्यांना गजाआड केले.

सायबर गुन्हे शाखा मिरा-भाईंदर व वसई-विरार पोलिस आयुक्तालय यांनी जनतेला आवाहन केले आहे की, एचडीएफसी, सारस्वत, एचबीआय, एस बँक, आरबीएम, कोटक या बँकांमधील खात्यांमधून लोकांकडून गुंतवणुकीची रक्कम स्वीकारण्यात आली आहे. पोलिसांनी याबाबतीत मोबाईल क्रमांक व सीम कार्ड एकूण ४८ यांचे क्रमांक जाहीर केले असून या संबंधात कोणाची फसवणूक झाली असल्यास सायबर गुन्हे शाखा मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा. या आरोपींविरोधात माणिकपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चालू आहे.

फॉरेक्स मार्केट या ॲपकडून फसवणूक झाल्याचा गुन्हा सोनारी पोलिस ठाणे, जमशेदपूर जिल्हा झारखंड येथे नोंदविण्यात आला आहे. तो गुन्हा उघडकीस आला आहे. पोलिस उपायुक्त गुन्हे डॉ.महेश पाटील, रामचंद्र देशमुख (उपायुक्त) यांनी आपल्या पथकाद्वारे सायबर गुन्हे शाखा व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेने केली.

# आडसाली ऊस लागवड शेतकऱ्यांच्या फायद्याची -आमदार बाबासाहेब पाटील



**अहमदपुर/प्रतिनिधी**

मराठवाड्या सारख्या डोंगराळ भागात आडसाली ऊस लागवड करणे अवघड बाव असली तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कमी क्षेत्रात जास्तीत जास्त ऊस उत्पादन घेणे फायदेशिर असल्याचे प्रतिपादन पणन महासंघाचे चेअरमन तथा आमदार बाबासाहेब पाटील साहेब यांनी केले. ते आयोजित केलेल्या झुम मिटींग च्या माध्यमातुन आडसाली ऊस लागवड व्यवस्थापन या विषयावर चर्चासत्रामध्ये बोलत होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक कृषीरत्न संजीव माने आष्टा जि. सांगली यांचे झुम मिटींग माध्यमातुन ऑनलाईन मार्गदर्शन केले. या झुम मिटींग व्दारे आयोजित केलेल्या चर्चासत्र ऊस दर नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा कारखान्याचे व्यवस्थापकिय संचालक अविनाश जाधव यांनी यशस्वी व प्रभावीपणे राबविले. सदर चर्चा सत्रात सिध्दी शुगरचे व्हाईस प्रेसिडेंट पी.जी. होनराव, केन जनरल मॅनेजर पी.एल.मिटकर,ऊस विकास अधिकारी वाय.आर.टाळे, शेतकी स्टाफ व सिध्दी शुगरचे कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. यावेळी सिध्दी शुगरच्या कार्यक्षेत्रात आडसाली ऊस लागवडीचा शुभारंभ माजीमंत्री बाळासाहेब जाधव साहेब यांच्या हस्ते ऊस उत्पादक शेतकरी शरण शिवसांव चवंडा यांच्या शेतामध्ये ऊस रोपे लागवड करुन करण्यात आला. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवानंद हेंगणे, शिवसांव चवंडा, माधव माने, नामदेव सुरकुटे, संतोष कदम यांच्यासह शेतकरी बांधव उपस्थित होते. सदर चर्चासत्रातील आडसाली ऊसाचे फायदे लक्षात घेवून येथील प्रगतशिल शेतकरी शरण चवंडा यांनी को-८६०३२ ऊस जातीची रोपे आडसाली ऊस म्हणुन लागवड केली आहे. तसेच या भागातील अनेक शेतकऱ्यांनी आडसाली ऊस लागवड करण्याचे नियोजन केल्याने कारखान्याच्या ऊस विकास विभागाअंतर्गत त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येत आहे.

# तारपावादक भिकल्या धिंडा यांचा सन्मान



**वाडा/प्रतिनिधी**

आयुष्यातील ७५ वर्ष तारपा वादन कलेची जोपासना करणारे सुप्रसिद्ध तारपा वादक भिकल्या धिंडा यांना एकतारा गुरुकुलकडून तारपा शिरोमणी पदवी व सांस्कृतिक सेनानी सन्मान प्रदान करण्यात आला. वाडा शिवाजीनगर येथील एकतारा गुरुकुलमध्ये पार पडलेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जव्हार तालुक्यातील वाळवंडा येथील रहिवासी असणाऱ्या भिकल्या धिंडा यांनी तारपा बनविणे, तसेच वेगवेगळ्या सुरांमध्ये तारपा वाजविण्याची कला जोपासली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन एकतारा गुरुकुलने त्यांचा सन्मान केला आहे.

वारली चित्रकलेप्रमाणे तारपा नृत्य व तारपा वादन या आदिवासींच्या पारंपरिक कला आहेत. तारपा वाद्याचे व तारपा वादन कलेचे संगोपन व संवर्धन व्हावे यासाठी या वाद्यांचा मूळ ढाचा तसाच ठेवून या कलेला संगीताच्या सात सुरांमध्ये आणण्याचा प्रयत्न असल्याचे गुरुकुलचे आकाश विश्वास यांनी सांगितले.

# ऑपरेशन मुस्कान १० महाराष्ट्र अंतर्गत ५३ बालकांचा शोध घेण्यात पोलिसांना यश

**वसई/प्रतिनिधी**

वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार भाईंदर व नालासोपारा पोलिस ठाणेनिहाय एक पोलीस अधिकारी व दोन पोलीस अंमलदार यांचे विशेष पथक तयार करून ऑपरेशन मुस्कान-१० लहान मुलांचे शोध मोहीम प्रभावीपणे राबवून १८ वर्षाखालील १६ मुलं आणि ३७ मुली असे एकूण ५३ बालकांना पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशीअंती सर्व बालकांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले. त्यामध्ये पोलीस ठाणे अभिलेखावरील ४३ बालकांचा व १० बेद्वारस बालकांचा समावेश आहे. त्याचबरोबर एकूण २९४ हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यात मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत पथकाला यश आले आहे. गुन्हे शाखेचे उपायुक्त डॉ. महेश पाटील, गुन्हे एसीपी (गुन्हे) रामचंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष भाईंदर व नालासोपारा, सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व पथक यांनी यशस्वीपणे कामगिरी पार पाडली. राज्याचे पोलीस महासंचालक यांनी ऑपरेशन मुस्कान-१० महाराष्ट्र ही लहान मुलांची शोध मोहीम दि. १ जून ते ३० जून २०२१ या कालावधीत राबविण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत हरवलेल्या किंवा पळवून नेलेल्या बालकांचा शोध घेऊन सदरची मोहीम प्रभावीपणे राबवून १८ वर्षाखालील हरवलेली मुलं व मुली यांचा जास्तीत जास्त शोध घेण्याबाबत वरिष्ठांनी सूचना दिल्या होत्या.

# वाडा पूर्वच्या रस्त्याची खड्ड्यांमुळे दुरवस्था; गावकऱ्यांची दुरुस्तीची मागणी



**वाडा/प्रतिनिधी**

तालुक्यातील वाडा देसई कळंभा या रस्त्यावर आगोदरच मोठं मोठे खड्डे पडले होते पाऊस पडल्या पासून हे खड्डे आणखी खोल व विस्तीर्ण झाले आहेत त्या मुळे या रस्त्यावरून वाहन घेऊन जाणे म्हणजे अक्षरशः धोक्याचे झाले आहे. जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. पुर्णतः खड्डेमय झाला आहे. या मार्गावर लहान मोठे गाव असून हा रस्ता खर्डी मार्गे शहापूर, नाशिकला जात असल्याने या मार्गावर वर्दळी तशी असते मात्र या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नाशिकला जाणाऱ्यांना मार्ग बदलून दुसरीकडून जावे लागत आहे याच रस्त्यावर तीळसेश्वराचे पुरातन शिव मंदिर असल्या कारणाने या मंदिरात भक्तांची नेहमीच वर्दळ असते. मागील तीन वर्षांपासून या मार्गावरील खड्डे भरले गेले नसल्याचे येथील ग्रामस्थ सांगत आहेत. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी नुकतेच येथील वाडा पूर्व संघर्ष समितीच्या वतीने वाड्याचे तहसीलदार यांना निवेदन देऊन रस्ता दुरुस्तीची मागणी केली आहे. लवकरात लवकर रस्त्यावरील खड्डे ग्रीट व खडी टाकून भराव करावा, माती भराव करून थातूर मातूर काम कारण्याचा प्रयत्न केला तर ते काम काम थांबवून तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशाराही या निवेदनातून वाडा पूर्व विभाग संघर्ष समितीने दिला आहे.

C M Y K